Chapter 1

ॐ परमपूज्य परमसद्गुरू । भगवान 'श्री' कल्पतरू
धैर्याचे जे महामेरू । कृपासागर केवळ ।।१।।
पाहून 'श्रीं' चे सुदिव्यचरण । साष्टांग केले मी वंदन ।।
'श्रीं' नी सुहास्यवदने मज पाहून । वरदहस्त केलाच ।।२।।
'श्रीं' चा पाहून वदरहस्त । त्यात दिसले कैलास समस्त ।।
शिवपार्वती त्या कैलासात । स्पष्टपणे मी पाहिले ।।३।।
'श्रीं' च्या वरदहस्तात । शिवनिवासस्थान दिसत ।।
मी अगदी झालो चकित । दिव्य कैलास पाहिले ।।४।।
पार्वतीस म्हणती शंकर । मी भूलोकी जाणार ।।
घेणार आहे अवतार । माझ्याच नावाचा प्रिये ।।५।।
अगदी आगळावेगळा । अवतार माझा हा सकळा ।।
अंतरी विपरीत कळा । रूढीपासून वेगळा ।।६।।
सहजासहजी मजला तर । कोणीही न ओळखणार ।।
मजजवळ न कोणी येणार । दूर जातील, पाहून ।।७।।
ऐसा विपरीत अवतार । मी आहे घेणार ।।
पार्वतीस शंकर वदत । पार्वती झाली चकित ।।८।।
शिवपार्वती हा संवाद । कैलास दृश्य सुखद
देखावा अगदी अलगद । अंतर्धान जाहला ।।९।।
त्याच 'श्रीं' च्या वरदहस्तात । दुसरा देखावा स्पष्ट दिसत ।।
स्वामी समर्थ प्रकटत । दिव्य शरीर तेजस्वी ।।१०।।
शिवपार्वती संवाद ऐकला । स्वामी काय म्हणती मला ? ।।
हा विचार मजला स्फुरला । स्वामी रोखून पहात ।।११।।
काय स्वामींचे तेज दिसले । कोटीसूर्य जणु प्रकटले ।।
दिव्य तेजस्वी शरीर पाहिले । मांडी भव्य प्रशस्त ।।१२।।
स्वामींनी मजकडे पाहिले । डोळे मजवर रोखले ।।
स्वामी काही न बोलले । सुहास्य, केले प्रेमाने ।।१३।।
मग स्वामींनी काय केले । दोन्ही बाहू लांबविले ।।
दोन्ही पद वर उचलले । गुडघे नेले छातीसी ।।१४।।
गुडघे घेऊन छातीशी । हतांची मिठी चरणांशी ।।
बैठक ऐशी घालून खाशी । समर्थ बसले डौलात ।।१५।।
समर्थ ऐसे कां बसले ? । ऐसे माझ्या मनात आले ।।
असे काही मज पाहिले । समर्थांनी त्या वेळी ।।१६।।
समर्थांच्या दिव्य दृष्टीत । माझ्या प्रश्नाचे उत्तर दिसत ।।
समर्थ ऐसे का बसत ? । कळले मला त्यामुळे ।।१७।।
समर्थांना मी न्याहाळले । तोच शंकरमहाराज प्रकटले ।।
शंकरमहाराजांना पाहिले । ब्रह्मानंद जाहला ।।१८।।
दोन्ही बाहू लांबविले । समर्थांनी आधी दाखविले ।।
आजानबाहू अगदी असले । होते शंकरमहाराज ।।१९।।
समर्थांनी आधी दाखविले । तसेच शंकरमहाराज झाले ।।
तशाच बैठकीने सुचविले । 'मीच शंकर महाराज' ।।२०।।
समर्थांच्या दिव्यदृष्टीतूनी । नि:संदिग्ध मज आले कळुनी ।।
समर्थांचाच अवतार अवनी । शंकरमहाराज हे ।।२१।।
काही न बोलता समर्थांनी । सांगितले ते दिव्यदृष्टीतूनी
मी गेलो भारावूनी । समर्थ अंतर्धान हो ।।२२।।
'श्रीं' च्या वरदहस्तात । तिसरे दृश्य लगेच दिसत ।।
भगवान दत्त उभे असत । समीप अष्टवक्र ते ।।२३।।
अष्टवक्रास दत्त म्हणत । 'अवतार घ्यावा कलियुगात' ।।
अष्टवक्र अवतार घेत । तेच शंकरमहाराज ।।२४।।
अष्टवक्र थोर अधिकारी । गर्भात आईच्या असता उदरी ।।
अगदी मुखोद्गत वेद चारी । पहा अधिकार केवढा ? ।।२५।।
जनक राजाने प्रश्न करूनी । बंदिवासात ठेविले ऋषिमुनी ।।
अष्टवक्र अष्टवर्षाचे असूनी । समर्पक दिले उत्तर ।।२६।।
त्यामुळे पंडित ऋषिमुनी । सुटले बंदीखान्यातुनी ।।
ऐसे थोर अधिकारी म्हणुनी । विख्यात अष्टवक्र ते ।।२७।।
ऐशा या अष्टवक्रांचा । अवतार कलियुगी मोलाचा ।।
श्री शंकर महाराज यांचा । तिसरे दृश्य पाहिले ।।२८।।
अष्ट ठिकाणी वक्र असती । म्हणून अष्टवक्र त्यांना म्हणती ।।
शंकर महाराज तसेच दिसती । अष्टवक्र अवतार ।।२९।।
अष्टवक्र, समर्थ, शंकर । या तिघांचाही अवतार ।।
असती महाराज शंकर । स्पष्टपणे कळलेच ।।३०।।
शंकर महाराजांची सगळी । छायाचित्रे विविध पाहिली ।।
त्यांच्या डोक्यावर शेंडीजवळी । तीन बटा केसांच्या ।।३१।।

तीन बटा केसांच्या दिसत । प्रत्येक छायाचित्रात ।।
हा काय प्रकार असत । प्रश्न मला पडतसे ।।३२।।
या प्रश्नाचे उत्तर । या तिघांनीच दिले तर ।।
संगतीही मनोहर । कळली स्पष्टपणेच ।।३३।।
तीन बटा डोक्यावर । तिघांचा हे अवतार ।।
असती महाराज शंकर । कळले मला निश्चित ।।३४।।
शंकर महाराज 'शिवशंकर' । शंकर महाराज 'समर्थ' खरोखर
शंकर महाराज 'अष्टवक्र' सुंदर । दृष्टान्त स्पष्ट जाहला ।।३५।।
एवढ्या ओव्या लिहिल्यावर । दृष्टान्त झाला मज सुंदर ।।
अगदी सुप्रभाती गुरूवार । जागृतावस्थेमध्येच ।।३६।।
पहाटे चार वाजता उठलो । पुन्हां पांघरूण घेऊन निजलो ।।
जणू टी.व्ही. पाहू लागलो । दृश्य दिसत स्पष्टच ।।३७।।
टी.व्ही. च्या पडद्यावर । ओवीचे प्रथम चरण गरगर ।।
फिरू लागले चक्राकार । फिरत दुसरे नंतर ।।३८।।
चरण तिसरेही फिरत । चौथे चरण फिरू लागत ।।
नंतर चरणे स्थिर होत । ओवी दिसली स्पष्ट ती ।।३९।।
डोळे मी झाकलेले असत । वरती पांघरूणही घेत ।।
जणू टि.व्ही. पहात आहोत । त्यातूनही जाणवले ।।४०।।
चरण गरगर फिरत । नंतर चरण स्थिर होत ।।
संपूर्ण ओवी स्पष्ट दिसत । लक्षपूर्वक वाचली ।।४१।।
ओवी लक्षात ठेवली । उठून ओवी लिहून काढली ।।
संपूर्ण ओवी पहा सगळी । पुढीलप्रमाणे असेच ।।४२।।
'शंकर महाराजांचे चरित्र । रसाळ गोड पवित्र
ज्याला वाटे आपण पात्र । तोच सत्पात्र होतसे' ।।४३।।
ओवी किती महत्वाची । ओवी किती मोलाची ।।
ओवी किती खुबीची । खोल अर्थ ओवीत ।।४४।।
शंकर महाराजांचे म्हणून । जे जे भक्त आहेत जाण ।।
त्यांना ही ओवी वरदान । एवढी प्रभावी ओवी ही ।।४५।।
ज्यांना खात्री 'आपण पात्र' । त्यांनाच रसाळ चरित्र ।।
त्यांनाच चरित्र पवित्र । गोड चरित्र त्यांनाच ।।४६।।
असेच भक्त सत्पात्र । महाराजांचे वाचण्या चरित्र ।।
त्यांनाच चरित्र, पवित्र । करील हो निश्चित ।।४७।।
ज्यांची भूमिका हीन पुरती । त्यांना दिसेल विसंगती
महाराजांच्या सर्व कृती । चमत्कारीक दिसतील ।।४८।।
महाराजांचे चरित्र । सगळेच आहे विचित्र ।।
घटना महत्त्वाच्या सर्वत्र । निश्चित कोणा न ठाऊक ।।४९।।
अघटित घटनापटूंच्या । घटना ज्या महत्त्वाच्या ।।
कशा त्या मानवाच्या । लक्षामध्ये येतील ? ।।५०।।
कितीही असो बुध्दिवंत । चिकित्सक असो विख्यात ।।
तो येथे हतबल होत । चालत त्यांचे काही ना ।।५१।।
मानवी बुध्दीला मर्यादा । चिकित्सेलाही कायदा ।।
ज्यांचा पहा वायदा । या सर्वांच्या पलीकडे ।।५२।।
अशा विभूतींचे ज्ञान । कसे येणार हो कळून ।।
येथे श्रध्देचे कारण । तेव्हाच काही कळेल ।।५३।।
असे काही बुध्दिवंत । प्रसिध्द चिकित्सकही ख्यात ।।
अकलेचे तारे उधळीत । महाराजकृतीवर ।।५४।।
तरीही महाराज शांत । बुध्दिवंताचे प्रयत्न निष्फळ होत ।।
मग महाराजांना शरण येत । ऐशी फजिती तयांची ।।५५।।
महाराजांचे चरित्र । घटना घडल्या ज्या सर्वत्र ।।
कुणा न माहिती तिळमात्र । हेच चरित्र वैशिष्ट्य ।।५६।।
कुणास काही जाणवले । तेच त्यांनी सांगितले ।।
कोणी काही अनुभविले । कथन केले ते त्यांनी ।।५७।।
कोणास काही दृष्टांत झाले । ते तयांनी वर्णन केले ।।
प्रत्यक्ष जे जे पाहिले । सांगतात ते तसेच ।।५८।।
जे जे आपण ऐकिले । तेच लोक सांगत सुटले ।।
असे अनेक प्रसंग रंगले । विविध कथाही तशाच ।।५९।।
अशा अनेक कथांतूनी । संगती येते पहा दिसूनी ।।
काही कथा पारखूनी । घेतल्या आहेत त्यातल्या त्यात ।।६०।।
अनेकांना भेटूनी । निष्ठावंतांशी चर्चा करूनी
ऐकीव कथांची खात्री करुनी । निश्चित केल्या कथा त्या ।।६१।।
जेवढे देता येईल खरे । प्रयत्न केले तेवढे पूरे ।।
जे जे ठरेल खरेखूरे । तेच लिहिणार असे मी ।।६२।।
एवढे प्रयत्न करून । नंतर महाराजांना कौल लावून ।।
जो आदेश येईल त्यांच्याकडून । तेच लिहिले जाणार ।।६३।।

सर्व भक्तांना एवढे । मुद्दाम लिहिले तेवढे ।।
शंका कुणा न यावी पुढे । म्हणून हे सांगितले ।।६४।।
जो हे चरित्र वाचील । त्यावर विश्वास ठेवील ।।
त्यालाच पहा कळतील । योगिराज शंकर ।।६५।।
एवढा वाजवूनही डंका । ज्याच्या मनात येतील शंका ।।
त्याला देऊनही सुवर्णलंका । शेवटी रंकच होणार ।।६६।।
भारतात मुंबई इलाख्यात । जिल्हा नासिक, सटाणा तालुक्यात ।।
अंतापूर नावाचे गाव असत । लहान खेडेगाव हे ।।६७।।
या अंतापूर गावात । एक गृहस्थ असे राहात ।।
चिमणाजी त्याचे नाव असत । निष्ठांवत शिवभक्त ।।६८।।
शंकराची पूजा - अर्चा । नेहमी शिवलीलांचीच चर्चा ।।
शिवमंदिराकडे सदा मोर्चा । उभयंताचा असे हो ।।६९।।
पत्नी गृहकृत्यदक्ष । नेहमी शिवोपासनेत लक्ष ।।
'ॐ नमः शिवाय' जप लक्ष । करीत दोघे नेहमी ।।७०।।
घरी कशाचीही ना वाण । धनधान्याची असे खाण ।।
सर्व प्रकारचेही त्राण । त्यांच्या ठायी हातेच ।।७१।।
एवढी सुखे असून सारी । एकच खंत होती उरी ।।
पुत्रसंतान नव्हते घरी । हीच काळजी दोघांना ।।७२।।
एवढे आपण शिवभक्त । शिव का न इच्छा पुरवीत ? ।।
ऐसे कधी न आले मनात । पतिपत्नींच्या पहा हो ।।७३।।
यालाच म्हणावे खरा भक्त । जो कधीच काही न मागत
ऐसे कधीच न ये मनात । निष्ठावंत भक्त तो ।।७४।।
मनात उद्भवता कामना । निष्फळ होतसे साधना ।।
क्लेश होती आपल्या मना । जबाबदार आपण ।।७५।।
फल न पडता आपल्या पदरा । दोष का द्यावे शंकरा ।।
आपलाच गुन्हा असता खरा । शिक्षा कुणा मिळेल ? ।।७६।।
चिमणाजी एके दिनी । झोपले होते आपल्या सदनी ।।
एक तपस्वी आले स्वप्नी । अग्निशिखेसम तेजस्वी ।।७७।।
पहाटेच्या समयात । दिव्य तपस्वी स्वप्नात येत ।।
दिव्य दृष्टान्त त्यांना देत । तपस्वी वदती स्पष्टपणे ।।७८।।
दिव्य साधू तेजस्वी । तेजःपुंज तपस्वी ।।
रूप मनोरम मनस्वी । खणखणीत म्हणाले ।।७९।।
चिमणाजी, ऊठ झटपट । संपले तुझे काबाडकष्ट ।।
होईल आज तुझे इष्ट । तुला हवे ते मिळेल ।।८०।।
या अंतापूर शेजार । दावलमलीक असे पीर ।।
तेथून टाकता नजर । झाडी तुला दिसेल ।।८१।।
त्या झाडीच्या खाली भलेभले । वाघ दिसतील तुज बसलेले ।।
वाघांच्या घोळक्यात निजलेले । बालक एक दिसेल ।।८२।।
आजच तेथे जाऊन । घाबरू नको मनातून ।।
चटकन बालक घेऊन । घरी आणून सांभाळ ।।८३।।
एवढे स्पष्ट सांगून । तपस्वी झाले अंतर्धान ।।
चिमणाजी अगदी खडबडून । जागा झाला लगेच ।।८४।।
वंदन केले शंकराला । फार आनंद झाला त्याला ।।
स्वप्न सांगितले पत्नीला । ब्रह्मानंद तिला तर ।।८५।।
चिमणाजीस झाला आनंद । पत्नीस होई ब्रह्मानंद ।।
घरात भरला परमानंद । आनंदी आनंदच ।।८६।।
आनंदाने चिमणाजी । दृष्टान्त सांगे लोकांमाजी
लोक दर्शवून नाराजी । टिंगल करू लागले ।।८७।।
पारमार्थिक आपली वाटचाल । दृष्टान्त जे जे होतील ।।
साधना जी जी कराल । गुप्त अगदी ठेवावी ।।८८।।
साधकांसाठी परमार्थाचा । नियम असे महत्त्वाचा ।।
उघडू नये कधी वाचा । तेव्हाच परमार्थ साधेल ।।८९।।
लोकांनी जरी निंदा केली । केली सर्वांनी टवाळी ।।
चिमणाजीची वृत्ती न ढळली । म्हणे 'जय शंकर' ।।९०।।
नित्य पहाटेस उठणे । स्नान, पूजा, जप करणे ।।
शिवलीलामृत पारायणे । सोमवारी उपवास ।।९१।।
साधना उभयंताची ऐशी । चालली होती प्रति दिवशी ।।
'ॐ नमः शिवाय' वाचा अशी । चालतसे अखंड ।।९२।।
दृष्टान्त होता, त्या दिनी । दोघांनीही स्नान करूनी ।।
पूजा उपासना आटोपूनी । दोघे निघाले बाहेर ।।९३।।
'ॐ नमः शिवाय ' जप । करीत, चालले झपझप ।।
दृष्टान्त स्थळा समीप । येऊन ते पोचले ।।९४।।
जे जे दृष्टान्तात पाहिले । ते ते सर्व प्रत्यक्ष दिसले ।।
तोच बाळाचे रडणे ऐकिले । वाघही दिसले तेथेच ।।९५।।

एक वाघीण त्या बाळावरती । उभी राहून दूध पाजीत होती ।।
हे चालले ज्या वृक्षाखाली । बेलवृक्ष होता तो ।।९६।।
हाच वृक्ष दृष्टान्तात । होता, चिमणाजी ओळखत ।।
धीर धरून पुढे जात । निर्भय होऊन चिमणाजी ।।९७।।
वाघ - वाघीण रोखून । पहात असता तिथे जाऊन ।।
चिमणाजीने बाळ उचलून । छातीशी धरून परतला ।।९८।।
बिल्व वृक्षाचे त्रिदळ पान । त्या बाळावर पडून ।।
दोघेही तो बाळ घेऊन । अंतापुरी परतले ।।९९।।
वाघ राहिले तसेच बघत । बिल्ववृक्ष आनंदे नाचत
चिमणाजी ब्रह्मानंदीचालत । बाळ घेऊन घरी ये ।।१००।।
त्या दिवशी उभयंतास । होता कडकडीत उपवास ।।
सोमवारचा तो दिवस । लाभ अपूर्व जाहला ।।१०१।।
पुत्रलाभ झाला सुंदर । त्या दिवशी शंकराचाच होता वार ।।
तो म्हणजेच सोमवार । कार्तिक शुध्द अष्टमी ।।१०२।।
साधारणपणे इसवी सन । आठराशे सुमारास जाण ।।
महाराजांचा जन्मदिन । याप्रमाणे असेच ।।१०३।।
जन्म साल जरी न निश्चित । मिती मात्र निश्चित असत ।।
कार्तिक शुध्द अष्टमी होत । जन्म दिवस हा असे हो ।।१०४।।
बालकास असता पहात । चिमणाजीस प्रेमे उमाळे येत ।।
बाळाचे पटापट मुके घेत । प्रेमानंदे चिमणाजी ।।१०५।।
पत्नी बाळास मांडीवर घेत । तोच पत्नीस पान्हा फुटत ।।
चुटूचुटू बाळही दूध पीत । तृप्त मायलेकरू ।।१०६।।
महाराजांचा जन्मसोहळा । अपूर्व आहे पहा सगळा ।।
आनंदाश्रू घळाघळा । मातापित्यांचे वाहती ।।१०७।।
वंदून महाराज श्री शंकर । जन्मवृत्त कथन मनोहर ।।
हा पहीला अध्याय सुंदर । समाप्त येथे जाहला ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 2

जय जय महाराज श्री शंकर । भक्तांना जे कल्याणकर
स्मरता होती सुखकर । नमन त्यांना असो हे ।।१।।
'शं' म्हणजे कल्याण तर । 'कर' म्हणजे जो करणार ।।
कल्याण करी जो खरोखर । शंकर त्यांना म्हणतात ।।२।।
शंकर महाराजांस माझी विंनती । आपले चरित्र गहन अती ।।
थक्क होऊन जाते मती । लेखणी काय लिहील ? ।।३।।
आपले चरित्र जे असत । त्याविषयी पुस्तकेही प्रकाशित ।।
लोकही बरेच काही सांगत । विविध साधने अशी ही ।।४।।
कोठे लागतसे संगती । कोठे जाणवते विसंगती ।।
कोठे तर वादविवाद होती । कोठे काही भलतेच ।।५।।
असा तुमच्या चरित्राचा । मार्ग काट्याकुट्यांचा ।।
त्यातून मार्ग काढावयाचा । अत्यंत कठीण काम हे ।।६।।
तुम्हीच मला सांगावे । तुम्हीच मला सुचवावे ।।
तुम्हीच मला कौल द्यावे । निवाडा करावा तुम्हीच ।।७।।
करावे विचारांचे स्फुरण । करावी कल्पनांची उधळण ।।
लेखन व्हावे रामबाण । स्फुर्ती ऐशी स्फुरावी ।।८।।
घटना स्फुराव्या सरसर । लेखणी चालावी झरझर
लिहून व्हावे भरभर । दिव्य चरित्र आपुले ।।९।।
माझ्या मानवी बुध्दीतूनी । विनंती केली आपुल्या चरणी ।।
आपलीच सारी ही करणी । कर्ते करविते आपण ।।१०।।
आपल्या चरणांस स्पर्शून । आपला आशीर्वाद घेऊन ।।
वेगात चालले चरित्रलेखन । जय शंकर म्हणून ।।११।।
जन्म झाला मातेविण । ऐसे आले का कोठे घडून ?।।
मातेचा अधिकार म्हणून । त्रैलोक्यात श्रेष्ठच ।।१२।।
मातेविण महाराज जन्मले । हे तो अघटित पहा घडले ।।
अयोनिसंभव अवतरले । धरणीवरती महाराज ।।१३।।
नऊ महिने वागविला । ज्या स्त्रीने पोटचा गोळा ।।
त्या स्त्रीच्याच स्तनाला । पान्हा फुटतो प्रसवता ।।१४।।
नऊ महिने उदरात । बालकास जी पोशीत ।।
तिलाच पान्हा असतो फुटत । त्रिकालाबाधित सिध्दान्त ।।१५।।
मातेवीण जन्म होत नसे । महाराज मातेविण जन्मले तसे ।।
पहीला चमत्कार हा असे । महाराजांच्या जन्माचा ।।१६।।

मातेवीन पान्हा न फुटणार । परी चिमणाजीच्या पत्नीस तर ।।
महाराजांस घेता मांडीवर । पान्हा फुटला जोरात ।।१७।।
महाराजांच्या जन्माचा । चमत्कार दुसरा हा गमतीचा ।।
हाच बालक त्या माऊलीचा । सिध्द सहजच जाहले ।।१८।।
हीच माता महाराजांची । सिध्द होतसे सहजची ।।
कशी पहा चमत्कारांची । रीत न्यारी असे ही ।।१९।।
चिमुकला बालक पाहुनी । दाटले आनंदाश्रू नयनी ।।
अष्टभाव आले उसळुनी । उभयंताच्या मनात ।।२०।।
ही वार्ता अंतापूरात । वायुवेगाने पसरत ।।
नागरीक सारे चकित होत । वृत्त कळताक्षणी ।।२१।।
पाहण्या त्या बालकाला । लोकांचा घोळका जमला
जो तो चिमणाजींच्या घराला । वेढा देऊन थांबले ।।२२।।
लोक पाहती विस्मयाने । चिमणाजीच्या पत्नीने ।।
घेतले मांडीवर आनंदाने । पाजू लागली वात्सल्ये ।।२३।।
मातेस प्रेमपान्हा फुटला । बाळ दूध पिऊ लागला ।।
कौतुक वाटले सर्वांना । भारावून गेले ते ।।२४।।
धन्य चिमणाजी हो भले । आधी त्यांना स्वप्न पडले ।।
स्वप्नाप्रमाणेच सारे घडले । स्वप्न खरे जाहले ।।२५।।
ऐसे लोक वर्णन करती । जे आरंभी दोष देती ।।
तेच नंतर भूषविती । चिमणाजीस या परी ।।२६।।
चिमणाजीच्या पत्नीचे । इतक्या पहा दिवसांचे ।।
अतृप्त मातृहृदय तिचे । आज तृप्त जाहले ।।२७।।
मातृत्त्व हा स्त्रीजीवनाचा । क्षण अत्यंत महत्त्वाचा ।।
आनंदाचा मोलाचा । फलश्रुतीचा असेच ।।२८।।
झाड लावले हौसेनी । पाणी घातले नियमानी ।।
जर ते न बहरले फळाफुलांनी । काय उपयोग वृक्षाचा ? ।।२९।।
मुद्दाम गाय घेतली चांगली । नित्य वैरण तिला घातली ।।
आणि ती जर का न व्याली । केवळ खाण्यास काळ ती ।।३०।।
जनावर विकता येईल । किंवा हाकून दिले जाईल ।।
स्त्रीचे कसे होईल ? । निंदाच तिची होईल ।।३१।।
मातृत्व मिळणे स्त्रीजन्माचा । हक्क आहे, क्षण भाग्याचा ।।
आधार याच मातृत्त्वाचा । सर्व जगास असेच ।।३२।।
लोक येती लांबून । चिमणाजीस वदती नमून ।।
आम्हा घेऊ द्या दर्शन । आपल्या बाळ राजाचे ।।३३।।
हा सामान्य नव्हे बालक । दिसतो हा त्रैलोक्यनायक ।।
त्रैलोक्याचा हा चालक । म्हणती कोणी यापरी ।।३४।।
कोणी म्हणती करून विचार । आज आहे सोमवार
हा शंकराचा अवतार । आला कैलास सोडून ।।३५।।
घेऊन बालकाचे दर्शन । लोक आनंदित होऊन ।।
जाती एकएका मागून । आपआपल्या घरासी ।।३६।।
ऐकून लोकांची ही वाणी । चिमणाजीही अंत:करणी ।।
आनंदून गेला झणी । धन्यता वाटे अत्यंत ।।३७।।
तोही मनात विचार करत । इतके दिवस जे शिवव्रत ।।
निष्ठेने आपण आचरत । फळास आले असावे ।।३८।।
नित्य आपण जो उपासिला । नित्य प्रेमाने पूजिला ।।
जप ध्यानाने आळविला । केली व्रते उपवास ।।३९।।
साधना केली जी खडतर । त्यामुळेच भगवान शंकर ।।
प्रसन्न होऊन आम्हावर । कृपा केली शिवाने ।।४०।।
ज्या शंकराने कृपा केली । ज्याने घटना ही घडविली ।।
त्याने आपली तृप्ती केली । प्रसाद दिला अपूर्व ।।४१।।
याच भगवान शंकराचे । नाव ठेवावे बालकाचे ।।
मन ऐसे चिमणाजीचे । सांगू लागले पत्नीस ।।४२।।
लोक काय काय म्हणतात । मजलाही काय वाटत ।।
सर्व सविस्तर सांगत । तिनेही मान्य केले ते ।।४३।।
बाळ माझा कल्याणकर । जगतास असे शुभंकर ।।
नांव ठेवावे शंकर । स्पष्ट तिने सांगितले ।।४४।।
चांगला मुहूर्त पाहून । बारशाचा दिवस ठरवून ।।
नांवही निश्चित करून । समारंभ ठरविला ।।४५।।
बारशासाठी सर्वांस । गावातील स्त्री - पुरूषांस ।।
आमंत्रणे दिली खास । केली सर्व तयारी ।।४६।।
अगदी समारंभपूर्वक । बारसे केले, जमले कैक ।।
सगेसोयरे भाविक । अगत्यपूर्वक आलेच ।।४७।।
सर्वांच्या मनी नांव शंकर । पित्याच्या मनात शंकर
मातेने ठरविले शंकर । नाव शंकर ठेवले ।।४८।।

बारशास जमलेले भाग्यवान । ज्याने सृष्टी केली निर्माण ।।
शंकर नाव सर्वांनी ठेवून । बारसे त्याचे जेवले ।।४९।।
जग ज्यांनी निर्माण केले । त्याचे बारसे जे जेवले ।।
त्यांचे भाग्य केवढे भले । धन्य जन हो ते सारे ।।५०।।
जय जय प्रभो श्री शंकर । पाप आमचे भयंकर ।।
व्हावे आम्हा शुभंकर । प्रार्थना चरणी आपल्या ।।५१।।
बारसे झाले जोरदार । आनंदून गेले अंतापूर ।।
जो तो ब्रह्मानंदात असे चूर । आनंद नगरी दाटला ।।५२।।
माता बाळास घेऊन । हाक मारी शंकर म्हणून ।।
बाळ लगेच मान वळवून । पहात राही टकामका ।।५३।।
'शकंर म्हणता' चिमणाजींनी । हात पाय वरती करूनी ।।
'ओ ओ ओ ओ' सतत करूनी । बाळ खेळे आनंदे ।।५४।।
आपण नाव जे ठेवले । ते बाळास पसंत पडले ।।
याचे पुरावे अनुभवले । मातापित्यांनी त्या वेळी ।।५५।।
पत्नी अन् चिमणाजींचा । काळ आत्तापर्यंतचा ।।
शिवोपासनेत मोलाचा । गेला होता कष्टात ।।५६।।
अगदी आत्तापर्यंत । होते शंकर उपासनेत ।।
आता शंकराच्याच सानिध्यात । उभयताही रंगले ।।५७।।
करी शंकराचे कौतुक । खेळवून देती त्याला हाक ।।
खेळणी त्याच्याभोवती कैक । विविधाकृती रंगाची ।।५८।।
दोघे शंकरास खेळवीत । मधून पाळण्यात निजवीत ।।
प्रेमाने त्याला झोका देत । मंजुळ गाणी म्हणून ।।५९।।
शंकरास घेई केव्हा माता । शंकरास घेई केव्हा पिता ।।
शंकरास घेऊन उभयता । जाती शंकरदर्शना ।।६०।।
शंकरास न्हाऊ घाली माता । शांत मातेने पाजविता
झोपी जाई थोपटीता । कधी न भोकाड काढले ।।६१।।
स्वत: बाळलीला करून । मातापित्यास संतोषवून ।।
येणारेही आनंदून । जाती शंकरा पाहून ।।६२।।
विविध बाळलीला करून । विविध चाळे दाखवून ।।
सर्वांस सोडिले मोहून । ऐसा बालशंकर ।।६३।।
याप्रमाणे शुक्लेंदुवत् । बाळ वर्धिष्णू तो होत ।।
शंकर सवंगडी जमवीत । दंग खेळामध्ये तो ।।६४।।
बोल शंकर बोले बोबडे । मातापित्यांच्या कानी पडे ।।
बोबडे ऐकण्याची सवय जडे । मातापिता तुष्टती ।।६५।।
बोबडे बोल पुत्राचे । वाटती लाख मोलाचे ।।
अशा मातापित्यांचे । भाग्य थोर असेच ।।६६।।
एवढ्याचसाठी कैकांनी । व्रतेवैकल्ये आचरूनी ।।
अशा लोकांच्या तरीही सदनी । कधी न हलला पाळणा ।।६७।।
भाग्यवान ते खरे असत । ज्यांच्या घरी बाळ रांगत ।।
बोबडे बोल वेद वाटत । ज्यांचे त्यांनाच कळणार ।।६८।।
थोडा मोठा झाल्यावर । शंकर उठे लवकर ।।
आणि स्नान आटोपल्यावर । भस्म चर्ची सर्वांगा ।।६९।।
दृष्ट कोणाची लागू नये । इडापिडा बाधू नये ।।
नजर कोणाची लागू नये । म्हणून माता काय करी ।।७०।।
तीट लावी गालावरी । ओवाळी मीठ मोहरी ।।
मिरच्या उतरून टाकी सत्वरी । बाळ शंकरावरूनी ।।७१।।
शंकराला खेळवीत । मातापित्यांचा दिवस जात ।।
अगदी आनंदात मजेत । दिवस जाई दोघांचा ।।७२।।
सकाळी उठे शंकर । स्नान करून लवकर ।।
भस्म लावी अंगावर । गावाबाहेर जातसे ।।७३।।
गावाबाहेर अरण्यात । जेथे वनश्री सुशोभित
जेथे सर्वत्र असे शांत । वृक्षाखाली बसतसे ।।७४।।
तो वृक्ष कोणता होता । कोणासही तो माहीत नव्हता ।।
सहज शंकर जात होता । होता बिल्ववृक्ष तो ।।७५।।
हा बिल्ववृक्ष असत । तेथेच बसणे असे युक्त ।।
जाणीवपूर्वक योजना नसत । शंकराची त्या वेळी ।।७६।।
नाहीतर श्री शंकर । कोणत्या वृक्षाखाली बसणार ? ।।
कोणता वृक्ष आवडणार । माहीत असे सर्वांना ।।७७।।
बिल्ववृक्षाखाली आसन । पडलेल्या बिल्वपत्रांचे असून ।।
त्यावर मांडी घालून । ध्यानस्थ बसे शंकर ।।७८।।
ध्यानस्थ बसे कधी तास । कधी बसे तासन् तास ।।
कधी तर सबंध दिवस । ध्यानस्थ राही शंकर ।।७९।।
माता पिता काळजी करीत । शंकर कोठे गेला असत ? ।।
वणवण शोधार्थ हिंडत । दमून येती घरास ।।८०।।

शंकर संध्याकाळी येत । मातापिता त्यास म्हणत ।।
बाळा, तू कोठे असे जात ? । काळजी आम्हा वाटते ।।८१।।
आई, तू अगदी मुळीही । करू नकोस काळजीही ।।
मी कोठेही जात नाही । शोधू नका कुठेही ।।८२।।
घरातच रहा बसून । त्रस्त न व्हा मज हुडकून ।।
मी येईन आपणहून । घरातच असा दोघेही ।।८३।।
ऐसे शंकर असे म्हणत । मातापिता दोघे ऐकत ।।
बाळा केवढा धीर देत । धन्यता वाटे दोघांना ।।८४।।
शंकर जाई अरण्यात । बिल्ववृक्षाखाली बसत ।।
ध्यान लावून निवांत । दृश्य मोठे मोहक ।।८५।।
वारा झुळूझुळू वहात । बिल्ववृक्षाचे पान गळत ।।
ते गिरक्या घेत घेत । पडे शंकरमस्तकी ।।८६।।
बिल्ववृक्षाच्या तळी धरणी । बिल्व पानांच्या आसनी
शंकर बसले ध्यान लावूनी । बिल्वदलेही शिरावर ।।८७।।
दृश्य इतके हे सुंदर । कोण वर्णन करणार ? ।।
कुणीच नव्हते पाहणार । उणीव होती याचीच ।।८८।।
जे जे दृश्य पहात । ते ते काहीही न सांगत ।।
बिल्व धरणी वायू असत । साक्षीदार, बघणारे ।।८९।।
अरण्यात जातायेताना । हिंस्त्र पशू भेटती नाना ।।
त्यांना पाहून मुळी ना । भ्याला शंकर कधीही ।।९०।।
हिंस्त्र पशू अत्यंत क्रूर । नुसते त्यांना पाही शंकर ।।
डोळे फिरवून गरगर । निघून जाती पशू ते ।।९१।।
'पशुपति शंकर' ज्याचे नाव । त्यांच्यावर कसा घालतील घाव ।।
घाव घालता उलटेच डाव । माहित होते पशूंना ।।९२।।
जनावरे हे ओळखीत । मनुष्यास मात्र हे न कळत ।।
निष्कारण जीभ विटाळीत । दु:खासागरी पडतात ।।९३।।
ध्यान संपल्यावरती येत । शंकर अंतापूर गावात ।।
कीर्तन - कथा देवळात । चालती तेथे थांबत ।।९४।।
मनोभावे ऐके कीर्तन । भजन ऐकून करी भजन ।।
कोठे चालता नामस्मरण । नामस्मरण करी तो ।।९५।।
सर्व धार्मिक कार्यक्रमात । मनोभावे भाग घेत ।।
सर्व कार्यात रंगून जात । नंतर घरी येतसे ।।९६।।
शंकराचे वागणे पाहून । जो तो चकित होऊन ।।
एवढे वय लहान असून । धार्मिक वृत्ती केवढी ? ।।९७।।
खाण्यापिण्याचे याचे वय । याला कशाचेच नाही भय ।।
धन्य याची असे माय । अध्यात्म याला आवडे ।।९८।।
अरण्यात ध्यानस्थ बसतो । कीर्तनास हजर असतो ।।
मंदिरातही भजन करतो । प्रवचन ऐके प्रेमाने ।।९९।।
अलौकिक याची असे रीत । ऐसा बालक कुठे न मिळत
लक्ष याचे परमार्थात । अन्य काही न आवडे ।।१००।।
शंकराच्या या वागण्यानी । लोक गेले हो मोहुनी
जो तो विचार करी मनी । सामान्य बालक नव्हे हा ।।१०१।।
अंतापुराच्या लोकांत । हाच विचार चर्चिला जात
सर्वांना अभिमान वाटत । शंकर आपल्या गावाचा ।।१०२।।
कोणी म्हणे हा न सामान्य नर । कोणी म्हणे हा अवतार
कोणी म्हणे हा ईश्वर । कोणी म्हणे शंकर ।।१०३।।
कोणी म्हणे याचा अधिकार ।कोणासही न कळणार
योग्यता याची असे फार । मानवी बुध्दीपलीकडे ।।१०४।।
लोक प्रभावित एवढे होत । मातापित्यास सर्व सांगत
मातापिता सर्व ऐकत । आनंद वाटे तयांना ।।१०५।।
आपल्या पुत्राविषयीचे । मत ऐकून लोकांचे
हृदय मातापित्यांचे । अभिमानाने भरतसे ।।१०६।।
सर्व अंतापूर गावात । शंकर हाच विषय चालत
आता पुढील अध्यायात । पुढचा कथाभाग पाहू या ।।१०७।।
नमून महाराज श्री शंकरा । बारसे, बाळलीला हा सारा ।।
अध्याय असे दुसरा । समाप्त येथे जाहला ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 3

वंदन शंकरमहाराजांस । आपल्या सर्व भक्तांस
या चरित्र - यज्ञास । करून घ्यावे सहभागी ।।१।।

महाराजांविषयी जो अज्ञ । त्याला हा चरित्र - यज्ञ ।।
करून सोडील पहा तज्ज्ञ । चरित्र - यज्ञ महती ही ।।२।।
शंकरमहाराज यज्ञरूप । भजता तराल संसारकूप ।।
भावनांचे टाकता तूप । यज्ञ होईल प्रज्वलित ।।३।।
बारसे झाले थाटात । शंकर लीला दाखवित ।।
लोक भारावून जात । बाळलीला पाहून ।।४।।
शंकराची व्यवस्था समस्त । मातापिता करी व्यवस्थीत ।।
त्याची सर्व काळजी घेत । सांभाळीत प्रेमाणे ।।५।।
उणीव त्याला भासू नये । कमी काही पडू नये ।।
त्रास त्याला वाटू नये । काळजी घेत नेहमी ।।६।।
उपासना शंकराची घरात । इकडे शंकरास सांभाळीत ।।
दिनचर्या दुहेरी चालत । चालली ऐशी शिवभक्ती ।।७।।
शिवास अभिषेक करीत । शंकरास अंघोळ घालत ।।
शिवास नैवेद्य दाखवीत । जेवू घालत शंकरा ।।८।।
इकडे शिव होई प्रसन्न । शंकर जाई आनंदून ।।
मातापिता जाती गढून । दिनचर्येत या परी ।।९।।
तेवढ्यात म्हणे शंकर । मी आता जातो दूर
आज्ञा द्यावी मज लवकर । विनंती मातापित्यास ।।१०।।
माता - पिता गहिवरले । ब्रह्मांड त्यांना आठवले ।।
ते काहीही न बोलले । तेंव्हा शंकर म्हणाला ।।११।।
आई - बाबा, दोघेही । माझी काळजी मुळीही ।।
करू नका कसलीही । लहान आता मी नसे ।।१२।।
तुमचे दु:ख जाईल । संतान जुळे होईल ।।
त्यात आनंदून जाल । सर्व व्यवस्थित होईल ।।१३।।
आपणास परवानगी देण्याची । न इच्छा मातापित्यांची ।।
शंकराने जाणून तसेची । राहिले ते घरात ।।१४।।
पुढे माता होई आनंदीत । शंकरकृपे तीज दिवस जात ।।
कडक डोहाळे लागत । मोहरून गेली ती ।।१५।।
पत्नीची अवस्था पाहून । चिमणाजी गेला हर्षून ।।
दोघे शिवोपासनेत रंगून । आनंदाने राहिले ।।१६।।
शंकर आपणा जे म्हणाले । त्याची प्रचिती आपणाला ।।
आली, वाकसिध्दी शंकराला । आहे, म्हणे चिमणाजी ।।१७।।
शंकरानी जे सांगितले । त्याचप्रमाणे घडून आले ।।
चिमणाजीस जुळे झाले । दोन पुत्र जन्मले ।।१८।।
जन्मोत्सवाचा आनंद । घरात अगदी निनादे मोद ।।
शंकराची त्याला साद । लोक चकित जाहले ।।१९।।
बारसे झाले वैभवात । लोक अंतापुरचे जमत ।।
खरे भाग्यवान चिमणाजी असत । लोक म्हणती सर्वही ।।२०।।
माता आनंदात डुंबत । चिमणाजी सुखात पोहत ।।
शंकर आपला व्यूह रचत । चिमणाजीस म्हणे तो ।।२१।।
आज्ञा द्यावी आता मजला । भाग इथला मम संपला
ईश्वरीय कार्य करण्याला । जाऊ द्यावे मज सुखे ।।२२।।
काही योगायोग असत । म्हणून तूमचा संग घडत ।।
वेगळेच माझे कार्य असत । सोडा मजला म्हणून ।।२३।।
माता - पिता गहिवरले । शंकरानी त्यांस वंदन केले ।।
आधी मातेचे चरण वंदिले । नंतर वंदन पित्यास ।।२४।।
शास्त्र सांगते सर्वांस । आधी वंदन मातेस ।।
नंतर करावे पित्यास । गूढ शास्त्रार्थ असे हा ।।२५।।
आधी पित्यास केले वंदन । नंतर मातेस केले नमन ।।
दोष येतसे यात घडून ।शास्त्रवचन असेच ।।२६।।
प्रथम पूजा करावी गुरूची । नंतर करावी देवाची ।।
आज्ञा असे ही शास्त्राची । शास्त्रवचन असेच ।।२७।।
आधी पूजा केली देवाची । नंतर केली गुरूंची ।।
निष्फलता त्या पूजेची । दोष लागे, शास्त्र हे ।।२८।।
माता - पित्यास वंदून । आज्ञा त्यांची मिळवून ।।
अंतापूर गावातून । शंकर महाराज निघाले ।।२९।।
महाराज जाता घरातून । उभयतांना वियोग होऊन ।।
ऊर आले दाटून । वियोग दु:ख ओसंडे ।।३०।।
दोघांस लागली हूरहूर । वियोग दु:खात दोघे चूर ।।
आठवणींचा मनी पूर । काळ ऐसा चालला ।।३१।।
वियोग दु:खावर जहाल । औषध रामबाण काळ ।।
निसर्गाची ही कमाल । फार मोठी असेच ।।३२।।
जसजसा काळ हो जाई । तसतसे वियोगदु:ख कमी होई ।।
पुढे तर आठवण बूजून जाई । काळ असा समर्थ ।।३३।।

जाताना अंतापूरातून । लोक त्यांचे घेती दर्शन ।।
मार्गातील झाडे वाकून । नमन करती शंकरा ।।३४।।
अंतापुरातून जाताना । सर्वांनी पाहिले महाराजांना
पुढे कोणत्याही लोकांना । दिसले नाहीत शंकर ।।३५।।
तीन पावलात त्रिभुवन । ज्यांनी टाकले व्यापून ।।
त्यांना अशक्य काय अजून । अंतराची तमा ना ।।३६।।
कोठे अंतापूर नगर । कोठे हिमालय शिखर ।।
विस्तीर्ण केवढे अंतर । त्यातून अष्टवक्र हे ।।३७।।
शक्य कसे चालत जाणे । चालत अशक्य पोचणे ।।
त्यातून हिमालय चढत जाणे । मानवास अशक्य ।।३८।।
परी शंकर महाराज । चढून गेले नगराज ।।
न चालताच अगदी सहज । हिमालयावर गेले ते ।।३९।।
निसर्ग सारा पाहिला कांही दिवस मुक्काम केला ।।
नंतर हिमालय धुंडाळला । प्रसन्न त्यांना वाटले ।।४०।।
नंतर केदारेश्वरावर जाऊन । बारा वर्षे तेथे राहून ।।
नंतर प्रयाग क्षेत्र पाहून । निवास केला त्या स्थळी ।।४१।।
गंगा नदी अध्यात्माची । यमुना नदी विज्ञानाची ।।
सरस्वती ती भक्तीची । त्रिवेणी संगम प्रयाग ।।४२।।
गंगा - यमुना सरस्वती । त्रिवेणी संगम पवित्र अती ।।
याच त्या संगमावरती । राहिले महिने पंधरा ।।४३।।
त्रिवेणी संगमावरी । राहिला जणू त्रिनेत्रधारी ।।
निवांत तेथे वास करी । स्नान तीनही नद्यांत ।।४४।।
तिन्हीही नद्या संगमात । महाराजांस स्पर्श करीत ।।
स्पर्श होता पावन होत । संगम तो सर्वही ।।४५।।
महाराज शिरता पाण्यात । तिन्ही नद्यांची धांदल उडत ।।
प्रथम स्पर्श आपणा हवा असत । तिन्ही नद्यांचे मानस ।।४६।।
महाराज एका क्षणात । तिघींनाही संतुष्ट करीत ।।
पाण्याची हालचाल जी होत । पाहण्यासारखी असेच ।।४७।।
हजारो माणसे संगमावर । स्नान करून म्हणती शंकर
कोण त्यांना ओळखणार । उभा असून शंकर ।।४८।।
तीर्थाचे तीर्थत्व वाढावे । क्षेत्रांचे क्षेत्रत्व चढावे ।।
पावित्र्याचे पावित्र्य खुलावे । म्हणून जाती सर्वत्र ।।४९।।
कोणी आपणास पाहू नये । कोणी आपणास ओळखू नये ।।
कोणास आपण कळू नये । योजना त्यांची होतीच ।।५०।।
हे नवीन गृहस्थ कोण । येथे आले कोठून ? ।।
काय येण्याचे प्रयोजन । कल्पना कोणा नसेच ।।५१।।
तीर्थक्षेत्रांना भेटी देत । अनेक देशांत हिंडत ।।
फिरले सारा भारत । गेले युरोपमध्येही ।।५२।।
सर्वत्र महाराजांचा संचार । जनमनांचा घेत समाचार ।।
करण्या लोकांचा उध्दार । योजना त्यांची होती ही ।।५३।।
महाराज विविध ठिकाणी । विख्यात विविध नावांनी ।।
लीला त्यांच्या विविध असूनी । अतर्क्य करणी तयांची ।।५४।।
सातपुडा या भागात । सुपड्याबाबा त्यांना म्हणत ।।
मध्यप्रदेशात विख्यात । 'गौरीशंकर' म्हणूनी ।।५५।।
देवियाबाबा म्हणून ख्यात । गुजराथ या देशात ।।
जॉनसाहेब त्यांना म्हणत । युरोपाखंडामधेच ।।५६।।
रहीमबाबा म्हणून । ओळखतात त्यांना यवन ।।
शंकरमहाराज म्हणून । महाराष्ट्रात ज्ञात ते ।।५७।।
कुंवर स्वामी समर्थ । म्हणतात खानदेशात ।।
ख्यात पाश्चात्य देशात । सेंट जॉनसन साहेब ।।५८।।
पंढरीनाथ पंढरपूरात । टोंबो म्हणत आफ्रिकेत ।।
नूरमहंमदखान अरबस्तानात । लहरीबाबा मध्यप्रांतात ।।५९।।
मद्रासकडे गुरूदेव म्हणत । अशीच विविध नावे असत ।।
प्रत्येक देशात ते राहत । सहस्त्रनामे तयांची ।।६०।।
विविध प्रकारच्या देशांत । विविध नावाने प्रख्यात
परी सर्व हे महाराजच असत । कळणार कोणा कसे ते ? ।।६१।।
परमार्थ म्हणजे काय असे । हे लोकांना कळावे तसे ।।
उध्दार होण्या वागावे कसे । म्हणून त्यांचा संचार ।।६२।।
उध्दार लोकांचा होण्यास । परमार्थ त्यांना कळण्यास ।।
भक्तिभाव अंतरी उमलण्यास । लीला करीत महाराज ।।६३।।
विविध अशा प्रसंगात । विविध चमत्कार ते करीत ।।
सन्मार्गास लोकां लावीत । लीला त्यांच्या विचित्र ।।६४।।
सर्वत्र संचार त्यांचा होत । नंतर आले महाराष्ट्रात ।।
प्रथम प्रज्ञापूर नगरात । पौर्णिमा होती त्या दिवशी ।।६५।।

अक्कलकोटस्वामींचे चरण । अगदी डोळे भरून पाहून ।।
त्यांनी साष्टांग वंदन करून । मिठी मारली चरणास ।।६६।।
दर्शन स्वामींचे घेऊन । अष्टभाव आले दाटून ।।
महाराज गेले आनंदून । अपूर्व दर्शन जाहले ।।६७।।
साष्टांग करता नमस्कार । अक्कलकोट स्वामी तुष्टले फार ।।
आनंद दोघांही हो अपार । स्वामी समर्थ प्रगटले ।।६८।।
उठवून शंकर महाराजांस । भेटले एकमेकांस ।।
दोघांचेही त्या समयास । बोलणे झाले निवांत ।।६९।।
समर्थांच्या समाधीने । ऐकिले उभयंताचे बोलणे ।।
समर्थांच्या आज्ञेने । तेथून निघाले महाराज ।।७०।।
सोडूनिया प्रज्ञापूर । गाठले त्यांनी सोलापूर ।।
आपल्या नादात असती चूर । आले दत्त चौकात ।।७१।।
त्या दत्त चौकातून । जुने दत्तमंदिरावरून ।।
शुभराय मठ देखून । महाद्वारी थांबले ।।७२।।
त्या शुभराय महाराज मठात । मठाधिपती महंत ।।
जनार्दनबुवा ते असत । भगवद्भक्त संत ते ।।७३।।
मठाच्या सभामंडपात । जनार्दनबुवा भजन करीत
भजनात अगदी रंगून जात । गात शास्त्रोक्त संगीत ।।७४।।
त्यावेळी रागदारीत । भजन त्यांचे चालले असत ।।
जनार्दनबुवा खड्या आवाजात । राग गाती शंकरा ।।७५।।
शंकरा राग शंकर ऐकत । उभे महाद्वारात ।।
उभे राहूनच ते गर्जत । अल्लख म्हणून जोराने ।।७६।।
जनार्दनबुवा भजनात । अगदी तल्लीन झाले असत ।।
त्यांच्या कानी गर्जना पडत । पाहू लागले तिकडेच ।।७७।।
त्यांना महाद्वारात । भगवान दत्तात्रेय दिसत ।।
दिव्य तेजस्वी अद्भुत । दर्शन झाले बुवांना ।।७८।।
रूप अत्यंत मनोहर । मनमोहक अति सुंदर ।।
आनंदले बुवा फार । भावावस्था प्रकटली ।।७९।।
अष्टसात्विक भाव सगळे त्या वेळी जागृत झाले ।।
मन आनंदाने मोहरले । अनुभव दिव्य घेत ते ।।८०।।
काही वेळ असाच जात । बुवा मग भानावरती येत ।।
लगेच महाद्वार ते गाठत । दिसले शंकर महाराज ।।८१।।
पाहून महाराज श्री शंकर । घातला साष्टांग नमस्कार ।।
आनंदून गेले फार । जनार्दनबूवा त्या वेळी ।।८२।।
जनार्दनबूवानी धरून हात । महाराजांस नेले मठात ।।
जमलेले लोक दर्शन घेत । भक्तिभावे आदरे ।।८३।।
बूवांनी पाहून महाराजांना । ठेवून घेतले आपल्या सदना ।।
आनंद वाटे त्यांच्या मना । महाराज येता मठात ।।८४।।
महाराज शुभराय मठात । कोणाकोणास हे कळत ।।
दर्शनासाठी लोक येत । शुभरायांच्या मठात ।।८५।।
महाराज आल्यापासून । शुभराय मठ गेला फुलून ।।
गर्दी लोकांची होऊन । लोक येती दर्शना ।।८६।।
शंकर महाराज रहात । शुभरायमहाराज मठात
बरेच दिवस मुक्काम असत । महाराजांचा मठात ।।८७।।
शंकर महाराज पहा तसे । रूप काळेसावळे असे ।।
शरीरयष्टी खुजी दिसे । अष्टावक्र बांधाच ।।८८।।
दोन्हीही डोळे टपोरे । हि-यासारखे चमकणारे ।।
मोठे, तेजस्वी ते पुरे । भव्य भालप्रदेश ।।८९।।
दाढी - मिशा भारदार । डोक्यावरती केस फार ।।
हा सर्व केशसंभार । अस्ताव्यस्त नेहमी ।।९०।।
महाराज नेहमी असत । अगदी बालभावात ।।
बालकासारखेच वागत । हातवारे तसेच ।।९१।।
महाराजांचे हासणे । निरागस, बालकाप्रमाणे ।।
महाराजांचे बोलणे । बालकासम बोबडे ।।९२।।
महाराजांचे बोल बोबडे । समजण्यास पडे मोठे कोडे ।।
नवीन माणसा न उलगडे । महाराजांचे बोल ते ।।९३।।
बोल त्यांचे ऐकू येई । परी शब्दांचा उलगडा न होई ।।
बोलणे वा-यावरती जाई । बोध न होई मुळीच ।।९४।।
चहा, सिगारेट आणि खिचडी । यांची त्यांना विशेष गोडी ।।
या वस्तूवर विशेष आवडी । महाराजांची असेच ।।९५।।
आजानुबाहू महाराज । गुडघ्याखाली अगदी सहज ।।
हात पोचत, हा करसाज । अक्कलकोटस्वामीसम ।।९६।।
दोन्ही हातांच्या बोटात । अंगठ्या महाराज घालत ।।
आठ बोटे ती चमकत । सुवर्णमुद्रांमुळेच ।।९७।।

या अंगठ्यामधली । रत्ने जी जडवलेली ।।
चमकत आसती पहा सगळी । अंगठ्यांचे वैचित्र्य ।।९८।।
महाराज वाढवीत दाढी जटा । डोक्यास जरीचा भव्य फेटा ।।
गळ्यात शोभे सुवर्णकंठा । रत्नजडित साज हा ।।९९।।
कधी पँट कधी धोतर । घालीत छाटी कधी विजार
कधी रेशमी पितांबर । कधी तर ते दिगंबर ।।१००।।
कधी सदरा घालत । कधी उपरणे पांघरत ।।
अंगावर कधी शाल घेत । कधी उघडे रहात ।।१०१।।
कधी सर्व हे वापरीत । कधी सर्व फेकून देत ।।
कधी केव्हा काय करत । नियम काही मुळी ना ।।१०२।।
कधी भरजरी पोषाखात । रत्नजडित अलंकार असत ।।
महाराज राजश्वर्यात । राजयोगी महान ।।१०३।।
कधी जात गोवा प्रांतात । कधी असत गुजराथेत ।।
कधी रहात केरळात । कधी आंध्रप्रदेशी ।।१०४।।
कधी कर्नाटकात । कधी उत्तर प्रदेशात ।।
कधी पाश्चिमात्य देशात । कधी महाराष्ट्रात ।।१०५।।
प्रवास एवढा अचाट । एवढ्या दूरचा अफाट ।।
करीत अगदी बिनबोभाट । कसा करीत गूढ हे ।।१०६।।
अंग तर वाकडे असे । चालत जाणे शक्य नसे ।।
एवढे प्रवास केले कसे ? । त्यांचे त्यांनाच ठाऊक ।।१०७।।
वंदून शंकर महाराजांस । महाराजांचे प्रवास ।।
तिसरा अध्याय हा खास । येथे झाला समाप्त ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 4

अतर्क्य ज्यांची असे किमया । सर्वत्र ज्यांची वसे छाया
या महाराजांच्या पाया । साष्टांग वंदन त्रिवार ।।१।।
विचित्र तुमची दिसे काया । आनंद होतो गुण गाया ।।
तुमचे चरित्र सुगंधफाया । सुगंध दरवळे त्रिभुवनी ।।२।।
आपल्या चरित्रसुगंधात । मन झाले सुगंधित ।।
सव्यकर स्फुरण पावत । चरित्र लिहिण्या उत्सुक ।।३।।
चरित्र अगाध अतर्क्य दिव्य । गुंतागुंतीचे, अतिभव्य ।।
लिहिणे मानवास असंभाव्य । कर्ता करविता आपण ।।४।।
आपण मला सुचविता । आपणच मला सांगता ।।
विवाद्य स्थळी कौल देता । लिहून घेता आपण ।।५।।
महाराजांचे समस्त । चरित्र मला तरी अज्ञात ।।
कधी न काही ऐकले नसत । पाहीले न कधी महाराज ।।६।।
सोलापूरचे व्यापारी । कापडदुकान ज्यांचे भारी ।।
स्वातंत्र्यसैनिक ख्याती तरी । देव देश भक्त जे ।।७।।
निष्ठा ज्यांची महाराजांवरी । महाराजांविषयी श्रध्दा खरी ।।
नित्य महाराज ज्यांच्या अंतरी । ॐकारनाथ भस्मे हे ।।८।।
या माहात्म्यामुळे मी वळलो । हे चरित्र लिहिण्यास सरसावलो
या कार्यास प्रवृत्त झालो । दिपून गेलो लीलेने ।।९।।
ॐकारनाथांच्या सत्संगात । महाराजांचा संग घडत ।।
महाराजांच्या समाधीचे होत । दर्शन पुणे नगरीत ।।१०।।
माथे टेकविले मी समाधीवर । म्हणती मज महाराज शंकर ।।
चरित्र सुरू करावे सत्वर । आधार भस्मे आहेत ।।११।।
माझा आधार अप्रत्यक्ष । भस्मे आधार प्रत्यक्ष ।।
आम्ही दोघे एकच साक्ष । जाणवेल तूलाही ।।१२।।
ऐसे वदता महाराजांनी । सोलापुरी मी येऊनी ।।
महाराजांस वंदन करुनी । ग्रंथ प्रारंभिला हा ।।१३।।
महाराज सोलापूरात । शुभरांयाच्या मठात असत ।।
एकदा भजन चालले जोरात । सारे दंग भजनात ।।१४।।
सारे शंकरमहाराजरूप बनत । चमत्कार हा केवढा असत ।।
कोण महाराज ? । कोण भक्त ? । कुणालाही कळेना ।।१५।।
महाराज जनार्दनबूवाला । म्हणाले अक्कलकोटाला ।।
जाऊ आपण योग भला । चाळीस भक्त निघाले ।।१६।।
अक्कलकोट स्वामी समर्थ । त्यांच्या समाधी मठात ।।
येऊन सारे वंदन करत । शंकर महाराज म्हणाले ।।१७।।
‘हेच माझे सद्गुरू असत’ । ऐसे म्हणून माथा टेकवित ।।
गुरू – शिष्यांची भेट होत । अपूर्व हा सोहळा ।।१८।।

काही दिवस येथे राहून । महाराज येथून निघून ।।
त्र्यंबकेश्वराला जाऊन । निवांत तेथे राहिले ।।१९।।
रामभाऊ अकोलकर । महाराजांचे भक्तवर ।।
त्यांच्या सदनी मुक्काम तर । महाराजांचा असेच ।।२०।।
त्र्यंबक आणि शंकर । भेट होता खरोखर ।।
बहरून गेले त्र्यंबकेश्वर । निष्ठावंत जाणत ।।२१।।
शंकर आणि त्र्यंबक । हे दोघेही असती एक ।।
नैष्ठिक भाविक निवडक । भक्ता प्रचिती येतसे ।।२२।।
एक दशग्रंथी ब्राह्मण । महाराजांचे धरून चरण ।।
म्हणे मी तुम्हा शरण । प्रसाद द्यावा मज काही ।।२३।।
महाराज म्हणाले ब्राह्मणाला । मी प्रसाद देतो तूजला ।।
तू खाणार नाहीस, मग कशाला । तूजला देऊ प्रसाद ।।२४।।
ब्राह्मण म्हणे निश्चय करून । खात्रीने प्रसाद खाईन ।।
कागदाची पुडी करून । प्रसाद दिला ब्राह्मणाला ।।२५।।
आनंदाने ब्राह्मण जात । घरी जाऊन पुडी उघडत ।।
कोंबडीची चार अंडी दिसत । ब्राह्मण मनी भडकला ।।२६।।
मी भिक्षुक वैदिक पवित्र । प्रसाद अभक्ष अपवित्र ।।
फेकून उकिरड्यावर मात्र । सचैल स्नान करितसे ।।२७।।
तेवढ्यात अकोलकर येऊन । म्हणती शास्त्रीबूवास देखून ।।
'या वेळी हो कसले स्नान ?' । चवताळून द्विज म्हणे ।।२८।।
तुमच्या महाराजांचा प्रसाद तर । दिली कोंबडीची अंडी चार ।।
फेकून दिली उकिरड्यावर । म्हणून सचैल स्नान हे ' ।।२९।।
ब्राह्मणास म्हणती अकोलकर । 'कोठे प्रसाद ? दावा सत्वर' ।।
दोघे गेले उकिरड्यावर । कागदात आंबे चार होते ।।३०।।
ब्राह्मण अगदी ओशाळला । तोबा तोबा करू लागला ।।
पश्चाताप झाला त्याला । लोटांगण पुन्हा घातले ।।३१।।
आंब्याची अंडी होत । अंड्याचे आंबे बनत ।।
चमत्कृती ही अपूर्व होत । महाराजांचे वैशिष्ट्य ।।३२।।
ऐसे अनंत चमत्कार । महाराजांनी केले फार ।।
चकीत होती सुरवर । कळतील कैसे मानवा ? ।।३३।।
नंतर सोडले त्र्यंबकेश्वर । पुण्यास आले महाराज शंकर ।।
भक्तजन जमती नारीनर । पुण्यात निवांत राहिले ।।३४।।
अनेक गावांना पुण्याहून । महाराज आले जाऊन ।।
परी कायम वास्तव्याचे स्थान । पुणे त्यांनी ठरविले ।।३५।।
पुण्यात लष्कर भागात । एक विदेही यवन स्त्री रहात ।।
त्या बाईचे नाव असत । हजरत बाबाजान हे ।।३६।।
महाराज कोण ? हे ओळखे ही बाई । महाराजांस म्हणजे आई ।।
प्रत्यक्ष अल्ला भूवर येई । ऐसी निष्ठा बाईची ।।३७।।
सलाम करी सदोदित । तिच्या आग्रहावरून रहात ।।
काही दिवस लष्कर भागात । महाराज ते आनंदे ।।३८।।
एकोणीसशे पस्तीत साली । प्राध्यापक भालचंद्र देव यांनी ।।
प्रश्न आपले वय किती ? । महाराजांना विचारला ।।३९।।
मी दीडशे वर्षाचा असून । दुस-या पेशवाच्या हातून ।।
दक्षिणा धेतली भोजन करून । शनिवारवाड्यामधेच ।।४०।।
ऐसे महाराज उत्तर देत । काहींना महाराज सांगत ।।
आमचे वास्तव्य होते खानदेशात । कुंवरस्वामी म्हणून ।।४१।।
माझे मूळ नाव गौरीशंकर । राजाधिराज म्हणून कुंवर ।।
आमचे समाधी मंदिर । वाघोडात असेच ।।४२।।
पुढे पुण्याहून गेले नगरला । तेथून पुण्यक्षेत्र मढीला ।।
नाथांच्या पुण्यसमाधीला । वंदन केले सर्वांनी ।।४३।।
कित्येक वर्षांची धूनी शांत । महाराज जेंव्हा अल्लख म्हणत ।।
तेव्हा आपोआप धूनी पेटत । चकीत झाले सर्वही ।।४४।।
प्रज्वलीत केली तेथली धूनी । साधनेचे महत्व पटवूनी ।।
उत्तम प्रथा आचराव्या म्हणूनी । महाराज सर्वा सांगत ।।४५।।
यल्लूबाई माने सुविख्यात । प्रसिध्द गायिका त्या असत ।।
घरच्या चांगल्या श्रीमंत । फार भाविक होत्या त्या ।।४६।।
एकदा नृसिंहवाडीत । त्यांची महाराजांशी गाठ पडत ।।
फार उत्तम या गातात । महाराजांना समजले ।।४७।।
महाराजांनी यल्लूबाईस । सांगितले गावयास ।।
सुस्वर राग आळविण्यास । सुरूवात केली बाईनी ।।४८।।
शिवास आवडे संगीत । गाणे ऐकून महाराज डोलत ।।
यल्लूबाईवर प्रसन्न होत । आशीर्वाद देत ते ।।४९।।
येल्लूबाई आंनदीत । आशीर्वाद ऐकून होत ।।
पुण्यातील त्यांच्या वाड्यात । महाराज गेले एकदा ।।५०।।

यल्लूबाई एकास । सांगत होती कृष्ण लीलेस ।।
कृष्ण कसा रांगतसे खास । तोच चमत्कार जाहला ।।५१।।
महाराज दुडुदुडू रांगत । परी प्रत्यक्ष कृष्णच दिसत ।।
यल्लूबाई चकीत होत । चमत्कार सारे पाहती ।।५२।।
यल्लूबाईची भावना तीक्ष्ण । म्हणून महाराज झाले कृष्ण ।।
जसे भावनेला उधाण । लाभ तैसा मिळतसे ।।५३।।
सोलापूर शुभराय मठात । बाबा जक्कल दर्शना येत ।।
त्यांना महाराज स्पष्ट दिसत । श्रीपाद श्रीवल्लभ ।।५४।।
कार्तिकी एकादशीचा दिवस असत । पुण्यास मेहेंदळे वाड्यात ।।
ताईसाहेब कीर्तन करत । सुंदर ते ध्यान गात त्या होत्या ।।५५।।
महाराज, बालगंधर्वही असत । बालगंधर्व खूष म्हणत ।।
'पांडूरंगाचे दर्शन बाकी असत । एवढा अभंग रंगला' ।।५६।।
तोच महाराज उभे राहत । सर्वां पांडूरंगच दिसत ।।
प्रत्यक्ष अनुभूती सर्वा येत धन्यता वाटे सर्वांस ।।५७।।
गंधर्व नाटक मंडळीत । महाराज पडदे ओढीत ।।
एकदा महाराज पाहण्या जात । गंधर्वांचे नाटक ।।५८।।
बालगंधर्वांचा बसत । आवाज अगदी काम न देत ।।
नाटकाची तर वेळ होत । तिकिट विक्री जाहली ।।५९।।
औषधे घेतली अनेक । नवसही बोलले ते कैक ।।
नाटकाचा बदलावा का दिनांक । येथपर्यंत पाळी ये ।।६०।।
कळता, महाराज तात्काळ । गेले बालगंधर्वांजवळ
आपल्या मुखातील विडा सकळ । गंधर्वमुखी घातला ।।६१।।
महाराजांचा प्रसाद असत । म्हणून बालगंधर्व विडा खात ।।
लगेच आश्चर्य पहा घडत । आवाज सुटला संपूर्ण ।।६२।।
त्या दिवशीचे नाटक होत । अगदी जोरदार सर्वांत ।।
प्रेक्षक अगदी रंगून जात । शंकरलीला अशी ही ।।६३।।
बालगंधर्व एक दिन । आपले सहकारी घेऊन ।।
जात गाणगापूरी घेण्या दर्शन । दर्शन घेतले सर्वांनी ।।६४।।
स्टेशनवर आले संध्याकाळी । कळले गाडी उद्या सकाळी ।।
उपाशीच होती सर्वं मंडळी । हॉटेलही तेथे नव्हतेच ।।६५।।
भूकेने सारे व्याकुळले । उपाशीच सर्वही झोपले ।।
रात्री एकाने त्यांना पुकारले । उपाशी का झोपता ? ।।६६।।
गरम पूरीभाजी तयार । उठले सारे सत्वर ।।
खाल्ली पूरीभाजी पोटभर । बील विचारू लागले ।।६७।।
हॉटेलवाला म्हणे घाई न । बील उद्या द्या आणून ।।
सारे चकित होऊन । एकमेकास म्हणतात ।।६८।।
काहीच येथे नसून । हॉटेल आले कसे कोठून ? ।।
बील उद्या द्या सांगून । हॉटेलवाला गेलाही ।।६९।।
सकाळी पाहतात उठूनी । हॉटेल तेथे मूळीच नसूनी ।।
सारे गाडीत बसूनी । सोलापूरी परतले ।।७०।।
गेले महाराजांच्या दर्शना । महाराज म्हणती गंधर्वांना ।।
रात्रीच्या पूरीभाजीचे बील द्याना । चपापले सर्वही ।।७१।।
कोण होता हॉटेलवाला ? । रात्री कोणी दिले खायला ? ।।
कळले तेव्हा सर्वांना । महाराजांची लीला ही ।।७२।।
गंधर्व म्हणाले बील किती ते ? । महाराज वदले मी मागेन ते ।।
देणार काय सांग पूरते । जरून देईन महाराज ।।७३।।
महाराज वदले 'प्रति गुरूवार दिन । करावे शास्त्रोक्त संगीत भजन'
महाराज आज्ञा प्रमाण मानून । संगीत भजन चालले ।।७४।।
एकदा महाशिवरात्रीस । पुणे महेंदळे वाड्यास ।।
भजन - किर्तन गाण्यास । गर्दी फार जाहली ।।७५।।
महाराज हसून म्हणत । 'आज महाशिवरात्र असत ।।
मंदिर एकदाच असे उघडत' । सारे पाहू लागले ।।७६।।
महाराजांचा रंग बदलत । नीलवर्ण महाराज बनत ।।
महाराज प्रत्यक्ष शिव दिसत । महाशिवरात्र खरी ही ।।७७।।
बेल सर्वांनी शिवावर । वाहून मस्तकी चरणांवर ।।
दर्शन घेतले सत्वर । धन्यता वाटे सर्वांस ।।७८।।
महाराजांना अन्नपूर्णा । प्रसन्न अगदी पहाणा ।।
नव्हे, होती ही अन्नपूर्णा । महाराजांच्या आज्ञेत ।।७९।।
डॉक्टर हरी त्र्यंबक खरे यांस । सुरू असलेल्या उत्सवास ।।
पाच शेर धान्य आणावयास । महाराज सांगत ।।८०।।
धान्ये, डाळ - तांदूळ, गहू ही । प्रत्येकी पाच शेर आणूनी।।
महाराजांच्या पुढती वंदूनी । डॉक्टर खरे ठेवीत ।।८१।।
धान्य घेऊन आत जात । महाराज खोली बंद करत ।।
'कुणा येऊ न द्यावे आत' । महाराज सांगत ।।८२।।

एकटेच महाराज खोलीत । अन्नपूर्णेची पूजा करत ।।
पूजा करून बाहेर येत । सर्वां प्रसादा सांगती ।।८३।।
उत्सवाच्या शेवटच्या दिनी । त्याच धान्याचा स्वयंपाक करूनी ।।
पाच हजार माणसे जेवूनी । तृप्त अगदी जाहली ।।८४।।
पाच शेर धान्यात । पाच हजार माणसे जेवत ।।
असे अनेक प्रसंग घडत । शंकरलीला अपूर्व ।।८५।।
महाराज असता खुषीत । सांगत कथा पूर्ववृत्तांत ।।
म्हणाले मी होतो सर्कशीत । नाटकाचे पडदे ओढले ।।८६।।
मी फार वर्षापूर्वी । तमाशात सोंगाड्याचे काम करी
चिलया बाळाचा वग त्या दिनी । स्टेजवरती चालला ।।८७।।
शंकराची आज्ञा होताच । मी उडविले चिलयाचे मुंडकेच ।।
सांगितले तसे मी केलेच । यात चुकले काय मम ? ।।८८।।
गडबड लोकांनी करून । केला पोराचा खून म्हणून ।।
पोलिसाकडून मज पकडून । तमाशा सारे पहात ।।८९।।
सदगुरूस्वामींचे स्मरण केले । तिरकमट घेऊन स्वामी आले
संजीवनी मंत्र वदले । मुंडके जोडले मुलाचे ।। ।।९०।।
मुलगा उठूनिया बसला । कडकडाट टाळ्यांचा झाला
मी सोडून तमाशाला । पळून गेलो त्या क्षणी ।।९१।।
माझ्या मागे लागले स्वामी । नदी तीरावर पडलो मी ।।
तेव्हा मजला म्हणती स्वामी । शंकर माझे ऐक तू ।।९२।।
नको गुंतू मायाजाळात । तुझे वाकडे पाय असत ।।
म्हणून लोक तुझा तमाशात । उपयोग करून घेतात ।।९३।।
जगाच्या या तमाशात । दाखववायाचे सत्य जे असत ।।
हेच तुझे कार्य असत । अवतार तुझा त्यासाठी ।।९४।।
दुसरी कथा महाराज सांगत । माझे मातापिता वृध्द असत ।।
मज घेऊन पंढरी जात । प्लेग मजशी जाहला ।।९५।।
प्लेगाचे चार गोळे उठले । अगदी सारेही घाबरले ।।
स्वामींचे मी स्मरण केले । स्वामी आले धावून ।।९६।।
त्यांनी हाती चक्र घेऊन । चार गोळे काढले कापून ।।
म्हणून आठ ठिकाणी वाकून । अष्टावक्र झालो मी ।।९७।।
ऐसे महाराज सांगत । आपला पूर्ववृत्तांत ।।
आपण काय केले असत । अष्टवक्र कसा मी ? ।।९८।।
एकदा महाराजांच्या मनात । तुळजापूरी जाण्याचे येत ।।
महाराज भक्तासमवेत । गेले तुळजापूरात ।।९९।।
भवानी मातेच्या मंदिरात । भाविकांची गर्दी असत
या प्रचंड गर्दीत । उभे कोठे रहावे ? ।।१००।।
मंदिरातील ओवरीत । महाराज जाऊन थांबत ।।
भक्तही मग तेथे जात । ओवरीत थांबले ।।१०१।।
थोड्या वेळानी महाराजांस । सारे सांगती उठावयास ।।
भवानी मातेच्या दर्शनास । आपण आता जाऊ या ।।१०२।।
सर्वांना महाराज म्हणत । देवी काय फक्त मंदिरात ? ।।
येथे काय देवी नसत ? । इथेच घ्या दर्शन ।।१०३।।
महाराज ध्यानस्थ बसत । तोंच नवल असे घडत ।।
प्रत्यक्ष स्पष्ट दर्शन घडत । तुळजाभवानी देवीचे ।।१०४।।
सर्वांनी दर्शन घेतले । भक्त अगदी आनंदले ।।
सालंकृत दर्शन घडले । जगन्माऊली मातेचे ।।१०५।।
पुन्हा दर्शन असता घेत देवीच्या ठिकाणी महाराज दिसत ।।
थक्क होती सारे भक्त । अधिकार त्यांचा पाहून ।।१०६।।
येथे काय देवी नसत ? । येथेच घ्यावे दर्शन ।।
महाराजांनी आपले शब्द । खरे करून दाखविले ।।१०७।।
शंकर महाराजांच्या चरणी । आनंदाने वंदन करूनी ।।
चौथा अध्याय या ठिकाणी । पूर्ण असे जाहला ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 5

शंकर महाराजांचे चरण । देखून बहरले पंचप्राण
जे सौख्याची असती खाण । वंदन त्यांना असो हे ।।१।।
वंदन करा महाराजांना । आनंद होई अपार मना ।।
महाराजांचे गुण गाताना । बहरुन येते शरीर ।।२।।
एकदा भक्तांच्या समवेत । महाराज बसलेले असत ।।
आरडाओरडा गोंधळ होत । शेजारीच, लोकांचा ।।३।।

एक मोठा नाग निघत । त्याला मारण्याचा प्रयत्न चालत ।।
महाराज तेथे धावून जात । खवळलेला नाग तो ।।४।।
महाराज त्याच्या जवळ जात । नाग पायास विळखा घालत ।।
बेभानपणे फणा काढत । नाग फुसफुसू लागला ।।५।।
महाराजांनी फण्यावरूनी । प्रेमाने हात फिरवूनी ।।
नागराज शांत व्हावे, म्हणूनी । गोडीत त्याला सांगितले ।।६।।
नागराज अगदी शांत होत । पायाचा विळखा काढत ।।
मानेनेच त्यांना वंदन करीत । कोण हे ? त्याने ओळखले ।।७।।
हातात घेऊन नागराज । अरण्यात गेले महाराज ।।
शंकराचा हा दिव्य साज । तेथे दिला सोडून ।।८।।
वाठार गावचा मल्ल असत । शक्तीची त्याला मस्ती चढत ।।
अनेक गावात तो प्रख्यात । चालला डौलत रस्त्याने ।।९।।
मल्ल होता जणू महान हत्ती । महाराज अचानक तेथे येती ।।
बसती त्याच्या खांद्यावरती । मल्ल घामाघूम होत ।।१०।।
महाराजांच्या ओझ्यानी । दमछाक त्याची होऊनी ।।
रडकुंडीस अगदी येऊनी । शरण आला महाराजा ।।११।।
महाराज उतरले खांद्यावरुन । मल्लाने धरले त्यांचे चरण ।।
मनी म्हणे अवलिया हे महान । आश्चर्य मोठे मज वाटे ।।१२।।
महाराज म्हणती मल्लास । तूजला कुस्ती जिंकावयास ।।
मार्ग एक सांगतो खास । गावजेवण द्यावे तू ।।१३।।
आत्ताच दवंडी पिटवावी । सर्वांस जेवण्या बोलवावे ।।
मल्ल म्हणे काहीच न मजठायी । फजिती होईल दवंडीने ।।१४।।
महाराज म्हणाले मल्लाला । मी असता काळजी कशाला ? ।।
जेवण्या बोलाव सर्वांना । आमंत्रिले गावास ।।१५।।
त्या दिवशी महाराजांनी । शेरभर तांदूळाची खिचडी करुनी ।।
अन्नपूर्णेची पूजा करूनी । म्हणती पाने वाढा हो ।।१६।।
पंक्तीवर पंक्ती बसत । हजारो माणसे जेवत ।।
गाव सारा तृप्त होत । फक्त शेरभर खिचडीत ।।१७।।
पुढे कुस्ती ठरली पुण्याला । मल्लास विजय मिळाला ।।
खांद्यावर घेऊन मल्लाला । विजय मिरवणूक निघाली ।।१८।।
अक्कलकोट महाराज मठाजवळ । शंकर महाराज उभे असत ।।
मल्लानी पाहता ये धावत । पाय धरले घट्टच ।।१९।।
मल्लाने आपल्या खांद्यावर । महाराजांस घेतले सत्वर ।।
बेलबागेपर्यंत जोरदार । मिरवणूक काढली ।।२०।।
एकदा महाराज पुण्यात । होते एका भक्ताच्या घरात ।।
तेरा पत्रे भक्ताच्या हातात । पोष्टमनने दिलीच ।।२१।।
दूरदूरच्या विविध ठिकाणी । विविध उत्सव चालले असूनी
उत्सवास महाराज हजर असुनी । उल्लेख ऐसा पत्रात ।।२२।।
पत्रे वाचूनी दाखविली । महाराजांस, अनेकांनी वाचली ।।
मंडळी अगदी थक्क झाली । हसू लागले महाराज ।।२३।।
तेरा ठिकाणी महाराज असत । महाराज पुण्यातही दिसत ।।
एकाच वेळी सर्वत्र असत । प्रचिती दिली सर्वास ।।२४।।
एकदा नगरहून पाथर्डीस । महाराज पायी चालत जात ।।
मधेच तेव्हा ते रस्त्यास । वृध्देश्वरला थांबत ।।२५।।
जमिनीवर हात टेकवीत । मोठ्याने ते अल्लख म्हणत ।।
जमिनीतून दिव्य प्रगटत । महादेवाची पिंड ती ।।२६।।
पिंड वरती मग काढून । व्यवस्थित तिची पूजा करून ।।
महाराजांनी पिंड काढली म्हणून । शंकरेश्वर म्हणती त्या ।।२७।।
भव्य मंदिर त्या ठिकाणी । आज उभे राहिले असूनी ।।
शंकर महाराजांची करणी । साक्ष आजही देतसे ।।२८।।
महाअरण्यात गर्भाद्रि पर्वत । हे वाल्मिक ऋषींचे स्थान असत ।।
मच्छिंद्र, गोरक्ष, जालंदरनाथ । समाध्या त्यांच्या येथेची ।।२९।।
भगवान शंकर येथे येत । कायम तेथेच राहत ।।
'म्हातारदेव' त्यांना म्हणत । हेच आपेश्वर असे ।।३०।।
आपेश्वराच्या पश्चिमेस । कानिफनाथ राहत ।।
कानिफनाथ नाव ठेवीत । मढी ऐसे त्या गावा ।।३१।।
याच पुण्यक्षेत्र मढीत । ब-याच वर्षांची धून शांत ।।
अल्लख म्हणून केली प्रज्वलित । चौथ्या अध्यायी कथा ही ।।३२।।
खानसाहेब पुण्यात । त्यांचे मन नेहमी अशांत ।।
मुंबईचे नूरी त्यांना नेत । महाराजांच्या दर्शना ।।३३।।
महाराज म्हणती 'अरे खान । तू आहेस का खरा मुसलमान ? ।।
पडतोस का नमाज प्रतिदिन । गुरू आहेस केला का' ।।३४।।
एवढे बोलून महाराजांनी । नमाजातील बारकावे खुबीनी
समजाविले उत्तम रीतीनी । यवनांनाही जे न माहीत ।।३५।।

महाराजांच्या दर्शनानी । खानसाहेब बनले समाधानी ।।
जीवन त्यांचे गेले फुलुनी । गुरू केला महाराजा ।।३६।।
महाराज म्हणती कोणत्याही । कृतीला जो माजत नाही ।।
ज्याचा अहंकार अल्लाशी । एकरुप असतो झालेला ।।३७।।
तोच नमाजी असे खरा । नमाजी म्हणजे न माजणारा ।।
अल्लाशी एकरूप होणारा । खरा इस्लामी तोच हो ।।३८।।
इस्लाम शब्दाचा अर्थ शांती । महंमद पैगंबर प्रार्थना करती ।।
शांतीचा मार्ग दाखवा म्हणती । नित्य प्रार्थिती परमेशा ।।३९।।
पैगंबरांचा उपदेश पहा । कोणालाही मारू नका ।।
चोरी कोणाची करू नका । सत्य धर्म पाळावा ।।४०।।
साफ आणि पाक हृदयात । असते खरी मस्जिद ।।
असीम श्रध्दा असावी नित । परमेश्वराबद्दल ।।४१।।
प्रेम आहे खरा खुदा । धैर्य सहिष्णुता श्रध्दा ।।
सद्गुणांचा करा साठा । इस्लाम धर्म सांगतो ।।४२।।
महाराजांना मुसलमान । विचारती शंका प्रश्न ।।
ऐशी त्यांना उत्तरे देऊन । समाधान करती सर्वांचे ।।४३।।
निरंजनमहाराज पुण्यतिथीस । महाराज जात हैद्राबादेस ।।
हैद्राबादचे लोक महाराजांस । म्हणत होते अवलिया ।।४४।।
हैद्राबादचे प्रख्यात । भटजी बापू महान संत ।।
श्रेष्ठ अधिकारी परमार्थात । कथा त्यांच्या प्रख्यात ।।४५।।
वासुदेव केशव अघोरशास्त्री । वडील माझे तज्ज्ञ शास्त्री ।।
याज्ञिकी ख्यात ज्योतिषशास्त्री । पुराणिक ते पट्टीचे ।।४६।।
भागवत सप्ताह करण्यात । अनेक मानपत्रे त्यांना मिळत ।।
भटजीबापूंनी हैद्राबादेत । सप्ताह त्यांचा ऐकिला ।।४७।।
ऐकून सप्ताह समस्त । भटजीबापू खूष होत ।।
शुक्राचार्य, ऐशी पदवी देत । समारंभपूर्वक ।।४८।।
या भटजीबापूस महाराज । देत मार्गदर्शन आशीर्वाद ।।
भटजीबापूंच्या जीवनात । आध्यात्मिक प्रगती जाहली ।।४९।।
पुण्याजवळील भोर येथ । रामजन्माचा उत्सव होत ।।
एकदा महाराज तेथे जात । प्रचंड गर्दी भक्तांची ।।५०।।
रामाचा जयजयकार चालत । जन्माची वेळ जवळ येत ।।
महाराज शांत ध्यानस्थ बसत । वेळ झाली जन्माची ।।५१।।
महाराजांकडे सारे बघत । महाराज अदृश्य झणी होत ।।
प्रत्यक्ष प्रभु रामचंद्र प्रगटत । महाराजांच्या ठिकाणी ।।५२।।
दशरथी रामांचे साक्षात् । दर्शन घेती सारे भक्त ।।
दर्शन घेताच पुन्हा दिसत । शंकर महाराज स्वयमेव ।।५३।।
पुण्यात संस्कृत प्राध्यापक देव । महाराजांस माहिती विचारत ।।
महाराज देवांना सांगत । उघडा ग्रंथ घेऊनी ।।५४।।
कोणता घ्यावयाचा ग्रंथ । कोणते पान उघडणे असत ।।
हे महाराज काही न सांगत । कोडे पडले देवांना ।।५५।।
हातास येईल तो ग्रंथ घेत । उघडेल ते पान उघडत ।।
महाराज देवांना सांगत । आता वाचा पान ते ।।५६।।
देव झाले अगदी चकित । जी शंका त्यांच्या मनात ।।
जी माहिती त्यांना हवी असत । तोच मजकूर पानात ।।५७।।
जिथे देव झाले चकित । माणसाचे मग काय होत ? ।।
शंका न विचारता, उत्तर मिळत । अधिकार काय वर्णावा ।।५८।।
सर चुनीलाला मेहता गुजराथी । ब्रिटिशांच्या गव्हर्नर पदावरती ।।
मुंबईस त्यांचे वास्तव्य असुनी । विद्वान श्रीमंत अत्यंत ।।५९।।
एकोणीसशे चव्वेचाळीस । या इसवी सनास ।।
ही घटना असे घडत । मोठे सात्विक मेहता ।।६०।।
पाश्चात्य पौर्वात्य तत्वज्ञानांचा । अभ्यास व्यासंग मोठा त्यांचा
प्रवचने व्याख्याने यांचा । नाद त्यांना भारीच ।।६१।।
दर्शने साधूसंताची । दर्शने सकल देवांची ।।
सर्व तीर्थक्षेत्रांची । यात्रा त्यांनी केलीच ।।६२।।
व्रते, दानधर्म, केला फार । परी मनात चिंतेचा भार ।।
कधी भेटेल जगदाधार ? । म्हणून मन अशांत ।।६३।।
रावसाहेब मेहेंदळे यांना । मेहता म्हणाले एकदा ।।
भगवंताचे दर्शन मजला । कोण करून देईल ? ।।६४।।
मेहेंदळे म्हणाले मेहतांना । शंकर महाराजांच्या दर्शना ।।
आपण जाऊ, तुमची कामना । पूर्ण तेथे होईल ।।६५।।
मामा ढेकणे यांच्या सदनी । दोघे गेले पहा मिळूनी ।।
महाराज होते त्या सदनी । निवांत अगदी बसलेले ।।६६।।
आपल्या तीक्ष्ण नजरेनी । मेहतांस पाहिले महाराजांनी ।।
मेहतांचे अष्टभाव आले फुलुनी । पाहु लागले महाराजा ।।६७।।

क्षणात लख्ख वीज उसळे । कोटिसूर्याचे तेज फाकले ।।
अत्यंत मोहक रूप प्रगटले । भगवान श्रीविष्णूंचे ।।६८।।
शंकरमहाराज गुप्त झाले । तिथे भगवान विष्णू प्रगटले ।।
मेहतांस गहिवरून आले । भरले नयन अश्रूंनी ।।६९।।
चतुर्भुज विष्णू वरती छत्र । हाती गदा शंख चक्र ।।
पाहता संतुष्ट होती नेत्र । अपूर्व भगवंत दर्शन ।।७०।।
लगेच मेहता धावत गेले । महाराजांचे चरण धरले ।।
डोळ्यांतून अश्रू वाहू लागले । अभिषेक चरणी चालला ।।७१।।
मुखातून चालले पुरूषसूक्त । काही वेळ असाच जात ।।
नंतर पुरूषसूक्त थांबत । अभिषेकही संपला ।।७२।।
मेहता चरणा मिठी मारत । चतुर्भुज विष्णू असता पहात ।।
शंकर महाराज प्रगट होत । धन्य झाले मेहता ।।७३।।
प्रत्यक्ष विष्णूंचे घडावे दर्शन । ओढ हीच मेहतांची महान
ती इच्छा होता पूर्ण । शांत झाले मेहता ।।७४।।
महाराजांचे दर्शन झाले । मेहतांचे जीवन बदलले ।।
आनंदाने अगदी भरले । आनंदी आनंदच ।।७५।।
पानिपतच्या लढाईत । अपूर्व शौर्य जे गाजवित ।।
ते मेहेंदळे अप्पा बळवंत । सरदार होते प्रख्यात ।।७६।।
यांच्याच नावाचा पुण्यात । अप्पा बळवंत चौक असत ।।
भव्य वाडा या चौकात । मेहेंदळेंचा असेच ।।७७।।
यांचे वंशज त्या वाड्यात । राहतात सरदार बॅरिस्टर ।।
रावसाहेब मेहेंदळे असत । पत्नी ताईसाहेब ।।७८।।
ताईसाहेब गायन । भजन प्रवचन कीर्तन ।।
सुंदर करीत मन लावून । कार्यक्रम त्यांच्याच वाड्यात ।।७९।।
त्यांच्या कीर्तन प्रवचनाला । हॉल नेहमी भरलेला ।।
नित्य गर्दी वाड्याला । उत्सव होती सर्वही ।।८०।।
महाराजही या वाड्यात । नेहमीच जात असत ।।
कसा महाराजांचा संबंध येत । हीही कथा नवलाची ।।८१।।
रावसाहेब मुंबईस असत । प्रथम पत्नी निवर्तत ।।
असून राजैश्वर्य समस्त । उध्वस्त जीवन जाहले ।।८२।।
मुंबई सोडून ते पुण्यात येत । भव्य वाडा भासे स्मशानवत ।।
मन त्यांचे उदास होत । चिंताग्रस्त सदा ते ।।८३।।
सरदार मिरीकरांनी । रावसाहेबांस नेले आपल्या सदनी ।।
महाराज तेथे असूनी । दर्शन त्यांचे घडविले ।।८४।।
रावसाहेबांना पहाताच । महाराज त्यांच्या पाठीवर ।।
जोराने थाप मारत । रावसाहेबांना म्हणाले ।।८५।।
‘अरे, येरे राजा, तुझीच मी । अगदी वाट पहात असुनी ।।
तू नवनाथ ग्रंथातला भर्तरी । मेली तुझी पिंगला ।।८६।।
तुझे उध्वस्त जीवन संपणार । ज्ञानेश्वरी रसास्वादाने बहरणार ।।
नवीन ऐश्वर्य सुरू होणार । मुख्य कलाकार तू’ ।।८७।।
महाराजांच्या उद्गारांनी । आणि हस्तस्पर्शांनी ।।
रावसाहेब आले गहिवरूनी । चकित झाले अत्यंत ।।८८।।
रावसाहेबांच्या मनात नसूनी । सर्वांच्याच आग्रहावरूनी ।।
विवाह त्यांचा होऊन सदनी । ताईसाहेब प्रवेशल्या ।।८९।।
दोघांच्या प्रवृत्तीत, वयात । खूप अंतर पहा असत ।।
सांसारिक जीवनास कंटाळत । विटून गेले दोघेही ।।९०।।
सकल ऐश्वर्य सुखे सारी । हात जोडून उभी दारी ।।
दोघेही दु:खीच अंतरी । ताईसाहेब ठरविती ।।९१।।
आत्महत्या करावी म्हणुनी । एकट्याच निघाल्या बंगल्यातुनी ।।
समुद्राजवळ आल्या झणी । निरोप घेण्या जगताचा ।।९२।।
स्वामी समर्थांचे मंदिर दिसत । जाऊन दर्शन असता घेत ।।
सतत स्पष्ट ध्वनी ऐकू येत । ‘अष्टवक्रगीता’ हा ।।९३।।
तिथे तर कोणीही नसत । मग शब्द हे कोण पुकारत ? ।।
‘अष्टवक्रगीता’ काय असत ? कोण संदेश देतसे ? ।।९४।।
बाहेर आल्या संभ्रमात । तोच रावसाहेबांचे मित्र नूरी दिसत ।।
फिरावयाला एकट्याच कशा येत ? । विचारून नेले घरात ।।९५।।
प्रधानांकडे महाराज असत । रावसाहेबांना निरोप येत ।।
दोघेही महाराजांच्या दर्शनास जात । महाराज म्हणाले ताईना ।।९६।।
‘ये बेबी, बैस माझ्यासमोर । रावसाहेबास म्हणाले नंतर ।।
मी बेबीला खाल्लं बरं । गिळून टाकले बेबीला’ ।।९७।।
महाराजांच्या उद्गारांनी । ताईसाहेब गेल्या बदलुनी ।।
रावसाहेब आले बहरुनी । पुर्ण दोघे बदलले ।।९८।।
प्रवचने ज्ञानेश्वरीवरती । करीत जा महाराज म्हणती ।।
आणि आशीर्वादही देती । ताईसाहेबांना ते ।।९९।।

इतकी प्रवचने त्यांची छान । ऐकता हरपे देहभान
वाटे ताईच्याच मुखातून । प्रत्यक्ष महाराज बोलत ।।१००।।
महाराज नेहमी सांगत । मला बोलता नाही येत ।।
तल्लख बुध्दीचा लागत । वक्ता बुध्दिमान हो ।।१०१।।
महाराजांची योजना । निवडले ताईसाहेबांना ।।
करण्या कीर्तन प्रवचना । रंग भारी चढतसे ।।१०२।।
आत्महत्या करणा-या म्हणूनी । ज्या ताई त्यांना खाउनी ।।
महाराजांनी टाकले गिळूनी । महाराज होते बोलले ।।१०३।।
याचा अर्थ कळला तेव्हा । संपूर्ण बदलले दोघे जेव्हा ।।
महाराज करतील काय केव्हा । विधात्यासही कळे ना ।।१०४।।
महाराजांच्या कृपेनी । मेहेंदळे पतीपत्नी ।।
संसारात अगदी आनंदूनी । उध्वस्त जीवन उमलले ।।१०५।।
कथा – कीर्तन – प्रवचन । नैमित्तिक ते गायन ।।
उत्सव होती मधूनमधून । गर्दी प्रचंड श्रोत्यांची ।।१०६।।
ज्ञानेश्वरीचे रसाळ सुंदर । नवीन ऐश्वर्य सुरू होणार ।।
रावसाहेबास आली प्रचिती तर । महाराजांच्या शब्दांची ।।१०७।।
शंकर महाराजांस करून नमन । पाहीले त्यांना डोळे भरून ।।
पाचवा अध्याय संपूर्ण । या ठिकाणी जाहला ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 6

महाराजांचे स्मरून चरण । शरीराचा प्रत्येक कण न कण
बहरून येई म्हणून शरण । महाराजांच्या चरणी मी ।।१।।
वंदन करतो पुन्हा पुन्हा । फुटतो चरित्र लिखाणाचा पान्हा ।।
उभा राहून शंकर कान्हा । शंकरगीता सांगती ।।२।।
शंकर महाराज शंकर गीता । सांगतात मी दर्शन घेता ।।
तेच कर्ता करविता । नाममात्रही नसे मी ।।३।।
मी लिहिले चरित्र । याचा पुरावाही तिळमात्र ।।
नसे मजजवळ मी अपात्र । म्हणून कैसे लिहिले मी ? ।।४।।
दिसत महाराजांचे चरण । करावे त्यांना वंदन ।।
श्रध्देने मनापासून । एवढेच मला येतसे ।।५।।
हे चरित्र अति सुरस । त्याप्रमाणे फार सरस ।।
महाराजांचा लीलाविलास । कृपा वैशिष्ट्य असे हे ।।६।।
महाराजांचे एक भक्त । बाबूराव रूद्र असत ।।
महाराज त्यांच्या घरी जात । आपण होऊन आनंदे ।।७।।
स्वत: महाराज चहा करीत । पाणी दोन कप ठेवीत ।।
चहा तयारही असे होत । उतरून खाली ठेवला ।।८।।
तेवढ्यात तेथे काही भक्त । दर्शनासाठी मुद्दाम येत
त्यात एक वेदान्ती पंडित । प्रथमच आला दर्शना ।।९।।
‘आपण शास्त्रे जी वाचली असती । त्यांची प्रत्यक्ष अनुभूती ।।
देणार कोणी मज भेटती ?’ पंडितांची शंका ही ।।१०।।
एकवीस माणसे सारी असत । महाराज सर्वांना चहा देत ।।
शिल्लक एक कप रहात । महाराजांनी घेतला तो ।।११।।
महाराजांस पाहून । पंडितांच्या कपाळी आठ्या पडून ।।
कुठले मम प्रश्नांचे याला ज्ञान ? । अहंकार त्याचा पेटला ।।१२।।
दोनच कपांचे पातेले । समोरच होते चिमुकले ।।
सर्वांचे चहापान झाले । बावीस लोक सर्वही ।।१३।।
दोनच कपांच्या भांड्यात । बावीस कप चहा होत ।।
लोक सारे झाले चकित । फक्त न कळले पंडिता ।।१४।।
प्रश्नही त्याने न विचारला । शंका जी होती त्याला ।।
प्रत्यक्ष दाखवून घटनेला । बोध पंडिता होईना ।।१५।।
म्हणून महाराज पंडिता सांगत । तोंडात आणि नाकात ।।
एकच बोटाचे अंतर असत । बोट लावून पहा की ।।१६।।
नाकावर बोट ठेवूनी । मिशीवर पीळ देवूनी ।।
मनुष्य नेहमी बोलत असूनी । त्यांच्या या कृतीतून ।।१७।।
तो आपला अहंकार । व्यक्त करतो वारंवार ।।
किती किळसवाणा हा अहंकार । तुम्हा माहीत आहे का ? ।।१८।।
नाक शिंकरून महाराजांनी । मोठा बेडका काढूनी ।।
हातावरती तो घेऊनी । चटकन तोंडात टाकला ।।१९।।
पाहून किळसवाणा तो प्रकार । शहारे आले अंगावर ।।
इतका घाणेरडा हा अहंकार । महाराज पंडिता म्हणाले ।।२०।।

पंडित अगदी सर्द झाला । अहंकार त्याचा गळाला ।।
घडल्या घटनांचा बोध झाला । अभिमान त्याचा मावळला ।।२१।।
प्रश्न शंका न विचारता । उत्तर मिळाले घटना घडता
महाराजांचे चरण दिसता । चरणी मस्तक टेकवी ।।२२।।
बाबुराव रूद्र उभे असत । महाराज तोंडातील एकेक दात ।।
काढून समोर ठेवीत । सर्व दात काढले ।।२३।।
संध्याकाळी रुद्र पहात । महाराजांच्या तोंडात ।।
सर्व दात अगदी पूर्ववत । रूद्र चकित जाहले ।।२४।।
एकदा अप्पा बळवंत चौकात । महाराज टांगा बोलावीत ।।
बसता, दोन थोबाडीत । दिल्या टांगेवाल्याच्या ।।२५।।
टांगेवाला गप्प बसत । कोणी अलौकिक व्यक्ती दिसत ।।
टांगेवाल्यास वाटत । सिटी पौष्ट येताच ।।२६।।
घड्याळाचे दुकान असत । खानसाहेबांचे प्रख्यात ।।
तेथे महाराज उतरत । टांगेवाल्यास जा म्हणती ।।२७।।
पैसे न देता, जा म्हणत । टांगेवाला तसाच जात ।।
टांगेवाल्याच्या जीवनात । बदल झाला त्यामुळे ।।२८।।
महाराज थोबाडीत देत । म्हणून चांगले दिवस दिसत ।।
टांगेवाल्याची खात्री होत । भक्त बनला निस्सीम ।।२९।।
गणेशोत्सव मिरवणूक पुण्यात । जोरात अगदी असे निघत ।।
महाराजांचे एक भक्त । वासुदेव पंडित ।।३०।।
घरच्या पत्र्यावर चढून । वरती शिडी ती ठेवून ।।
एका लहान मुलास घेऊन । वरती चढू लागले ।।३१।।
तोच शिडी उलटली । मंडळी सारी घाबरली ।।
दोघेही मरणार ओरडली । तोच धावले महाराज ।।३२।
महाराजांनी शिडी धरली । तशीच जमिनीवर टेकवली ।।
दोघेही जमिनीवरती पडली । अगदी सुखरूपपणेच ।।३३।।
इतक्या उंचावरून पडले । नुसते थोडेही न खरचटले ।।
महाराजांनीच त्यांना वाचवले । अगाध लीला कशी पहा ।।३४।।
डॉक्टर भोई प्रवासास । मोटार सायकलवरून जात
एक म्हैस आडवी येत । रस्त्यामध्ये अचानक ।।३५।।
आता होणार अपघात । म्हणून सायकल वळवीत ।।
डॉक्टर शेजारच्या शेतात जात । तोच तेथे नाग उभा ।।३६।।
एक अपघात चुकविला । दुसरा अपघात समोर आला ।।
नागराज डोलू लागला । फणा काढून पहात ।।३७।।
एवढा मोठा नागराज । कधी न पाहिला दिसे आज ।।
तेच आहेत महाराज । डॉक्टरांनी जाणले ।।३८।।
नागराजास वंदन केले । नागानी ते स्वीकारले ।।
नागराज मग गुप्त झाले । चकित झाले डॉक्टर ।।३९।।
नागराजांच्या रूपात । महाराज आज दर्शन देत ।।
अशा या आनंदात । मोटारसायकल वळवली ।।४०।।
डॉक्टर येता रस्त्यावर । महाराज प्रगटले समोर ।।
आता पाहिला जो नाग भयंकर । तसेच दिसले महाराज ।।४१।।
महाराज रोखून पहात । त्यांच्या नजरेतून स्पष्ट कळत ।।
आताच पाहिलेला जो नाग असत । तोच आम्ही आहोत ।।४२।।
डॉक्टर भोई चकित झाले । नशीब केवढे आले भले ।।
ज्यांना शंकरमहाराज दिसले । भाग्यवान ते खरोखर ।।४३।।
गोसावी, महाराजांचे भक्त । एके दिवशी काय घडत ।।
त्यांना भव्य विशालरूप दिसत । महाराजांच्या ठिकाणी ।।४४।।
अहमदनगरला महाराज जात । कबरीजवळ ते बसत ।।
मुसलमानांची श्रध्दा असत । महाराजांवरती खरी ।।४५।।
महाराजांच्या ठिकाणी अनेक । दर्शने मुसलमानांना होत ।।
‘बडे आदम मालिक’ म्हणत । महाराजांना सर्व ते ।।४६।।
महाराजांनी सोलापूरला । यज्ञ एक सुरू केला ।।
एक भाविक मुका, यज्ञाला । येता बोलू लागला ।।४७।।
सशक्त बॅरिस्टर पुण्यात । महाराजांची चेष्टा करत
महाराजांनी आपल्या गुडघ्यात । पकडून त्याला ठेवले ।।४८।।
महाराज तर कृश अत्यंत । बॅरिस्टर धिप्पाड असत ।।
बोबडी वळली पकडीत । शरण आला महाराजा ।।४९।।
डॉक्टर खरे दर्शन घेत । महाराज आशीर्वाद देत ।।
खरे यांना प्रत्यक्ष दत्त दिसत । महाराजांच्या ठिकाणी ।।५०।।
महाराज गेले नाशिकला । भक्तांनी मग विचार केला ।।
जाऊ त्र्यंबकेश्वराला । गहिनीनाथांच्या दर्शना ।।५१।।
ज्ञानेश्वर गुरू निवृत्तिनाथ । निवृत्तिगुरू गहिनीनाथ ।।
गहिनीनाथ समाधी असत । त्र्यंबकेश्वर क्षेत्रात ।।५२।।

महाराज म्हणाले ‘तुम्हास । घडू नये जाण्याचा सायास ।।
आज रात्री येथेच येण्यास । साक्षात त्यांना बोलवितो’ ।।५३।।
लोकांचा विश्वास बसेना । म्हणती बोलवा गहिनीनाथांना ।।
महाराज जागविती लोकांना । एक वाजला रात्रीचा ।।५४।।
प्रचंड आवाज ऐकू येत । ‘अल्लख’ मोठ्याने गर्जना होत ।।
आवाजाने झाले भयभीत । महाराज गेले खोलीत ।।५५।।
अत्यंत तेजस्वी प्रकाश पडला । एक नाथपंथीय पुरूष आला ।।
भव्य अत्यंत तेजस्वी भला । तोही गेला खोलीत ।।५६।।
आवाजांनी अन् तेजांनी । सारे गेले घाबरूनी ।।
तोंडावर पांघरून घेऊनी । निजले स्वस्थ भिऊनी ।।५७।।
पहाट होता सारेही । गांगरून गेले भीतीनी ।।
महाराज आले खोलीतुनी । म्हणती ‘का हो घाबरला ?’ ।।५८।।
सारे म्हणती महाराजांना । ‘एक नाथसंप्रदायी भला ।।
दिव्य सत्पुरूष पाहिला । अतीव तेज तयांचे’ ।।५९।।
महाराज म्हणाले सर्वांस । मी सांगितले होते ना तूम्हास ।।
बोलावणार आहे गहिनीनाथास । आपल्या घरी आज मी ।।६०।।
तुमचा विश्वास बसला नाही । गहिनीनाथ येऊनही ।।
तुम्ही दर्शन घेतले नाही । प्रत्यक्ष येऊनही ते ।।६१।।
येऊन गहिनीनाथ साक्षात् । तुम्हास दर्शन घेता न येत ।।
समाधीच्या जागी जाऊन । तुम्ही काय करणार ? ।।६२।।
पहाटेपर्यंत गहिनीनाथ । माझ्याशी बसले बोलत ।।
आवेगात महाराज सांगत । चकित झाले सर्वही ।।६३।।
प्रत्यक्ष गहिनीनाथ येत । गहिनीनाथ ज्यांच्याशी बोलत ।।
त्याचा अधिकार केवढा असत ? । कोण वर्णू शकेल ? ।।६४।।
एक सत्पुरूष हैद्राबादेत । महाराजांना होता मानीत ।।
एकदा त्याच्या मनात । अहंकार उफाळला ।।६५।।
श्रेष्ठ मी सर्व योगीपुरूषात । ऐसे ठाम त्याला वाटत ।।
महाराजांना हे कळत । नगरला होते त्या वेळी ।।६६।।
नगरहून हैद्राबादेत । लगेच महाराज तेथे येत ।।
मला थंडी आहे वाजत । स्नानार्थ पाणी तापवा ।।६७।।
चांगले पाणी उकळू द्यावे । नंतर स्नान मज घालावे ।।
महाराजांनी स्नान केले । अगदी उकळत्या पाण्याने ।।६८।।
राहिलेल्या उकळत्या पाण्यात । स्नान करण्या सत्पुरूषास सांगत ।।
सत्पुरूषाची छाती न होत । त्याला महाराज म्हणाले ।।६९।।
‘सर्वश्रेष्ठ योगी स्वत:स । तू तर अगदी समजतोस ।।
उकळत्या पाण्या का भितोस’ । सत्पुरूष अंतरी समजला ।।७०।।
अहंकार आपला जावा म्हणूनी । महाराज आले नगरहूनी ।।
सत्पुरूषाला येता कळुनी । पाय धरले लगेच ।।७१।।
पिढ्यान पिढ्या दत्तोपासक । असे एक गृहस्थ भाविक ।।
ते पहिल्या महायुध्दात । लढाईवर होतेच ।।७२।।
एके दिवशी युध्दात । अनेक गोळ्या त्यांना लागत ।।
पँटला अनेक भोके पडत । परत आले तंबूत ।।७३।।
त्यांना वाटले आपला संपूर्ण । पाय काढावा लागणार कापून
पाहीली पँट वर करून । अगदी लक्षपूर्वक ।।७४।।
पायाला एकही गोळी । नव्हती पहा लागलेली ।।
पँटला तर अनेक भोके पडलेली । नवल त्याना वाटले ।।७५।।
पुढे महायुध्द संपत । गृहस्थ सुखरूप घरी येत ।।
अचानक त्यांच्या दारात । उभे राहिले महाराज ।।७६।।
महाराज त्यांना म्हणत । ‘पहिल्या महायुध्दात ।।
मी तुमच्याबरोबर असत । खाणाखूणाही सांगितल्या ।।७७।।
तूमच्या पायावर झाडलेल्या । ज्या ज्या होत्या सगळ्या गोळ्या ।।
त्या सर्वही मीच झेलल्या’ । एवढे त्यांनी म्हणताच ।।७८।।
त्या गृहस्थास खाणाखुणा पटत । पायास भोके का न पडत ।।
अर्थबोध याचा आज होत । साष्टांग दंडवत घातले ।।७९।।
महाराज ज्या भक्ताघरी उतरत । त्याचा दहा वर्षांचा मुलगा संगे घेत ।।
नगरहून गिरिनारला जात । भक्तसमवेत महाराज ।।८०।।
गिरिनार पर्वताच्या पायथ्याशी । आले मध्यरात्रीशी ।।
गिरिनारच्या रांगा आकाशाशी । हितगूज होत्या करीत ।।८१।।
महाराज म्हणाले अगदी वर । या पर्वताच्या शिखरावर ।।
दहा हजार पाय-या चढून सत्वर । आपणास आहे जायाचे ।।८२।।
महाराजांची आज्ञा झाली । मंडळी चालू लागली ।।
मुलगा चालण्या तयार न मुळी । महाराज घेती खांद्यावर ।।८३।।
महाराज मुलास खांद्यावर घेत । झपाझप पावले टाकत ।।
दहा हजार पाय-या ओलांडत । डोंगर चढून गेले ते ।।८४।।

अगदी अर्ध्याच तासात । शिखरावर दत्तात्रेय स्थान असत ।।
तेथे महाराज जाऊन बसत । लोक होती चकीत ।।८५।।
ज्यांना मदतीशिवाय चालता न येत । ते मुलास खांद्यावर घेऊन चढत ।।
दहा हजार पाय-यांचा पर्वत । शक्ती कसली म्हणावी ? ।।८६।।
गिरिनार पर्वतावर महाराज जात । अल्लख ऐसे पुकारत
शेकडो साधू तेथे जमत । मुलगा चकित जाहला ।।८७।।
अगदी काळोख तेथे असत । ठिकाण उंच अत्यंत शांत ।।
साधू कोठून कसे येत ? । कोडे कसे कळणार ? ।।८८।।
महाराज गिरिनार पर्वतावर । आठ दिवस रहात ।।
सारखे पर्वतावर हिंडत । नि:संकोच चोहिकडे ।।८९।।
अनेक वाघांच्या समवेत । एकदा महाराज होते हिंडत ।।
पंचमहाभूते ज्यांच्या ताब्यात । त्यांना भीती कशाची ? ।।९०।।
हिंडून महाराज आले । वाघ सारे निघून गेले ।।
हे सर्वही ज्यांनी पाहिले । अवाक् बनले भक्त ते ।।९१।।
गिरिनारहून निघतांना । महाराजांच्या आले मना ।।
जेवण द्यावे सांधूना । शंख फुंकला लगेच ।।९२।।
दत्तात्रेयांच्या स्थानाजवळ । स्वयंपाकाची जागा असत ।।
कणकीचे गोळे भाजत । दुसरा पदार्थ भजी हा ।।९३।।
महाराजांनी शंख फुंकला । सांधूचा मग लोंढा आला ।।
सारे बसले जेवावयाला । प्रशस्त जेवण सर्वांचे ।।९४।।
कणकीचा गोळा एवढा मोठा । मोठ्या नारळाएवढा ।।
पाऊणशे ते ऐंशी खावयाचा । गोळे साधू प्रत्येक ।।९५।।
भक्त करीती विचार । एका गोळ्यात आपण ठार ।।
ऐंशी गोळ्यांचा यांचा आहार । केवढा प्रचंड आहार ? ।।९६।।
एकाचा प्रश्न साधूस तसा । एवढा तुमचा आहार कसा ? ।।
प्रश्न ऐकून त्याचा तसा । साधू त्याला म्हणाले ।।९७।।
‘जेव्हा येतात अवधूत । तेव्हाच आमचा आहार असत ।।
एरवी आमचे खाणे असत । वायुभक्षण सर्वदा’ ।।९८।।
दुपारचे बारा वाजत । भोजन पंक्ती सुरू होत ।।
स्वत: महाराज वाढत । तृप्त साधू होतात ।।९९।।
अगदी मध्यरात्रीपर्यंत । सारख्या पंक्तीच चालत
एकूण किती पंक्ती होत ? । किती साधू जेवले ? ।।१००।।
अन्न किती ते लागले ? । अन्न कोणी शिजवले ? ।।
धान्यही किती लागले ? । दिले कोणी धान्य हे ? ।।१०१।।
धान्यही कोणी आणले ? । गिरिनावर कसे नेले ? ।।
स्वयंपाकासाठी सामान । सगळे कोणी कसे आणले ? ।।१०२।।
साधूंना कोणी बोलावले ? । साधू होते हे कुठले ? ।।
साधूंना हे कसे कळले ? । कशी भोजन व्यवस्था ? ।।१०३।।
एवढ्या पंक्ती वाढल्या कुणी । पाने काढणे - मांडणे केले कुणी ? ।।
स्वयंपाकपात्रे आणली कुणी । व्यवस्था काय पाण्याची ? ।।१०४।।
रात्री प्रकाशव्यवस्था काय असत । कोण कशा रीतीने करत ? ।।
अशी एकवीस प्रश्ने अनुत्तरित । उत्तर त्यांचे स्वयमेव ।।१०५।।
साधू म्हणती ‘जिथे अवधूत । तिथेच आम्ही भोजन घेत’ ।।
यावरून सिध्द होत । महाराजच अवधूत ।।१०६।।
येणा-यांची जी भाषा असत । महाराज त्याच भाषेत ।।
त्या गृहस्थाशी बोलत । चकीत होई येणारा ।।१०७।।
चरण महाराजांचे स्मरून । चरित्र चालले हे गहन ।।
सहावा हा अध्याय लिहून । समाप्त येथे जाहला ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 7

संतवर्य योगिराज । सदगुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज । वंदन राजीखूषीने ।।१।।
राजीखूषीने वंदन । हा काय प्रकार नूतन ? ।।
ज्या खूषीत राजेपण । राजखूषी म्हणतात ।।२।।
कशास म्हणावे वंदन । ज्याहून कोणी वंद्य न ।।
त्याला केलेले नमन । वंदन त्याला म्हणतात ।।३।।
देखल्या देवा दंडवत । परमार्थ मार्गात नाही चालत ।।
कैसे अश्रू माया उपजत ? । मोले घातले रडाया ।।४।।
भावभक्ती श्रध्दा निष्ठा । यांची होते जेथे चेष्टा ।।
वाळलेल्या शुष्क काष्ठा । पल्लवी कैसी फुटेल ? ।।५।।

महाराजांच्या चरणावर । निष्ठा ज्यांची अपार ।।
त्यांनाच महाराज तारणार । चरित्र त्यांनाच कळणार ।।६।।
अन्यथा कोरडे, समुद्रात बुडविले । लोणकढी तुपातही तळले ।।
चांगले साखरेत घोळले । मूळ गुणधर्म कायम ।।७।।
ऐशी न व्हावी आपली गती । टळावी आपली अधोगती ।।
एकच मार्ग, व्हावी सन्मती । शरण जाण्याची महाराजा ।।८।।
नगरला न्हाव्याच्या दुकानात । दाढी करण्यास महाराज जात
अर्धी दाढी झाली असत । तोच उठले महाराज ।।९।।
एका ठिकाणी एक प्रेत । लोक तिरडीस होते बांधत ।।
महाराज त्या ठिकाणी जात । सरका लोकांस म्हणाले ।।१०।।
महाराज प्रेतावरती बसत । आणि त्या प्रेतास विचारीत ।।
अजून तूज परमार्थ साधायचा असता । कोठे आत्ताच चालला ।।११।।
महाराज एवढे बोलून । चटकन गेले तिथून निघून ।।
प्रेत तिरडीवर बसले उठून । गाव जमा जाहला ।।१२।।
एक वेडगळ मनुष्य येतो । लोकास बाजूला सरका म्हणतो ।।
प्रेतावर बसून प्रेताशी बोलतो । प्रेत बसते उठून ।।१३।।
सारेच अतर्क्य अघटित । सारेच त्या माणसा शोधत ।।
नगरातही शोध न लागत । जरुरीच काय कीर्तीची ? ।।१४।।
कीर्ती पैसा हवा ज्याला । परमार्थ त्याचा बुडाला ।।
कीर्ती पैसा नको ज्याला । परमार्थ त्याच्या हातात ।।१५।।
भोई डॉक्टर अमृतसरला । रेल्वेतून निघाले प्रवासाला ।।
चालत्या गाडीतून प्रसंग घडला । खाली पडले डॉक्टर ।।१६।।
एक मनुष्यही खाली पडला । तो चाकाखाली सापडला ।।
महाराजांनी डॉक्टरला । अलगद बाजूस निजवले ।।१७।।
पडलेला मनुष्य लगेच मेला । काहीही न झाले डॉक्टरला ।।
महाराजांनीच वाचविले मला । जाणीव होती डॉक्टरला ।।१८।।
तुफान वेगात गाडी चाले । महाराज कसे तिथे आले ? ।।
कसे डॉक्टरांना वाचविले ? । अतर्क्य लीलाविलास ।।१९।।
एक गाढे विद्वान पंडित । महाराजांस शंका विचारीत ।।
श्रीकृष्णांनी अर्जूनास कुरूक्षेत्रात । गीता कशी सांगितली ? ।।२०।।
युध्द चालले असतांना । गीता सांगण्यास श्रीकृष्णांना ।।
वेळ तरी कसा मिळाला ?। काही कळत नसे हे ।।२१।।
महाराजांनी त्या गृहस्थाला । सांगितले जवळ बसण्याला ।।
गृहस्थ जवळ येऊन बसला । क्षणात निघून गेलाही ।।२२।।
लोक सारे प्रश्न ऐकत । महाराज उत्तर देणार असत ।।
त्यापूर्वीच तो गृहस्थ जात । नवल लोका वाटले ।।२३।।
दुसर्या दिनी तो पाहून । लोक त्याला विचारीत ।।
महाराज उत्तर देण्याआत । गेला निघून का तुम्ही ? ।।२४।।
लोकांस सांगत पंडित । मी महाराजांजवळ जाऊन बसत ।।
प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण दिसत । महाराजांच्या ठिकाणी ।।२५।।
एवढे त्यांचे तेज अपार । दिपून गेलो मी तर फार ।।
मग कसा तेथे थांबणार ? । उत्तर सोडून निघालो ।।२६।।
एका महान विद्वानाची । अनुभूती केवढी महत्वाची ।।
स्वप्न नव्हे हे प्रत्यक्षची । साक्षात श्रीकृष्ण महाराज ।।२७।।
एक बाई असे भक्त । घरी चाले भजन संगीत ।।
काही उडाणटप्पू शिरत । कुचेष्टा करती बाईची ।।२८।।
तोंच महाराज उभे दारात । हंटर त्यांच्या हातात ।।
सर्वांस हंटरने बडवीत । शरण आले सर्वही ।।२९।।
पाया पडून माफी मागा । महाराज वदती सर्वांना ।।
तसे केल्यावरतीच त्यांना । सोडून देती महाराज ।।३०।।
इच्छा एका भक्ताची । अरबस्तानला जाण्याची ।।
महाराज त्या भक्ताला घेऊनी । गेले अरबस्तानात ।।३१।।
महाराज अरबी पोषाखात । अरबस्तानात वावरत ।।
अरबी भाषेत बोलत । हिंडत उंटावरूनी ।।३२।।
तेथील लोक महाराजांस मानीत । अनेक चमत्कार तेथे करत ।।
भक्त येता जेव्हा परत । सर्व त्यांनी सांगितले ।।३३।।
महाराज श्री शैल्याला जात । जवळच पाण्याची गुंफा असत ।।
दोन दिवस गुंफेतील पाण्यात । महाराज बसले निवांत ।।३४।।
महाराज म्हणजे प्रचंड शक्ती । महाराज म्हणजे उदंड युक्ती
निसर्गावर ज्यांची अखंड सक्ती । आधार काय या तिघांना ?।।३५।।
प्रश्न तुमचा बरोबर । शंका तर योग्य खरोखर ।।
घटना घडल्या आहेत तर । प्रत्यक्ष, पहिला आधार ।।३६।।
दुसरा आधार बहुमोल । प्रत्यक्ष महाराजांचेच बोल ।।
मी जे जे सांगणार । त्याप्रमाणेच घडणार ।।३७।।

लेखणी माझ्या हातात । मी एखादी गोष्ट लिहून देत ।।
ती तशीच घडेल निश्चित । लिहील्याप्रमाणेच होणार ।।३८।।
माझे शब्द सत्य असत । खोटे ठरणार नाहीत ।।
माझ्या पहा लेखणीत । ताकद आहे प्रचंड ।।३९।।
अशक्य ते शक्य करून । मी पहा दाखवीन ।।
महाराजांचे शब्द प्रमाण । अन्य दाखले कशाला ? ।।४०।।
व्यवहारात माणूस बोलतो । परी त्याप्रमाणे न वागतो ।।
परमार्थमार्गात जो असतो । बोलत नाही कधी तो ।।४१।।
मी कितीतरी असे योग्य । म्हणणे, व्यवहारात ठरते अयोग्य ।।
परमार्थात तर कधी न योग्य । खुणा आहेत ठरलेल्या ।।४२।।
अयोग्य माणसेच परमार्थात । बढाया त्या मारतात ।।
अशांचे पितळ उघडे पडत । वेळ नाही लागत ।।४३।।
परमार्थात अधिकारी असून । अधिकार सांगतो तो ठासून।।
अधिकार त्यांचा किती महान !। कसा कोणा कळेल ? ।।४४।।
महाराज औदुंबरला असत । पुण्यात अक्कलकोटस्वामींचा भक्त ।।
फोटोग्राफी त्याचा व्यवसाय असत । दृष्टांत त्याला जाहला ।।४५।।
तू येई औदुंबराला । माझा फोटो काढण्याला ।।
फोटोंचा दिवसही सांगितला । चकीत झाला तो भक्त ।।४६।।
तो पुण्याहून गेला मिरजेस । घटना सांगितली लोकांस ।।
दोन मोटारी भरून खास । लोक निघाले दर्शना ।।४७।।
दोन मोटारी निघत । मधेच त्या बंद पडत ।।
दुरूस्तीचे खूप प्रयत्न करत । होईनात चालू त्या ।।४८।।
कारण त्या फोटोग्राफरला । दिवस होता सांगितला ।।
एकटेच फोटो काढण्याला । बोलावीले होतेच ।।४९।।
फोटोग्राफरने ओळखले । आपण सर्वांना आणले ।।
म्हणून नसते विघ्न उद्भवले । एकटे गेलेच पाहिजे ।।५०।।
लगेच सायकल घेऊन औदुंबरला तो येऊन ।।
महाराजांचे घेतले दर्शन । महाराज त्याला म्हणाले ।।५१।।
‘मी बोलावले फक्त तुला । तू घेऊन आला सर्वांना ।।
काढ माझा फोटो भला’ । फोटो त्यांचा काढला ।।५२।।
घेऊन चल मला पुण्याला । महाराज म्हणाले त्याला ।।
फोटोग्राफरने महाराजांना । स्टेशनवरती आणले ।।५३।।
त्याने तिकिट ते काढून । महाराजांचा हात धरून ।।
डब्याकडे चालला घेऊन । महाराजांना सत्वर ।।५४।।
हात वेगळाच भासत । म्हणून फोटोग्राफर पहात ।।
तोच दिसत स्वामी साक्षात । अक्कलकोट महाराज ।।५५।।
महाराज असता कलकत्यात । ऊन वारा थंडीत बसत ।।
रोज त्यांना पहात असत । एक श्रीमंत गृहस्थ ।।५६।।
आपण कोण आहात म्हणून । यांना विचारावे काय आपण ।।
महाराजांना पाहून । श्रीमंताला वाटले ।।५७।।
तोच महाराज म्हणाले श्रीमंताला । आज मी तुझ्या घरला ।।
येऊ काय जेवावयाला ? । अवश्य यावे महाराज ।।५८।।
श्रीमंताचा कलकत्यात । मोठा कत्तलखाना असत ।।
महाराज जेवण्या घरी येत । स्वागत करून बसविले ।।५९।।
भोजनाचे आणण्या ताट । पतीपत्नी आत जात ।।
ताट आणून पाहतात । अस्ताव्यस्त महाराज ।।६०।।
महाराजांचे पाय तुटलेले । डोके धडापासून कापलेले
हात दोन्ही तुटलेले । धडही पडले बाजूला ।।६१।।
एकदम त्यांना धक्का बसला । चक्कर आली दोघांना ।।
त्यांना महाराजांनी धीर दिला । शुध्दीवर आणले दोघांना ।।६२।।
दोघे डोळे उघडून पाहतात । महाराज समोर उभे दिसले ।।
काहीच कळेना, झाले भयभीत । महाराजांना म्हणाले ।।६३।।
असे भयंकर स्वरूप आपले । कधी दाखवू नका असले ।।
दृश्य भयानक आजच पाहिले । महाराज त्याला म्हणतात ।।६४।।
तुझ्या कत्तलखान्यात । रोजच असे घडत असत ।।
तेव्हा तूज भीती न वाटत । आज का भीती वाटते ।।६५।।
न जेवताच महाराज गेले । कसे जेवणार ? जिथे हिंसा चाले ।।
श्रीमंतास झणझणीत अंजन झाले । बंद केला व्यवसाय ।।६६।।
कत्तलखाने बंद केले । अन्य व्यवसाय प्रारंभिले ।।
महाराजांचे महत्व कळले । भक्त झाला पुढे तो ।।६७।।
असेच एकदा नाटकात । महाराज छिन्नविच्छिन्न होत ।।
लोक घाबरून पळून जात । महाराज उठले तसेच ।।६८।।
महाराजांकडे येत भक्त काही । साधना केली पण अनुभव नाही ।।
महाराज करीत उपदेश काही । स्पर्श फक्त करीत ।।६९।।

महाराज नुसता स्पर्श करीत । कुंडलिनी त्यांची जागृत होत ।।
तास न तास समाधी अवस्थेत । रंगून जात भक्त हे ।।७०।।
महाराज मध्यप्रदेशात । काही दरोडेखोर साध्या वेशात ।।
आले महाराजांच्या सानिध्यात । महाराजांनी ओळखले ।।७१।।
त्यांना महाराज म्हणाले पाहून । दरोडा घालून चोरी करून ।।
तुमचे होणार नाही कल्याण । याच जन्मा नव्हे तर ।।७२।।
पुढील जन्मासाठीही । पुण्य जोडावे तुम्ही काही ।।
आयुष्यभर सरकारी यंत्रणेलाही । भिऊन जगण्यापेक्षा हो ।।७३।।
आपला घाम गाळून । अगदी ताठ मान करून ।।
स्वाभिमानाने जगा म्हणून । महाराजांनी सांगितले ।।७४।।
आपणास महाराजांनी ओळखले । म्हणून दरोडेखोर ओशाळले ।।
महाराजांचे पाय धरले । 'धंदाबंद' शपथ घेतली ।।७५।।
मुंबईचा एक गरीब भक्त । महाराज त्याच्याकडे जात असत ।।
एकदा तो इच्छा व्यक्त करत । खूप द्रव्य मिळण्याची ।।७६।।
महाराजांनी खूप समजावले । पैशाच्या मागे लागू नये ।।
तरीही पैशाचा मोह त्याचा न सुटे । आशीर्वाद दिला तसा ।।७७।।
त्याची परिस्थिती बदलली पूरी । बनला मुंबईचा मोठा व्यापारी ।।
महाराजांचे त्याच्या घरी । जाणे बंद जाहले ।।७८।।
महाराज बिलीमोरियाला जात । एका कारखान्याच्या आवारात ।।
माझ्या पादुका आहेत । महाराजांनी सांगितले ।।७९।।
विश्वास लोकांना बसेना । कारखान्यातील व्यवस्थापकांना ।।
दृष्टांत झाला पहाना । पादुका आहेत या स्थळी ।।८०।।
तसेच कारख्यानाच्या आवारात । उकरून सारे पहात ।।
खरोखरीच दोन पादुका निघत । दिपून गेले सर्वही ।।८१।।
महाराजांनी पादुकांची । स्थापना करून पूजेची ।।
व्यवस्था केली नित्याची । एका भक्ता योजिले ।।८२।।
पुण्यातील भोई डॉक्टर । अमरनाथ यात्रेला जात ।।
अमरनाथ यात्रा अवघड असत । घोडा केला डॉक्टरांनी ।।८३।।
उंच डोंगर खोल दरी । प्रवास अवघड असे भारी ।।
सतत काळजी उठे उरी । केव्हा काय होईल ? ।।८४।।
घोड्यावरून प्रवास सुरू होत । अचानक घोड्याचा पाय घसरत ।।
डॉक्टर झाले भयभीत । घोड्यासह घसरले ।।८५।।
घोड्यासह घसरत घसरत । खोल अशा दरीत ।।
डॉक्टर जाऊ लागत । तोच तेथे महाराज ।।८६।।
खोल उतरत्या खड्या दरीत । चालले भोई घोडा घसरत
तिथे नसतानाही प्रगटत । महाराज अचानक ।।८७।।
एका हातात डॉक्टरला । दुस-या हाताने घोड्याला ।।
घट्ट धरले त्या दोघांना । वरती काढले तत्काळी ।।८८।।
रस्त्यावर घोडा उभा केला । घोड्यावर बसविले डॉक्टरला ।।
डॉक्टरचा प्रवास सुरू झाला । गुप्त झाले महाराज ।।८९।।
अचानक आपण कसे पडलो । खोल दरीत कसे कोसळलो ।।
पुन्हा वरती कसे आलो । कळले नाही डॉक्टरला ।।९०।।
महाराजांचे निष्ठावंत । भोई एकनिष्ठ भक्त असत ।।
मनोभावे खूप सेवा करत । मठामध्ये डॉक्टर ।।९१।।
त्यामुळे भोई जेथे जात । तिथे महाराजांचे दर्शन होत ।।
संकटकाळी धावून येत । महाराज स्वत:च ।।९२।।
जसे परम श्रध्दाळू भक्त । महाराजांकडे येत ।।
तसे गर्वाने फुगलेले पंडित । येत असती नेहमी ।।९३।।
कोणी शंका विचारीत । नसते प्रश्न कोणी करत ।।
डावपेच धरून कोणी येत नाना प्रकार लोकांचे ।।९४।।
जो मनुष्य असेल तसा । तसे उत्तर देई त्याला ठोसा ।।
जसा भाव लाभ तसा । येणा-यास मिळतसे ।।९५।।
विद्वत्तेच्या गर्वात । महाराजांस कोणी प्रश्न करत ।।
महाराज खवळून उत्तर देत । इंग्रजीतून लगेच ।।९६।।
उत्तरही अगदी अचूक असे । इंग्रजीही अगदी शुध्द तसे ।।
चकीत होऊन जात असे । विचारणारा गृहस्थ ।।९७।।
महाराज इंग्रजी कोठे शिकले ? । कसे शिकले ? पत्ता नकळे ।।
व्याकरण शुध्द उत्तरे । देऊन इंग्रजीमधून ।।९८।।
अनेक गर्विष्ठ विद्वानांचे । अनेक विचित्र शंकांचे ।।
निरसन करीत खुबीचे । महाराज खात्रीने ।।९९।।
अकलूजचे एक गृहस्थ सोलापूरला महाराजांकडे येत
खाणावळीचा डबा आणून देत । महाराज जेवावे म्हणून ।।१००।।
महाराजांनी जेवावे । आपणा प्रसाद म्हणून काही द्यावे ।।
म्हणून घाईघाईने । आग्रह करू लागला ।।१०१।।

वाट पाहून कंटाळला । रात्री तसाच निघून गेला ।।
रात्री बारा वाजण्याला । भस्मे, महाराजा भरविती ।।१०२।।
दुस-या दिवशी त्या गृहस्थांनी । विनविले अकलूजला या म्हणुनी ।।
महाराज त्याच्यासंगे जाऊनी । जेवण्यासाठी थांबले ।।१०३।।
गृहस्थ जात बाजारात । बायको तांदूळ निवडत ।।
महाराज तिच्या गळ्यात । हात घालून बैसले ।।१०४।।
गृहस्थ येता, पाहिले त्यांनी । पित्त त्यांचे खवळुनी ।।
महाराज आत्ताच जा निघुनी । महाराजांना म्हणाला ।।१०५।।
नेऊन सोड महाराज म्हणत । गृहस्थ महाराजा सोलापूरी आणत ।।
अशी किरकोळ परीक्षा घेत । अर्धवट अशा भक्ताची ।।१०६।।
मुद्दाम भोजना गावी नेले । महाराजांनी नाटक केले ।।
भक्ताचे पितळ उघडे पडले । घेती ऐशी परीक्षा ।।१०७।।
महाराजांचे चरण वंदून । मनोभावे केले वंदन ।।
सातव्या अध्यायाचे लेखन । संपले या ठिकाणी ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 8

नयन पाहून महाराजांचे । झोत पडले प्रकाशाचे
दिव्य प्रकाशात चरणांचे । दिव्य दर्शन घेतले ।।१।।
दिव्यत्वाचा अखंड झरा । दिव्यत्वाचा मेरू पुरा ।।
दिव्यत्वाचा सागर खरा । खरे चरित्र या ओवीत ।।२।।
एवढे प्रचंड दिव्यत्व । एवढे प्रचंड कर्तृत्व ।।
प्रत्यक्ष महाराजांचे अस्तित्व । दिसत होते कसे ते ? ।।३।।
महाराज होते कसे दिसत ? । हेही पाहणे गंमतीचे ठरत ।।
यातही लीलाविलास असत । महाराजांचा खुबीने ।।४।।
डोक्याचे केस अस्ताव्यस्त । दाढी मिशा वाढलेल्या असत ।।
घाण फाटका सदरा अंगात । विजारही तशीच ।।५।।
कुणाचेही कसलेही । कपडे घालीत घट्ट, ढिलेही ।।
कपड्यांना कसलाच आकार नाही । फक्त देह झाकणे ।।६।।
नित्य ते बालभावात असत । पिसाटासारखे हसत ।।
हास्याचे प्रकार सप्त असत । हळू-मोठे कसेही ।।७।।
हात दोन्ही वाकडे । पायही दोन्ही वाकडे ।।
कंबर शरीर वाकडे । अष्टवक्र महाराज ।।८।।
चालणे त्यांचे वाकडे असत । त्यांना चालता येत नसत
बोलणे त्यांचे बोबडे असत । नीट बोलता येत नसे ।।९।।
सिगारेट ओढीत सतत पिवळा हत्ती आवडत ।।
पाचशे पंचावन्नचे पाकीट । शेकडो सिगारेट प्रतिदिन ।।१०।।
अस्सल मद्य विदेशी नित्य । बाटल्यांच्या बाटल्या पीत ।।
पान-तंबाखूही खात । अनेकदा दररोज ।।११।।
सिगारेट जेव्हा ओढत । राख अंगावर कुठेही पडत ।।
बाटल्या मद्यांच्या असता पीत । मद्य अंगावर गळे ।।१२।।
पान तंबाखू ते खात । लाळ कपड्यावरती गळत ।।
स्वहस्ते जेवताही न येत । अन्न अंगावर पडे ।।१३।।
त्यांना भरवावे लागत । भरवणारा असल्यास जेवत ।।
सोलापुरी भस्मे भरवीत । आनंदाने महाराजा ।।१४।।
नजर तारवटलेली दिसत । मद्यांच्या बाटल्या जवळ असत ।।
सिगारेट पाकीटे समीप असत । पान तंबाखू असेच ।।१५।।
रूप ऐसे अजागळ । शरीर दिसे अमंगळ ।।
बावळट वाटावे केवळ । ऐसे महाराज वर्णन ।।१६।।
हे जे वर्णन झाले असत । त्यास लेखणी तयार नसत ।।
प्रत्येक शद्बास लेखणी अडत । ऐसे कैसे लिहावे ? ।।१७।।
भक्त खवळतील वाचून । ऐसे कैसे लिहिले म्हणून ।।
त्यांना वाटेल सत्य वर्णन । ज्यांनी पाहिले महाराजा ।।१८।।
म्हणून हा भाग गाळावा ठरविले । परी महाराज उद्गारले ।।
याच अध्यायात हे पाहिजे आले । दिव्य प्रचिती दिलीही ।।१९।।
समर्थातही जे पाहिले । असमर्थातही जे पाहिले ।।
दोन्ही ठिकाणी असणे पहिले । हेच त्यांचे वैशिष्ट्य ।।२०।।
हा बोध या वर्णनातून । स्पष्टपणे येतो दिसून ।।
हाच हेतू या वर्णनाचा असून । म्हणून वर्णन घडविले ।।२१।।
बरोबर कुणी असल्याविना । चालता येत नसे महाराजांना
सिगारेट मद्य तंबाखू त्यांना । देण्या मनुष्य हवाच ।।२२।।

जेव्हा महाराज सोलापुरात । भस्मे पान कुटून देत ।।
महाराजांना भरवीत । भक्तिभावे प्रेमाने ।।२३।।
महाराजांचे प्रेम फार । भक्त भस्मे यांच्यावर ।।
भस्मे यांची महाराजांवर । निष्ठा खोल अपार ।।२४।।
अजानबाहू महाराज असत । दोन डोळे तीक्ष्ण असत ।।
जणू दोन हिरेच चमकत । चंद्र – सूर्य रूपाने ।।२५।।
महाराज बोबडे बोलत । शब्द नीट न उलगडत ।।
ऐकणारास बोध न होत । काय बोलले, न कळे ।।२६।।
परी महाराज जे बोलत । काळही ते बदलू न शकत ।।
बोलल्याप्रमाणेच घडून येत । वाचासिध्दी होतीच ।।२७।।
कधी भरजरी बांधीत फेटा । रत्न सुवर्णांचा गळ्यांत कंठा ।।
सदरा रेशमी भारी मोठा । ऐटीत रहात ।।२८।।
सर्व बोटात अंगठ्या असत । सुवर्णांच्या रत्नजडीत ।।
चौकोनी पवित्रक बोटात । चमकदार अंगठ्या ।।२९।।
चहाचा शोक त्यांना भारी । चहा होई घरोघरी ।।
स्वत:ही चहा करून । अनेक वेळा घेत ते ।।३०।।
खिचडी मटार घातलेली । कांद्यांची भजी तळलेली ।।
आवड या वस्तूंवर सगळी । महाराजांची होतीच ।।३१।।
एकादशी दिवशीही । खुशीत कांदे खात राही ।।
निषिध्द त्यांना काहीच नाही । ऐसे अपूर्व महाराज ।।३२।।
भजनाची त्यांना आवड असत । संगीत भजन मुद्दाम ऐकत ।।
स्वत: रागदारीत गात । नाचत असती गातांना ।।३३।।
महाराज जेव्हा नाचत भक्तांस विविध दर्शने होत ।।
विविध देवांची साक्षात । धन्यता वाटे भक्तांना ।।३४।।
महाराज जेव्हा कुठे येत । आल्यावर 'मी आलो' म्हणत
महाराज ऐसे जेव्हा म्हणत । धन्य भक्त होतसे ।।३५।।
महाराज अगदी निर्भय असत । रात्री अपरात्रीही न भीत ।।
कधी कशाचे कुणाचे भय नसत । भीती कसली ? न ठाऊक ।।३६।।
निर्मळ भाव निर्मळ मन । लोकांच्या अडचणी जाणून ।।
संकटात अचानक धावून । वाचविले भक्तांना ।।३७।।
बाल, पिशाच्च, उन्मत्त । अशा अनेक आविर्भावात ।।
प्रखर राजयोगी असत । धनाढ्य गर्भश्रीमंत ।।३८।।
प्रत्यक्ष परब्रह्म साक्षात । महाराजांच्या रूपात नांदत ।।
अध्यात्मज्ञानाचे योगेश्वर असत । सुख शांतीचा सागर ।।३९।।
मुंबईचे वासुदेव बांबोर्डीकर । यांचे पोट दुखत फार ।।
ठरले ऑपरेशन होणार । रात्रीच ठणका लागला ।।४०।।
एकटेच होते घरात । दु:खाने झाले अती त्रस्त ।।
कोणी रात्री पाठ दाबत । दुखणे बंद जाहले ।।४१।।
घरात तर कोणी नाही । तोच आवाज ऐकू येई ।।
तू ऑपरेशन करून घेई । बरा होशील निश्चित ।।४२।।
आवाज महाराजांचा ओळखत । महाराजच पाठ दाबत कळत ।।
पुढे ऑपरेशन सुरू होत । महाराज तेथे आलेच ।।४३।।
वासुदेवाच्या आईस वदत । महाराज तिला धीर देत ।।
ऑपरेशन यशस्वी होत । नऊ डिसेंबर तारीख ।।४४।।
पुढे ब-याच दिवसानंतर येत । महाराज वासुदेवास म्हणत ।।
डॉक्टर तुज इंजेक्शन देत । डाव्या हातावरी ते ।।४५।।
नऊ डिसेंबर तारीख असत । ऑपरेशन तूझे होत ।।
ऐसे विचारून सदरा काढत । हात आपला दाखविला ।।४६।।
महाराजांच्या हातावर । त्याच ठिकाणी बरोबर ।।
ऑपरेशनच्या खूणा सर्व तर । स्पष्ट दिसू लागल्या ।।४७।।
क्लेश स्वत: स्वीकारले । वासुदेवास बरे केले
महाराजांचे उपकार आठवले । वासुदेव थक्क होई ।।४८।।
महाराज आपल्या भक्तास । अखंड भगवन्नाम घेण्यास ।।
आवर्जून सांगत या व्रतास । नाममहीमा अगाध ।।४९।।
महाराज अखंड नामस्मरणात । तल्लीन ध्यानमग्न असत ।।
त्यांची परावाणी कार्यरत । अखंड जागृत असेच ।।५०।।
महाराज शिष्यांना सांगत । माझे सदगुरू विख्यात ।।
अक्कलकोटस्वामी समर्थ असत । स्मरा त्यांना प्रतिदिन ।।५१।।
हीच माझी खरी भक्ती पहा । स्वामी समर्थांचे स्मरण करता ।।
मी झालो की आलो म्हणून समजा । अगदी तृप्त प्रसन्न ।।५२।।
महाराजांचे अत्यंत । प्रेम दोन ग्रंथावर असत ।।
दोन्ही ग्रंथ मुखोद्गत । उलटसुलटही म्हणत ।।५३।।
कोणती ओवी कोणत्या पानावर । महाराज सांगत सत्वर ।।
समर्थांचा दासबोध सुंदर । ज्ञानेश्वरी माऊली ।।५४।।

दोन्ही ग्रंथ हे वाचावेत । त्यांची पारायणे करावीत ।।
बहुमोल हे ग्रंथ आहेत । महाराज सर्वां सांगत ।।५५।।
एकोणीसशे पस्तीस साली । महाराज एका भक्तास म्हणती ।।
शंभरी माझी उलटली । वय किती हे सांगितले ।।५६।।
एकोणीसशे पस्तिसात । शंभर वर्षे पूर्ण होत ।।
यावरून त्यांचे वय कळत । आज किती असावे ? ।।५७।।
असंख्यांना महाराजांनी । आपल्या कृपाकटाक्षांनी ।।
ईश्वरी साक्षात्कार दिला करुनी । आपल्या अध्यात्मबळावर ।।५८।।
'महाराजांवर संस्कार काही न झाले । कधी शाळेतही न गेले ।।
महाराज कधीही न शिकले । कोण त्यांना शिकवील ?' ।।५९।।
अक्कलकोट, गाणगापूर । वाडी, औंदूबर, सोलापूर ।।
या ठिकाणचा ओढा फार । जात, मनसोक्त राहात ।।६०।।
गावोगावी महाराजांनी । संत - देवांचे उत्सव सुरू करुनी
भजने - प्रवचने - कीर्तने । जयघोष चाले नामाचा ।।६१।।
पारायणे अन्नदान । गाव जाई रंगून ।।
पारमार्थिक वातावरण । लोकां सत्प्रवृत्त करीत ।।६२।।
पुण्याचे आण्णा काळे भक्त । एकदा महाराज घरी येत ।।
संकष्टीचा तो दिवस असत । बायकोचे अत्यंत सोवळे ।।६३।।
बायको म्हणे आज पूजा न होणार । महाराज अभक्ष मागवणार ।।
महाराज म्हणाले सत्वर । लावा, हमकू जाना है ।।६४।।
आण्णांनी दारूची बाटली । विकत आणून त्यांना दिली ।।
महाराजांनी प्रशस्त ढोसली । दारू ग्लासामधूनी ।।६५।।
आज संकष्टीचे व्रत बुडाले । अभद्र आज घरात आले ।।
शुचिर्भूत होणे भाग पडले । बायको बाहेर पहात ।।६६।।
महाराज बसले खोलीत । दूध दिसे दारूच्या बाटलीत ।।
ग्लासातून महाराज दूध पीत । दूध झाले मद्याचे ।।६७।।
दोघे झाले अगदी चकित । संकष्टीस प्रत्यक्ष गणेश येत ।।
आणि दूध पिऊन जात । कळले नाही दोघांना ।।६८।।
एक श्रीमंत गृहस्थ असत । त्यांना श्रीमंतीचा गर्व होत ।।
ते शर्ट शिवून देत । चायना सिल्कचा महाराजांना ।।६९।।
श्रीमंतास महाराज म्हणत । घाल माझ्या अंगात ।।
महाराजांचे हात वाकडे असत । शर्ट काही जाईना ।।७०।।
कसाबसा शर्ट गेला । श्रीमंताने हार घातला ।।
महाराज म्हणाले सर्वांना । 'कसा दिसतो आता मी ?' ।।७१।।
मसाला पान मागितले । महाराज पान चघळू लागले ।।
मुखरस, पान चघळलेले । गळू लागले शर्टावर ।।७२।।
महाराज दोन्ही बाह्यांनी सतत । मुख आपले पुशीत ।।
शर्ट लाल रंगानी भरत । लालभडक जाहला ।।७३।।
विडा खाऊन झाल्यावर । महाराज उठले सत्वर
दोन्ही हात केले वर । शर्ट काढू लागले ।।७४।।
शर्ट काढताना अंगातून । शर्ट गेला फाटून ।।
पाण्यातील ढेकळासमान । थिजून गेला श्रीमंत ।।७५।।
त्याचा घालविण्या अहंकार । महाराजांनी नाटक सुंदर ।।
मुद्दामच केले वेळेवर । अहंकार भोवला ।।७६।।
मिरीचे जहागीरदार सरदार । नानासाहेब मिरीकर ।।
महाराजांचे भक्तवर । ज्ञानेश्वरी सांगत ।।७७।।
उत्तम ज्ञानेश्वरी ते सांगत । म्हणून श्रोत्यांची गर्दी होत ।।
महाराजही ऐकण्या बसत । नवल एकदा जाहले ।।७८।।
ऐकत असता महाराजांनी । भक्त निसाळांना खूणावूनी ।।
निसाळांनी बाटली आणूनी । त्यांच्यापुढे ठेवली ।।७९।।
'आणखी एक आण' म्हणती । दुसरी बाटली निसाळ आणती ।।
दोन्ही बाटल्या तोंडास लावती । एका दमात संपविल्या ।।८०।।
दोन्ही बाटल्या रिचविल्यावर । महाराज म्हणाले अरे मिरीकर ।।
तुला ज्ञानेश्वरी काय कळणार ? । आण इकडे मी सांगतो ।।८१।।
एका ओवीचे महाराजांनी । मोजून पन्नास अर्थ करूनी ।।
सांगितले मोठ्या कौशल्यानी । स्तब्ध श्रोते जाहले ।।८२।।
ज्ञानेश्वरीबद्दल फार । महाराज काढीत धन्योदगार ।।
ज्ञानेश्वरीचे कर्ते ज्ञानेश्वर । म्हणून नाव ते पडलेच ।।८३।।
या ग्रंथाचे खरे नाव असत । 'भावार्थ दीपिका' मुळात ।।
माऊली जे बोलली असत । ते परावस्थेतून बोलली ।।८४।।
वैखरी येथे थांबते । वाचा जेथे विसंबते ।।
अशा अत्यंत प्रेममय अवस्थेमध्ये । माऊली ती असतांना ।।८५।।
सरस्वतीने साक्षात । त्या प्रेममय अवस्थेच्या गंगौघात ।।
स्नान करून प्रशस्त । झाली शब्दरूप अवस्था ।।८६।।

शब्दरूप अवस्था धारण करून । ती माऊलीच्या मुखातून ।।
बिंदूऐवजी सिंधू होऊन । बाहेर पडली तेजाने ।।८७।।
ती भावार्थपदी पोचली । आणि हाच भाव पुढेही ।।
सर्व संताना दीपिकेसम होऊनी । मार्गदर्शक झालाच ।।८८।।
म्हणून या ग्रंथाप्रत । भावार्थ दीपिका म्हणतात ।।
ऐशी नामकरण मीमांसा सांगत । महाराज या ग्रंथाची ।।८९।।
पुण्यातील एका भक्ताकडे । महाराज त्याच्या घरी गेले ।।
'ये हटाव और खुदाई करो' । महाराज त्याला म्हणाले ।।९०।।
सर्व भावंडे त्या भक्तास । अगदी मुर्खात काढत ।।
जे हटविण्या महाराज सांगत । टोपलीचा संडास होता तो ।।९१।।
विरोध भावंडाचा झुगारूनी । गुर्वाज्ञा शिरसांवद्य मानुनी ।।
संडास हलविणे, सुरू केले त्यांनी । दुर्गंधीं त्रास सोसला ।।९२।।
पुढे भक्तास त्याच ठिकाणी । सुवर्ण वर्खाची गणेशमूर्ती ।।
सापडली, आश्चर्य असूनी । अर्थ, महाराज वदण्यात ।।९३।।
सोलापूरचे वकील भक्त । महाराज त्यांच्या घरी जात ।।
महाराज विश्रांती घेत । माळ्यावरती जाऊनी ।।९४।।
जाताना सांगितले सर्वांना । माळ्यावर माझ्या आज्ञेविना ।।
येऊ नये ताकीद सकलांना । महाराजांनी केलीच ।।९५।।
परी वकील शिडीवरून । महाराजा पाहण्या गेले चढून ।।
विलक्षण दृश्य पाहून । चकीत झाले वकील ।।९६।।
महाराजांचे पाय एका खुंटीवर । दुसरा पाय दुस-या खुंटीवर ।।
डोके कोनाड्यात तर । अवयव विविध ठिकाणी ।।९७।।
महाराज उच्च कोटीतील । महान योगी आहेत ।।
याची पुढे साक्ष पटत । वकीलमहाशयांना ।।९८।।
जादूगार रघुवीर रशियात । होते मॉस्को शहरात ।।
तेथे शंकरमहाराज असत । दिवस कडक हिवाळा ।।९९।।
सर्वत्र बर्फ पडत । लोक कोटावर कोट घालत ।।
महाराज साध्या वेषात । शहरभर हिंडत ।।१००।।
प्रत्येक माणूस मॉस्कोत । महाराजांस ओळखीत ।।
गरम कपडा न थंडीत । लोक चकित होतात ।।१०१।।
पुण्यात महाराज म्हणाले । मान याचे तिकिट आहे फाटले ।।
त्या टी.व्ही. वर पाहिजे आणिले । झळकले माने टी.व्ही.त ।।१०२।।
चेहरे आणि मुखवटे सदरात । मानेंची मुलाखत होत ।।
पुढे ते इहलोक सोडत । तिकिट फाटले होते ना ? ।।१०३।।
महाराज चालले टांग्यात । बरोबर काही होते भक्त ।।
अगदी म्लान असे दिसत । टांगेवाल्याचा चेहरा ।।१०४।।
महाराज टांगेवाल्याला । सांगती तेरा आकडा लावण्याला ।।
तैसे करता टांगेवाल्याला । भरपूर पैसा मिळाला ।।१०५।।
इतर भक्तांनीही तसेच केले । परी त्यांना पैसे न मिळाले ।।
महाराज सर्वांना म्हणाले । पैसे तुम्हास कशाला ? ।।१०६।।
टांगेवाल्याची बायको आजारी । तया पैशाची अत्यंत जरूरी ।।
चंगळ करावी खरोखरी । पैसा तुम्हा हवा ना ? ।।१०७।।
सतत महाराजांना आठवून । आठवूनी वंदन करून ।।
आठवणीत राहील असा छान । आठवा अध्याय संपला ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 9

दोन्ही चरणांवर करांची मिठी । प्रति बोटात झळके अंगठी
वंदुनी जयघोष ओठी । महाराजांचा केला मी ।।१।।
मस्तक ठेविता चरणांवर । महाराजानी आपला कर ।।
फिरविला माझ्या डोक्यावर । प्रसन्नतेची पावती ।।२।।
महाराज बघती प्रसन्न होऊन । आठवा अध्याय झाला छान ।।
दोन्ही प्रकारचे गुणगान । छान केले म्हणाले ।।३।।
मजला भिती वाटत होती । कोठे भक्त रागावती ? ।।
महाराज जेथे संतुष्ट होती । भिती कसली मग मजला ? ।।४।।
गोकुळाष्टमीच्या उत्सवात । महाराज अचानक हजर होत ।।
सर्वांस लिमलेटच्या गोळ्या देत । जणू प्रसाद म्हणूनी ।।५।।
निर्मला गुप्ते यांना गोळी । अगदी सुंठवड्यासारखी लागली ।।
प्रत्यक्ष कृष्णाने गोळी दिली । त्यांचा भाव पाहून ।।६।।
सोमवती आमावस्या दिनी । महाराज आले जेजुरीहूनी ।।
वासुदेव पंडीत सदनी । गादीवरती बैसले ।।७।।

महाराजांच्या शरिरातून । बघता बघता महान ।।
शिवपिंड झाली निर्माण । मी कोण ? त्यांनी सांगितले ।।८।।
अक्कलकोट स्वामी समर्थ । ठेवीत छोटे शिवलिंग सुंदर
शंकर महाराजांच्या जिभेवर । अभिषेक करत त्यावर ।।९।।
स्वत: अक्कलकोट स्वामी समर्थ । तासन् तास अभिषेक करत ।।
शंकर महाराज स्तब्ध असत । अभिषेक चालू असताना ।।१०।।
शंकर महाराज भावास्थेत । अखंड भावसमाधी लागत ।।
अगदी ध्यानमग्न अवस्थेत । रममाण होऊन जायचे ।।११।।
अक्कलकोट स्वामी महाराज । आणि शंकर महाराज ।।
यांच्यातील घटनेचा हा साज । दिव्य आध्यात्मिक असे ।।१२।।
म्हणून महाराज आपल्या अत्यंत । प्रिय भक्तास जीभ दाखवत ।।
जीभ हाताने बाहेर ओढीत । खुणावीत पाहण्या ।।१३।।
कुणा नुसता फुगवटा दिसे । कुणा लिमलेट गोळी भासे ।।
जिभेवर शिवलिंग दिसे । अगदी आत असे हे ।।१४।।
महाराजांनी या घटनेमुळे । कोडे एक सोडविले ।।
जिभेवर शिवलिंग स्थापिले । बोलता कैसे येईल ? ।।१५।।
तोंडात सुपारी किंâवा गोळी । आपण थोडी जरी टाकली ।।
बोलता येत नसे मुळी । स्वानुभव हा नित्याचा ।।१६।।
जिभेवर ज्यांच्या शिवलिंग । समर्थांनी केले स्थापन ।।
बोलता त्यांना कसे येईल ? । अगदी स्पष्ट असे हे ।।१७।।
प्रश्न उद्भवतो यावर । शिवलिंग ज्यांच्या जिभेवर ।।
त्यांची वाणी पवित्र सुंदर । प्रभावी उध्दारक अती ।।१८।।
ऐसे असता बोलण्या न येत । विचित्र सारेच वाटत ।।
प्रश्न खवचट जरी असत । तरीही अगदी योग्यच ।।१९।।
महाराजांस स्वमुखातून । बोलणे अवघड मुळीच नसून ।।
अनेकांच्या मुखातून । बोलणे कल्याणकारक ।।२०।।
नुसत्या कृपादृष्टीने पाहताना । वक्ते बनविले अनेकांना ।।
जे सांगावयाचे महाराजांना । वदले वक्त्यामुखातून ।।२१।।
असे जरी पहात असत । कैक घटना अशा घडत
महाराज स्पष्ट खणखणीत । निर्भीड अगदी बोलत ।।२२।।
जाता शिवदर्शना शिवमंदिरात । तीर्थाचा चिखल कसा ? ।।
शिवदर्शन बाजूलाच रहात । ऐसे चिकित्सक असतात ।।२३।।
अक्कलकोट स्वामी समर्थांस । 'मालक' असे म्हणत ।।
समर्थांच्या समाधीसमोर । सिगारेट कधी न ओढत ।।२४।।
स्टेशनवर महाराज जात । 'दारूड्या वेडगळ' हमाल म्हणत ।।
महाराज हमालास सांगत । 'उचल जरा मज पाहू' ।।२५।।
अगदी लावून सर्व ताकद । हमाल महाराजांस उचलत ।।
महाराज मुळीही उचलले न जात । पाय धरी हमाल ।।२६।।
हाताशिवाय झंझावातात । न विझता काडी पेटवत ।।
खाली वर ओठातोंडात । सिगारेट फिरविती ।।२७।।
हनुमान जयंतीचा दिवस असत । महाराज हनुमंताच्या रूपात ।।
एका भक्तास दर्शन देत । इच्छा त्याची पुरवली ।।२८।।
महाराज अजब चमत्कार करत । लोक सारे दिपून जात ।।
या चमत्काराबाबत । त्यांना लोक विचारती ।।२९।।
महाराज लोकासं सांगत । चमत्कार नव्हेत ।।
हे कौतुक झालेले असत । भगवंताकडून भक्तांचे ।।३०।।
महाराज नेहमी म्हणत । अक्कलकोट महाराजांच्या सान्निध्यात ।।
मी असतांना, स्वामी समर्थ । मला फार जपायचे ।।३१।।
आपल्या अंगावरचे दूध । स्वामी समर्थांनी मज पाजले असत ।।
त्यामुळे स्वामी समर्थ । माझी आई आहेत ।।३२।।
अध्यात्मसाधना अध्यात्मात । स्वामी समर्थ मज शिकवत ।।
अध्यात्मविद्येत पारंगत । त्यांनीच मला करुनी ।।३३।।
सत्रावीचे स्तनपान । करावयाला शिकवून ।।
आत्मज्ञानाचे दुग्धपान । अगदी अमृतमय असे ।।३४।।
हे अमृतमय दुग्धपान । करावयाला शिकवले म्हणून
ती माझी माऊली होत । महाराज असे सांगत ।।३५।।
अक्कलकोट महाराज समर्थ स्वामी । महाराजांच्या माऊली ।।
महाराजांच्या गुरूमाऊलीही । दोन संबंध असे हे ।।३६।।
म्हणूनीच महाराजांचे बोल । स्वामी समर्थांना जो भजेल ।।
तोच मजला प्रिय होईल । भेटेन त्याला सदा मी ।।३७।।
कधी महाराज स्वत: ब्रॅन्डी पीत । ज्यांना या घटनेचा तिटकारा वाटत ।।
त्यांना ब्रॅन्डीची नशा चढत । कैक प्रसंग असेही ।।३८।।
ओंकारनाथ व्यंकटेश भस्मे । रामभाऊ कोराड मास्तर हे ।।
एकनिष्ठ भक्त महाराजांचे । भक्तद्वयांनी ठरविले ।।३९।।

सोलापूरी जक्कलच्या मळ्यात छोटेसे दत्तमंदिर बांधून ।।
महाराजांच्या पादुका स्थापून । व्दितीय पुण्यतिथी ठरविली ।। ।।४०।।
मंदिरास रंग लावण्याचे काम । पेंटर कडलासकर करत
एकोणीसशे एकोणपन्नासात । दत्तमंदिरामध्ये या ।। ।।४१।।
महाराजांच्या पादुका दिव्य असत । स्थापना मंदिर बांधून होत
महाराजांची व्दितीय । पुण्यतिथी करणे संकल्प ।।४२।।
कडलासकर रंग लावत । मध्यरात्र उलटून जात ।।
रंग आला संपत । अजून गाभारा तसाच ।।४३।।
उद्याच पुण्यतिथी असत । अडचण मोठीच पडत ।।
रंग मिळण्याची वेळ नसत । कोंडी कशी ? किती हो ? ।।४४।।
महाराजांचे नाव घेत । पेंटर तसाच रंग देत ।।
आणि काय आश्चर्य घडत । रंगवून झाले मंदिर ।।४५।।
ज्यांनी पाहिले महाराजांना । सहवास त्यांचा घडला ज्यांना ।।
महाराजांवर पुस्तके निघाली नाना । त्यांचे भक्त - शिष्य जे ।।४६।।
या सर्वांच्या आधारावरून । महाराजांचे वर्णन ।।
पाहिले, परी या सर्वाहून । पुस्तक एक वेगळे ।।४७।।
आङग्लविद्याविभूषित । घरी लक्ष्मी गजान्त
मोठा सरकारी अधिकारी असत । पक्का नास्तिक संपूर्ण ।।४८।।
टोवर्डस् दि सिल्व्हर क्रेस्ट ऑफ हिमालयाज । त्यांनी पुस्तक लिहिले ।।
माधव प्रधान नाव त्यांचे । महाराजांवर लिहिलेच ।।४९।।
महाराज या पुस्तकात । अगदी आगळे वेगळे असत ।।
पंडित वक्ते निष्णात । विचारवंत नि:स्पृह ।।५०।।
महाराज जेथे जात असत । प्रत्येक व्यक्ती त्यांना ओळखीत ।।
दर्शनास सारा गाव जमत । प्रत्येक गावी प्रवचने ।।५१।।
अगाध महाराजांचे ज्ञान । रंगून जाई व्याख्यान ।।
लोक विचारीत नाना प्रश्न । उत्तरे देत समर्पक ।।५२।।
महाराजांच्या प्रवचनाची । पध्दत अद्ययावत पध्दतीची ।।
अगदी वेगळीच सांगण्याची । खुबी त्यांची प्रभावी ।।५३।।
रूढी भावना ज्या सांभाळल्या । सा-याच त्यांनी ऊखडून दिल्या ।।
नूतन विचारांना चालना दिल्या । ऐसे कौशल्य महान ।।५४।।
दारू सिगारेट तंबाखू पान । यांचे कुठेच नसे वर्णन ।।
महाराजांचे कुठे नावही न । गुरूदेव ऐसा उल्लेख ।।५५।।
प्रधानांचे घर संपूर्ण । अगदी सुधारक असून ।।
भारतीय संस्कारविहीन । ऐसे प्रधान स्वयमेव ।।५६।।
देव धर्म सत्पुरूष संत । तिटकारा यांचा अत्यंत ।।
ऐशा प्रधानास सत्यवंत । महाराजांनी बनविले ।।५७।।
पूर्ण नास्तिक ज्याची बुध्दी । त्याला शिकवली निर्विकल्पसमाधी ।।
प्रचंड लौकिक अती उपाधी । बडे सरकारी अधिकारी ।।५८।।
आशा प्रधानांना महाराजांनी । परमार्थात योग्यता संपादूनी ।।
हिमालयात ठेविले नेऊनी । सर्व पाश सोडून ।५९।।
प्रधान खरोखरीच भाग्यवान । नशीब त्यांचे प्रधान ।।
भेटता महाराज भगवान । गुरूदेवरूप बनलेच ।।६०।।
त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक प्रसंग । ऐकता कुणीही होईल दंग
ऐशी महाराजांची कृपा अभंग । प्रधानांवर अपार ।।६१।।
हातावर पाण्याचा थेंब पडला । त्या थेंबाचाच सागर झाला ।।
असाच प्रधानांचा प्रकार घडला । महाराजांच्या कृपेने ।।६२।।
प्रधानांचे अनुभव प्रचंड । महाराजांची कृपा उदंड ।।
अनुभव ऐकता लोखंड । सुवर्ण होऊन जाईल ।।६३।।
महाराज समाधीस्त होत । कळता समाधीजवळ प्रधान असत ।।
महाराज समाधीतून प्रगटत । भेट दोघांची जाहली ।।६४।।
सन एकोणीसशे बेचाळीसात । सासवड शुगर फॅक्टरीत ।।
मॅनेजिंग डायरेक्टर असत । सेक्रेटरी प्रधान ।।६५।।
प्रधान मुंबईस जाण्या निघत । बैलगाडीतून महाराज येत ।।
दोघांची दृष्टादृष्ट होत । प्रधान ढुंकूनही न पहात ।।६६।।
नदीवर तेव्हा पूल नव्हता । पाऊस सारखा पडत होता ।।
भिजत राहण्याशिवाय नव्हता । मार्ग प्रधानांना तो ।।६७।।
प्रधान रात्रभर भिजत । सणसणून त्यांना ताप चढत ।।
सकाळी परत बंगल्यात येत । बिछान्यावर झोपत ।।६८।।
तेवढ्यात हसण्याचा आवाज येत । प्रधान डोळे उघडत ।।
महाराज समोर उभे दिसत । प्रधानांना म्हणाले ।।६९।।
का रे, मुंबईला जाण्याची । तुजला होती ना घाई ।।
काय झाले मग ? ऐसे म्हणूनी । ते अंतर्धान जाहले ।।७०।।
प्रधानांचा ताप उतरला । महाराज म्हणाले एका गोसाव्याला ।।
अक्कलकोट स्वामी समर्थांचा । अंगारा टाक प्रधानमुखी ।।७१।।

प्रधानांच्या मुखात । गोसावी अंगारा घालत ।।
प्रधान अगदी अचेतन होत । लाकडासारखे निश्चल ।।७२।।
प्रधानास समाधी लागल । प्रधान शरीराबाहेर पडत ।।
विहार नक्षत्रांकित आकाशात । सुमधुर नाद सुगंध ।।७३।।
याचा घेत आस्वाद । सात तास समाधी अवस्थेत
प्रधान जेव्हा डोळे उघडत । प्रत्यक्ष महाराज समोर ।।७४।।
प्रधान नमस्कार करून म्हणत । आपल्या सामर्थ्यांची कल्पना नसत ।।
तुम्हीच माझे गुरू असत । आजपासून, गुरूदेव ।।७५।।
अशा रितीने प्रधानांची । आणि शंकरमहाराजांची ।।
गाठ पडली सहजची । पक्की होत गेलीच ।।७६।।
एकदा प्रधान नॉर्वेहून । जर्मनीस चालले विमानातून ।।
अचानक विमानात बिघाड होऊन । प्राणावरी बेतले ।।७७।
विमान चालवणा-या पायलटलाही । बिघाड कसा झाला कळले नाही ।।
विमानातील सर्व उतारूनीही । अशा सोडली प्राणांची ।।७८।।
महाराजांचे स्मरण । करू लागले प्रधान ।।
केवढे आश्चर्य महान । विमान सुरक्षित उतरले ।।७९।।
भेट होता महाराज म्हणत । त्या दिवशी तू विमानात ।।
एवढा का घाबरत । तेव्हा प्रधान म्हणाले ।।८०।।
'महाराज तुम्हास काय माहिती ?' । महाराज प्रधानास म्हणत ।।
तुझ्या शेजारीच मी बसलो असत । मीच अपघात टाळला ।।८१।।
प्रधान इंग्लंडला असत । त्यांचे वडील वारले भारतात ।।
शेवटची भेट होऊ शकली नसत । दु:ख याचे प्रधाना ।।८२।।
महाराज उभे प्रधानासमोर । प्रधान, महाराजांच्या मांडीवर ।।
डोके ठेवून रडले फार । सांत्वन करती महाराज ।।८३।।
महाराज प्रधानांना घेऊन । गिरनार पर्वतावर जाऊन ।।
मच्छिंद्र, गोरक्षांचे दर्शन । प्रधानांना घडविले ।।८४।।
नंतर प्रधानांना दिसले दोन श्वान । प्रगटले दत्तात्रेय भगवान ।।
प्रधानांनी घेतले दर्शन । तेव्हा शांत प्रधान हो ।।८५।।
ही दिव्य दर्शने महान असूनी । प्रत्यक्ष घडविली महाराजांनी ।।
एकदा महाराजांस प्रधानांनी । प्रश्न एक विचारला ।।८६।।
कुरूक्षेत्रावर युध्दात । अर्जुनास श्रीकृष्ण गीता सांगत
हे माझ्या बुध्दीला न पटत । प्रधानास बघती महाराज ।।८७।।
प्रधानास समाधी लागत । कुरूक्षेत्राचा स्पष्ट देखावा दिसत ।।
कौरव – पांडव युध्द सूरू असत । कृष्णार्जूनही दिसलेच ।।८८।।
युध्द तर चालूच असत । अर्जून सारखे बाण सोडीत ।।
श्रीकृष्ण घोडे हाकीत । श्रीकृष्ण गीता सांगतसे ।।८९।।
श्रीकृष्ण गीता सांगत असत । ध्यान लावून अर्जून ऐकत ।।
प्रधानही ऐकून होत चकित । स्पष्ट पाहिले ऐकिले ।।९०।।
प्रधान श्रीकृष्णाकडे पहात । तेथे त्यांना महाराज दिसत ।।
इकडे समाधी उतरत । तीन तासांची समाधी ।।९१।।
डोळे उघडती प्रधान । महाराजांचे धरले चरण ।।
प्रत्यक्ष पाहिले ऐकिले, तास तीन । निवदन केले संपूर्ण ।।९२।।
एकदा महाराज आले खूषीत । प्रधानास निश्चयाने म्हणत ।।
माग तूला हवे जे वाटत । आज आहे देणार ।।९३।।
प्रधान म्हणाले पहा बरे । मी मागितल्यावर, अन्य दुसरे ।।
आगळे वेगळे वाटेल ते सारे । माग ऐसे म्हणाल ।।९४।।
मी देईन ऐसे म्हटल्यावर । निश्चित अगदी देणार ।।
प्रधान म्हणाले यावर । 'महाराज मला ज्ञान द्या' ।।९५।।
महाराज एकदम ओरडले त्यावर । माझ्या लंगोटीलाच तू तर ।।
बेटा, हात घातलास की रे सत्वर । हरकत नाही, तथास्तू ।।९६।।
ज्ञानेश्वर माऊली सोपानदेव । यांच्या दर्शन घेण्यास्तव ।।
प्रधान गेले धरून भाव । 'अल्लख' प्रधान म्हणाले ।।९७।।
अल्लख ऐसे पुकारता क्षणी । प्रत्यक्ष प्रगटून दोघांनी ।।
दिव्य दर्शने देऊनी । धन्य कले प्रधानांना ।।९८।।
मातोश्रींच्या आग्रहावरूनी । दत्तांचे प्रत्यक्ष दर्शन घडवुनी ।।
तिला धन्य केले प्रधानांनी । इच्छा तिची पुरविली ।।९९।।
चेट्टियार मद्रासचे उद्योगपती । त्यांच्या घरी महाराज जाती ।।
लोक दर्शनास प्रचंड जमती । सर्प निघाला बागेत ।।१००।।
महाराज झाडाजवळ जात । ओठाने मधुर शीळ घालत ।।
सर्पराज सळसळ करत येत । विळखा घातला पायाला ।।१०१।।
महाराज त्याला हातात धरत । सर्पराज महाराजासं अवलोकत ।।
नंतर तो विळखा घालत । महाराजांच्या गळ्यास ।।१०२।।
महाराजांच्या डोक्यावरती । फणा काढून सर्पराज डोलती ।।
लोक घाबरून स्तब्ध होती । अरण्यात गेले महाराज ।।१०३।।

एका झाडाजवळ जाऊन । नागास तेथे सोडून ।।
‘कुणा चावू नकोस निष्कारण’ । फणा काढून मान्य करी ।।१०४।।
चरणे महाराजांची देखून । दोन्ही चरणांवर फणा टेकवून ।।
फणा आनंदाने डोलवून । सर्प गेला झुडूपात ।।१०५।।
झुडूपावर फणा काढली । कर्णमधूर शीळ त्याने घातली ।।
महाराजांनी शीळ जी वाजवली । तिला उत्तर नागाचे ।।१०६।।
सर्पाने महाराजांस ओळखले । डोक्यावर फणा काढून सुचविले ।।
हे प्रत्यक्ष शंकर नाथ भोले । पाहून कळले कुणा ना ।।१०७।।
प्रत्यक्ष उभे महाराज । गळ्यात त्यांच्या सर्पराज ।।
नमून, नववा अध्यायसाज । पूर्ण येथे जाहला ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 10

दिव्य तेजात महाराज दिसत । रूद्राक्षांच्या माळा रूळत
गळ्यात सर्पराज सळसळत । वंदन केले साष्टांग ।।१।।
महाराज मजकडे पहात । सर्पराजही मज अवलोकत ।।
दोघांच्याही दृष्टीत । दिसला आशीर्वाद मज ।।२।।
आण्णासाहेब थोरात । यांना साईबाबांच्या रूपात ।।
महाराज नगरला दर्शन देत । धन्यता त्यांना वाटली ।।३।।
महाराजांच्या फोटोस । आण्णा सातपुते नैवेद्य दाखवित ।।
जेव्हा नैवेद्याची शिते चिकटत । महाराजांच्या मुखास ।।४।।
तेव्हाच सातपुते जेवत । समाधीनंतरची ही कथा असत ।।
आपणहोऊन शिते चिकटत । भाव जैसा तो पावे ।।५।।
पानसरे समाधीमठात राहत । दृष्टान्तात महाराज त्यांना म्हणत ।।
समाधीजवळ एक विवर असत । त्यातून आत येई तू ।।६।।
माझा डोक्याला समाधीत । एक वीट आहे लागत ।।
ती करावी व्यवस्थित विवरातून परत जा ।।७।।
बुजवू नकोस ते विवर । पानसरेनी केला विचार ।।
अगदी लहान असे विवर । कैसे जाता येईल. ? ।।८।।
आज्ञा शिरसावंद्य मानून । आत गेले विवरातून
वीट डोक्यास चिकटली असून । काढून नीट बसविली ।।९।।
महाराजांचा देह भव्य । अगदी तेज:पुंज दिव्य ।।
अगाध महाराजांचे कर्तव्य । सुगंध अगदी दरवळला ।।१०।।
नुकतीच पूजा केलेली दिसत । गुलाबपुष्पे अगदी टवटवीत ।।
उदबत्यांचा घमघमाट सुटत । प्रत्यक्ष सर्व पाहिले ।।११।।
पानसरे तसेच विवरातून । बाहेर आनंदून येऊन ।।
समाधीत जे आले दिसून । सर्व त्यांनी सांगितले ।।१२।।
तात्या सहस्त्रबुध्दे । महाराजांनी त्यांना नेले ।।
गिरिनारवर, महाराज म्हणाले । तीन दिवस थांब इथे ।।१३।।
सकाळ संध्याकाळ चहा घे । मूठभर शेंगदाणे दुपारी खावे ।।
ऐसे सांगून महाराज वदले । येईन तीन दिवसांनी ।।१४।।
तीन महिन्यांनी महाराज आले । तात्यांना घेऊन वरती गेले ।।
एक शिळा काढण्या सांगितले । प्रचंड शिळा होती ती ।।१५।।
गुरूआज्ञा प्रमाण मानून । तात्या सरकवती हात लावून ।।
शिळा सरकता आली दिसून । गुहा एक विस्तीर्ण ।।१६।।
गूहेत दोघेही उतरले । महाराज तात्यांना म्हणाले ।।
कोणी काही तूज विचारले । उत्तर देऊ नको मूळी ।।१७।।
गूहेत दोघेही शिरले । महाराज मागे, तात्या पुढे चालले ।।
एक महान सत्पुरूष दिसले । उच्चासनस्थ, तपस्वी ।।१८।।
तात्यांना पाहता ते विचारत । कोण तू, का इथे येत ? ।।
तात्या अगदी स्तब्ध असत । मागे महाराज दिसले त्यां ।।१९।।
महात्मा महाराजांस म्हणत । मागे आपले हिमालयात ।।
पावणे दोनशे वर्षापूर्वी होत । दर्शन, नंतर आजच ।।२०।।
महाराज गाणगापूरला गेले । पुजा-यास ब्राह्मणेतर वाटले ।।
महाराजांस त्यांनी हाकलून दिले । महाराज तेथून निघाले ।।२१।।
रूद्र घाटावर महाराज बसले । निर्गुण पादुकांवर उपचार चालले ।।
पूजा अभिषेक मंत्र सगळे । पुजारी करू लागले ।।२२।।
जे जे उपचार पादुकांवर । ते तसेच महाराजांच्या मस्तकावर ।।
येऊ लागले झरझर । घाटावर लोक पहात ।।२३।।
स्नान घातले पादुकास । स्नान झाले महाराजांस ।।
पंचामृत घालता पादुकांस । महाराज मस्तकी आले ते ।।२४।।

मंत्र म्हणण्याच्या घाईत । पुजा-यांच्या हे लक्षात न येत ।।
जेव्हा पुजारी फुले वाहत । गडबडून गेली तेव्हा ते ।।२५।।
निर्गुण पादुकांवर फुल वहावे । ते ते लगेच गडप व्हावे ।।
महाराज मस्तकी ते पडावे । ऐसे घडत चालले ।।२६।।
काही पुजारी सोवळ्यात । रूद्र घाटावरून पाणी आणत ।।
महाराज मस्तकी फुले पडत । पाहून चकित जाहले ।।२७।।
जाऊन मंदिराच्या गाभा-यात । इतर पुजा-यांना ते सांगत ।।
रुद्र घाटावर एक माणूस बसत । दिसतो भिका-यासारखा ।।२८।।
परी त्याच्या डोक्यावरती । फुले सारखी पडताती ।।
सर्व पुजारी चकीत होती । जाऊन त्यांनी पाहिले ।।२९।।
ज्याला आपण हाकलून देत । तोच हा माणूस असत ।।
जे जे आपण उपचार करत । पूजा फुले वाहिली ।।३०।।
केले निर्गुणपादुकांवरती । ते आले याच्या मस्तकावरती ।।
पुजारी सर्व ओशाळती । शरण आले महाराजा ।।३१।।
निर्गुण पादुकांचे घेण्या दर्शन । सोवळ्याचे कडक बंधन ।।
निर्गुण पादुकांचे स्पर्शदर्शन । कुणाला होत नसेच ।।३२।।
ऐसे असताना गाणगापूरात । महाराज, आण्णा थोरात ।।
निर्गुण पादुकांवर डोके टेकवीत । स्पर्शदर्शन घेतले ।।३३।।
सोलापूरच्या जनार्दनबूवाला । महाराज घेऊन गेले कुरवपुरला ।।
रात्री झोपून पहाटेला । दोघे बाहेर निघाले ।।३४।।
एके ठिकाणी दार बंद दिसले । महाराजांनी लाथेने ते उघडले ।।
दोघेही आत शिरले । गुहा होती तेथेच ।।३५।।
आत देव्हारा होता गुहेत । त्यावर जनार्दनबूवास बसवीत ।।
महाराज त्यांच्या मुस्काडीत मारत । समाधी लागे जनार्दना ।।३६।।
पुन्हा मुस्काडात मारुन । जनार्दनबुवांची समाधी उतरून ।।
त्या जागेकडे बोट करून । महाराज त्यांना म्हणाले ।।३७।।
'श्रीपाद श्रीवल्लभ । या कुरवपूर क्षेत्रात ।।
येथेच ध्यानस्थ बसत । ध्यानस्थ बसण्याची जागा ही ।।३८।।
मुक्त करण्यास बालगंधर्वाला । मी आलो सोलापूरला ।।
गंधर्व सोडून जनार्दनबूवाला । धरले' महाराज म्हणाले ।।३९।।
साक्षात्कारी देवीभक्त । पंढरपूरकर मनोहरपंत ।।
ओंकारनाथ भस्मे यांना सांगत । आज सोलापूरात ।।४०।।
शुभराय महाराजांच्या मठात । एक महान सत्पुरूष येत ।।
दोघे त्यांच्या दर्शनास जात । मनोहरपंत म्हणाले ।।४१।।
'भस्मे, हे शंकरमहाराज असत । तूमचे जीवनमान असेपर्यंत ।।
जेव्हा जेव्हा महाराज भेटत । तेव्हा नमस्कार करावा ।।४२।।
फक्त त्यांना नमस्कार करा । काही मागू नका त्यांना ।।
देऊ नका काही त्यांना । समर्थ आहेत महाराज ।।४३।।
महाराज व्यासपीठावर बसत । दोन्ही चरणे जोडून असत ।।
भस्मे चरणांवर मस्तक ठेवत । आनंदून गेले ते ।।४४।।
चरणांचा स्पर्श होताक्षणी । दिव्य आनंद झाला क्षणी ।।
उजवा हात महाराजांनी । उगारला लगेच ।।४५।।
भस्मे यांच्या पाठीत । महाराज धपका मारीत ।।
पान कुटून देण्यास सांगत । भस्मे पान कुटीत ।।४६।।
भस्मे पान तंबाखू देत । रोज येण्यास महाराज सांगत ।।
हेच पहिले दर्शन असत । महाराजांचे भस्मेंना ।।४७।।
महाराजांनी मारता धपका । भस्मेंना कळला परमार्थाचा भपका
उजव्या हाताचा मिळता सपका । परमार्थद्वार उघडले ।।४८।।
भस्मे रोज मठात येत । महाराजांचे दर्शन घेत ।।
पान कुटून तंबाखू देत । चरणसेवा करीत ।।४९।।
भस्मे यांचे कापड दुकान । मुंबईस हुंडी लिहून ।।
दोन हजार रूपयांची हुंडी असून । रक्कम काही जमेना ।।५०।।
घातले महाराजांच्या कानावर । गुलबग्र्यापलिकडे भागीदार ।।
त्यांच्याकडे भस्मे जात सत्वर । व्यवस्था झाली रकमेची ।।५१।।
भस्मे रक्कम घेवून निघाले । उरूसामुळे वाहन न मिळे ।।
भस्मे चालत निघाले । वेळ होती रात्रीची ।।५२।।
चोरांची भीती फार असत । तेवढ्यात एक गृहस्थ येत ।।
उंच, घोंगडी, काठी असत । भस्म्यासंगे चालला ।।५३।।
भस्मे अगदी घाबरत । चोर असावा हा निश्चित ।।
तो सुपारी पान त्यांना देत । राजकारण भस्मे बोलत ।।५४।।
बरेच अंतर सोबत करून तो गृहस्थ गेला निघून ।।
भस्मे गाडीने येऊन । महाराजांना भेटले ।।५५।।
भस्मे यांना महाराज म्हणती । खास तुझ्या सोबतीसाठी ।।
'मी पांडुरंगास पाठविले करी काठी । अंगी घोंगडी, उंच तो ।।५६।।

त्याला पाहून घाबरलास । त्याला चोर समजलास ।।
राजकारण बोललास । नावही त्याचे न विचारले ।।५७।।
पान सुपारी दिली तुला । त्या माझ्या पांडुरंगाला ।।
तू चोर समजला । रागात म्हणाले महाराज ।।५८।।
भस्मे यांना खूण पटली । महाराजांची चरणे धरली ।।
क्षमा करावी, चूक झाली । चरणी मस्तक ठेवले ।।५९।।
ज्यांच्या संरक्षणास । ज्यांनी पाठविले पांडुरंगास ।।
त्या तिघांच्या अधिकारास । तिघेच जाणू शकोत ।।६०।।
रामभाऊ कोराड मास्तर । एकदा महाराजां म्हणत
आज बादलीभर दारू तुम्ही पीत । शोभते का तुम्हा हे ? ।।६१।।
महाराज शिव्या देत मास्तरास । मी दारू प्यालो म्हणतोस ।।
माझ्या मुखाचा घेई वास । तोंड त्यांनी उघडले ।।६२।।
महाराजांच्या मुखातून । गुलाबपुष्पांचा सुगंध छान ।।
सर्वत्र गेला दरवळून । कोराड झाले चकित ।।६३।।
पन्नास सिगारेट डब्यात असत । महाराज एक शिलगावत ।।
तिच्यावरच सा-या ओढीत । डबाच लागे प्रतिवेळी ।।६४।।
कित्येक डबे दिवसात । महाराज सहज करती फस्त ।।
अंगारा म्हणून ती राख देत । कामे होत लोकांची ।।६५।।
भस्मे महाराजांना बोलवित । महाराज त्यांच्या दुकानी जात ।।
द्राक्षे आणण्या मुनिमा सांगत । 'चहा किती आणू 'विचारले ।।६६।।
'बावीस कप' महाराज म्हणत । महाराज दोन द्राक्षे घेत ।।
तोच दर्शना वीस लोक येत । चहा दिला सर्वांना ।।६७।।
द्राक्षे प्रसाद देण्यास । सांगता, द्राक्षे दिली सर्वांस ।।
चहा द्राक्षे सर्वा मिळत । लीलाच महाराजांची ही ।।६८।।
सन एकोणीसशे सेहेचाळीसात । महानवरात्र अष्टमी असत ।।
महाराज तुळजापूरला जात । सोलापूर भक्तासमवेत ।।६९।।
प्रचंड गर्दी मंदिरात । भस्मे राजेशाही थाटात ।।
हटजाव ऐसे ओरडत । लोक सरकले बाजूला ।।७०।।
भस्मे आणि महाराज । देवीच्या गाभा-यात जात ।।
वैशिष्ट्यपूर्ण सांकेतिक भाषेत । महाराज देवीशी बोलले ।।७१।।
दोघेही तेथून बाहेर येत । आले मागील दरवाज्यात ।।
'घोडा होना' महाराज म्हणत । भस्मे वाकले लगेच ।।७२।।
भस्मे यांच्या पाठीवरती । महाराज ऐटीत पहा बसती ।।
भस्मे घोड्यासारखे धावती । महाराजांना घेऊन ।।७३।।
भारतीबुवाच्या मठात । देवीच्या पलंगापर्यंत
वा-यासारखे भस्मे जात । इतर भक्त मग आलेच ।।७४।।
तेथे कोणी भोपी नसत । 'दरवाजा खोलो' महाराज म्हणत ।।
भस्मे चौकटीसह दरवाजा काढत । पलंगावर बसले महाराज ।।७५।।
मधुबुवास समोर बसवून । त्यांची उजवी करंगळी कापून ।।
महाराजांनी रक्त काढून । आपल्या भाळी लावले ।।७६।।
महाराज भस्मे निघाले । 'घोडा' महाराज पुन्हा वदले ।।
भस्मे पुन्हा घोडा झाले । महाराज पाठीवर बैसले ।।७७।।
दरवाजा काढला, भोप्यास कळले । तलवारी घेऊन ते मारण्या आले ।।
इतर भक्त त्यांना म्हणाले । काढणारा गेला पुढेच ।।७८।।
तशाच स्थितीत महाराजांसह । देवीस प्रदक्षिणा घालून ।।
सा-या पाय-या वेगाने चढून । रस्त्यावरती थांबले ।।७९।
दादा फुलारी यांच्या पाठीवर । महाराज बसले नंतर ।।
त्रस्त फुलारी झाले फार । महाराजांच्या ओझ्याने ।।८०।।
तेथेच भोप्याच्या खोलीत । हे सर्व उतरले असत ।।
त्या खोलीत सर्व जात । महाराज समचरण बैसले ।।८१।।
महाराजांच्या चरणावरती । भस्मे मस्तक टेकविती ।।
अष्टभाव त्यांचे जागृत होती । ब्रह्मानंदात मग्न ते ।।८२।।
जेवणे उरकून घेण्यास । महाराज सांगत इतरांस ।।
भस्मे भानावरती येत । बसले महाराजांसमोर ।।८३।।
महाराज मोठ्याने म्हणाले । हिंदूस्थान हिंदूना दिले ।।
पाकिस्तान यवनांना दिले । आवेषात बोलले ।।८४।।
महाराजांचे हे भाकित । एक वर्षांनी खरे ठरत ।।
हिंदूस्थान पाकिस्तान होत । भारत ऐसा दुभंगला ।।८५।।
दुस-या दिवशी तुळजापूरहून । भस्मे महाराजांना भरवून ।।
सर्वांचे भोजने होऊन । मोटारीतून परतले ।।८६।।
महाराज बसत मोटारीत । भस्मे यांना समोर बसवत ।।
महाराज त्यांचा फेटा काढत । चरणे मस्तकी ठेविली ।।८७।।
दोन्ही चरणे महाराजांनी । भस्मेंच्या मस्तकावर ठेवूनी ।।
भस्मे गेले रंगुनी । चरणस्पर्श होताच ।।८८।।

महानंदाचा तो क्षण । ज्याची त्यालाच याची जाण ।।
महाराजांनी दिव्य खाण । भस्मे यांना दिलीच ।।८९।।
भस्मे यांच्या डोक्यावर । महाराजांची चरणकमले सुंदर ।।
दिसू लागली स्पष्ट मनोहर । शिक्कामोर्तब जाहले ।।९०।।
यवन सत्पुरूष महीबूब । एकदा महाराजांची गाठ पडत ।।
महाराज त्यात खडसावत । धंदा मांडला काय तू ? ।।९१।।
एवढ्याचसाठी का तू जन्मला । महीबूब अगदी ओशाळला ।।
पुन्हा सोलापूरात कधी न दिसला । काही सत्पुरूष असेही ।।९२।।
देवस्थळे महाराजांचे भक्त । त्यांच्या अंगात महाराज येत ।।
महापौर राजाराम बुरबुल । एकदा गेले भेटण्या ।।९३।।
देवस्थळेंना जेव्हा संचार होत । शरीर त्यांचे लाकडासमान बनत ।।
अगदी शंकरमहाराज दिसत । प्रत्यक्ष बुरबुल पाहत ।।९४।।
देवस्थळे संचारात । बुरबुलाशी तेलगुत बोलत ।।
संचार संपता बुरबुल वदत । तुम्हास तेलगु येते का ? ।।९५।।
देवस्थळे त्यांना सांगत । ‘तेलगू मला मुळी न कळत’ ।।
‘संचारात तेलगू कसे बोलत । संचारात वदती महाराज’ ।।९६।।
एकदा भोर येथे कारखान्यास । जमीन विकत घेण्यास ।।
बुरबुल, खासदार गंगाधर कुचन । रामकृष्ण बेत मंत्री हे ।।९७।।
मोटारीने चालले असत । पद्मावतीजवळ पुण्यात ।।
मोटार चालली वेगात । तेव्हा बुरबुल म्हणाले ।।९८।।
महाराजांची समाधी इथे । आपण दर्शन घेऊन जाऊ सारे ।।
‘येताना पाहू’ दोघे वदले । मोटार चालली जोरात ।।९९।।
समाधीच्या मठासमोर । बंद पडली मोटार
ड्रायव्हर निष्णात असे फार । चोख मशिनरी सर्वही ।।१००।।
ड्रायव्हरने प्रयत्न केले नाना । मोटार चालू होईना ।।
आणण्या मेकॅनिकाला । ड्रायव्हर गेला गावात ।।१०१।।
दोघांना बुरबुल म्हणत । मोटार दुरूस्त होईपर्यंत ।।
दर्शन घेऊन येऊ परत । आले समाधी मठात ।।१०२।।
मठात समाधीस लागून । महाराजांची मूर्ती असून ।।
त्यांच्या मुखात सिगारेट पेटवून । ठेवलेली दिसतसे ।।१०३।।
बुरबुल पहात, दर्शन घेऊन । धूर निघे सिगारेटमधून ।।
तसाच महाराजांच्या नाकातून । धूर निघे, स्पष्ट दिसे ।।१०४।।
दृश्य हे तिघांनीही पाहिले । चकीत झाले, दर्शन घेतले ।।
ड्रायव्हर आला, मोटारीत बसले । मोटार सुरू झालीच ।।१०५।।
मेकॅनिक मुळी न मिळत । दर्शनसाठीच मोटार थांबत ।।
दर्शनाने फायदा होत । आणखी एक तयांना ।।१०६।।
भोरची जमीन विकत मिळत । अत्यंत अल्प किंमतीत ।।
महाराज दर्शनाचा हा प्रभाव असत । ऐसे बुरबुल सांगत ।।१०७।।
महाराजांच्या चरणांवर । टेकवून भावे मम शिर ।।
दशम अध्याय मनोहर । पूर्ण येथे जाहला ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 11

ज्याच्या चरणास हातांचा विळखा । जे विश्वाचे असती सखा
विश्वात तूल्यबल न ज्यांच्या नखा । त्यांना वंदन त्रिवार ।।१।।
स्त्रिया एका दिवाळीत । महाराजांस न्हाऊ चालू, ठरवित
सुगंधी तेल उटणे आणीत । भस्मे तयारी पहात ।।२।।
सुगंधी तेल लावून उटणे । महाराजांना आंघोळ घालणे
हे भाग्य कसे आपणा लाभणे ? । विचार भस्मे करीत ।।३।।
महाराज न्हाणीघरात जात । ‘धोतर सोड’ भस्मेस म्हणत
महाराज दिगंबर ते होत । स्त्रिया कैशा जातील ? ।।४।।
तेल उटणे लावून । आंघोळ घाल भस्मेस सांगत
महाराजांस तेल उटणे लावून । भस्मे न्हाऊ घालीत ।।५।।
नुसता मनात विचार येत । महाराज तो लगेच पूर्ण करत
भस्मे झाले आनंदीत । कृपा केवढी गुरूंची ? ।।६।।
महाराज एकदा भस्मेस म्हणत । माग तूला जे हवे असत
‘तुम्ही आत्मदर्शन मज देऊन । शेवट गोड करावा’ ।।७।।
भस्मे असे म्हणताक्षणी । त्यांच्या उजव्या हातात महाराजांनी
आपला उजवा हात देऊनी । कानात गुह्य सांगितले ।।८।।
महाराज शांतपणे म्हणाले । ‘तुझे कार्य कृतार्थ झाले ’
भस्मे यांना कुरवाळले । महाराजांनी ममतेने ।।९।।

महाराज एकदम म्हणाले । ‘ना-या गेला ’कुणा न कळले ।।
केडगाव नारायण महाराज गेले । वृत्त दुस-या दिनी ये ।।१०।।
एकदा भस्मे मठात जात । समाधीसमोर उभे रहात ।।
भस्मे यांच्या मनात । एक विचार चमकला ।।११।।
‘मला अगदी प्रत्येक क्षण । महाराजांची होते आठवण ।।
त्यांनाही माझी आठवण । होत असेल की नाही ?’ ।।१२।।
‘आता आठवण रे तुझी । कायम ठेवतो पहा मी ?’ ।।
समाधीतून घुमला ध्वनी । भस्मे ध्वनी ऐकत ।।१३।।
भस्मे जो बांधीत फेटा । तोच महाराजांच्या मस्तकी दिसला ।।
अगदी तसाच होता बांधलेला । भस्मे चकित जाहले ।।१४।।
तेव्हापासून मूर्तीला । तसाच फेटा बांधण्याला ।।
सुरवात झाली, रिवाज पडला । यातील गुह्य असे हे ।।१५।।
आचार्य अत्रे मराठात । एक अग्रलेख लिहीत ।।
गृहमंत्री कन्नमवार यांच्यावर । खरमरीत अत्यंत जहाल ।।१६।।
कन्नमवारच्या पत्नीने सत्वर । खटला भरला अत्र्यांवर ।।
अत्र्यांना अटक होणार । एवढे प्रकरण रंगले ।।१७।।
झोपेत अत्र्यांच्या पाठीत । महाराज लाथ मारून सांगत ।।
कन्नमवार प्रकरण फाईल होत । खडबडून अत्रे उठलेच ।।१८।।
दुस-या दिनी कन्नमवार गेले । वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाले ।।
त्यांनी हे प्रकरण फाईल केले । फोनने कळविले अत्र्यांना ।।१९।।
वृत्त कळतांच अत्रे नाचत । समाधीच्या दर्शनास जात ।।
तेव्हापासून महाराजांचे लावत । फोटो कार्यालयात ।।२०।।
नाटकातही स्टेजवरती । महाराजांचे फोटो लावती ।।
ऐशी अत्रे यांची भक्ती । महाराजांवर बसलीच ।।२१।।
एकदा चारीधाम यात्रा करून । भस्मे कोल्हापुरी येऊन
जगन्मातेस अभिषेक करावा म्हणून । भस्मे यांनी ठरवले ।।२२।।
अभिषेकास भस्मे स्वत: बसत । दोनशे घागरी दूध लागत ।।
अभिषेक संपता भटजी म्हणत । ‘ देवीस मागा हवे ते ’ ।।२३।।
भस्मे लक्ष्मीकडे पहात । लक्ष्मीच्या ठिकाणी महाराज दिसत ।।
समाधीनंतरची ही घटना असत । भस्मे चकित जाहले ।।२४।।
एकदा पुण्यतिथीचा दिवस असत । भस्मे अखंड वीणा धरत ।।
मठात गर्दी प्रचंड असत । समाधीस अभिषेक जाहला ।।२५।।
समाधीला अत्तर लावण्यास । अत्तर दिले सर्वांस ।।
सारेजण अत्तर लावत । महाराजांच्या समाधीला ।।२६।।
डॉक्टर धनेश्वर लावीत अत्तर । भस्मे यांच्या डोक्यावर ।।
भस्मे म्हणती अहो धनेश्वर । समाधी आहे समोर ।।२७।।
ऐसे असता माझ्या डोक्यावर । तुम्ही का लावले अत्तर ।।
यावर म्हणती धनेश्वर । माझेच करणे बरोबर ।।२८।।
सन एकोणीसशे सेहेचाळीस । श्रीक्षेत्र तुळजापूर ।।
तुळजाभवानीसमोर । अश्विन शुध्द अष्टमी ।।२९।।
या दिवशी महाराजांनी । तुझ्या मस्तकावरती ।।
पादुका दिल्या आहेत म्हणुनी । त्यांना अत्तर लावतो ।।३०।।
जे जे उपचार समाधीस झाले । ते ते उपचार अगदी सगळे ।।
डॉक्टर धनेश्वरांनी केले । भस्मे यांच्या डोक्यास ।।३१।।
महाराज जेव्हा पादुका देत । तेव्हा डॉक्टर धनेश्वर तेथे नसत ।।
भस्मेही हे विसरून जात । प्रेरणा दिली धनेश्वरा ।।३२।।
धनेश्वर परमार्थात पुढे असत । महाराजच त्यांना प्रेरणा देत ।।
महाराज त्यांच्या मुखाने वदत । जाणीव होण्या भस्मेंना ।।३३।।
पुण्याचे दत्तात्रय गणेश अभ्यंकर । यांच्या घरी म्हणाले महाराज ।।
अंतापूरी दावलमलिक म्हणून । पीर दर्गा असे जो ।।३४।।
पीर दर्गा हा मुळात नसे । हीच मच्छिंद्रनाथांची समाधी असे
यवनी राज्यात पडतसे । नाव दावलमलिक ।।३५।।
तेथील पुजारी ब्राह्मण असत । पुजा-यास दृष्टांत होत ।।
मच्छिंद्रनाथ स्वत:चे वय सांगत । दोन हजार वर्षांचे ।।३६।।
हिंदू – मुसलमानांचा पेशावरला । भयंकर दंगा सुरू झाला ।।
त्यात अडकले नेहरू त्या समयाला । इकडे सोलापूरात ।।३७।।
महाराज रहिमबाबाकडे गेले । रहिमबाबांना खूप बडविले ।।
नेहरूना मी सोडविले । महाराज तेव्हा म्हणाले ।।३८।।
नेहरू दंग्यापासून सुटले । त्यांचे संकट महाराजांनी निवारले ।।
त्यामुळेच नेहरु वाचले । तेव्हा कळले लोकांस ।।३९।।
बॅरिस्टर मेहेंदळेंच्या घरात । महाराज एकदा झोपत ।।
अगदी प्रेतासारखेच पडत । घाबरून गेले सर्वही ।।४०।।
पुढील व्यवस्था करावी म्हणून । या विचारात गुंगून ।।
चौथ्या दिवशी आपणाहून । बसले महाराज उठून ।।४१।।

महाराज म्हणाले सर्वां । सोलापूरचे जनार्दनबुवा ।।
गेले त्यांची व्यवस्था करण्या । गेलो होतो मी पहा ।।४२।।
एकोणीसशे अडोतिसात । ही घटना असे घडत ।।
दोन्ही ठिकाणचे हे वृत्त । कळले दोन्ही ठिकाणी ।।४३।।
सिद्राम महादप्पा सोरेगावकर । फुलांचा यांचा व्यापार ।।
दादा फुलारी लोक तर । यांना प्रेमे म्हणतात ।।४४।।
एकनिष्ठ भक्त महाराजांचे । महाराजांवर प्रेम तयांचे ।।
त्यांना महाराज म्हणाले । 'काय पाहिजे माग ते ' ।।४५।।
'महाराज मज म्हणा आपले' । दादा फुलवारी यांनी मागितले ।।
मागण्यात केवढे कौशल्य भले । स्पष्ट येते दिसून ।।४६।।
महाराजांचा तीव्र संचार होता । दादा फुलारीच्या अंगात ।।
अगदी महाराजांसारखेच दिसत । संचारात फुलारी ।।४७।।
व्याघ्रमुखी होऊन । व्याघ्रध्वनी काढून ।।
संचारात जातात रंगून । दादा फुलारी या परी ।।४८।।
कसलीच आशा मला नसता । महाराजकृपे सर्व घडत ।।
म्हणून अनुभव मला न येत । वदती दादा फुलारी ।।४९।।
रामभाऊ कोराड मास्तर । नि:सीम प्रेम महाराजांवर ।।
स्तनपान करून वर । आई म्हणत महाराज ।।५०।।
महाराज नेहमी सांगत । ' प्रत्यक्ष राम समोर असत ।।
त्यांच्या चरणावर सतत । नजर माझी असेच ' ।।५१।।
नेहमी महाराज आपली मान । खालीच का करतात बसून ।।
महाराजांच्या उद्गारावरून । गुह्य याचे उकलते ।।५२।।
वीरासन घालून महाराज बसत । बसतसे जैसा हनुमंत ।।
रामासमोर महाराज बसत । हनुमंताच्या रूपाने ।।५३।।
महाराज जेव्हा समाधी घेत । देह तेव्हा हनुमंत बनत ।।
प्रत्यक्ष सर्व हे अवलोकत । हनुमंत संगती अशी ही ।।५४।।
महाराज एकदा म्हणाले । लोक गर्दी करू लागले ।।
म्हणून दारू पिणे मी सुरू केले । गर्दी तेव्हा थांबली ।।५५।।
अफू गांजा भांग मटण । दारू सिगारेट तंबाखू पान ।।
नुसते बुजगावणे हे देखून । नकली लोक फिरकत ना ।।५६।।
महाराज म्हणाले मधुबूवाला । मे महिन्यात पुरूषोत्तमबूवाला ।।
पाठवून देई पुण्याला । समाधी घेणार आहे मी ।।५७।।
महाराज बोलून निघून गेले । मधुबूवा मोठ्याने रडू लागले ।।
रडून रडून बेशुध्द पडले । उपाय करून शुध्दी न ये ।।५८।।
महाराजांना आणले । मधुबूवा शुध्दीवरती आले ।।
महाराज मधुबूवांना घेऊन बसले । एकाच ताटात जेवण्या ।।५९।।
महाराज मधुबूवांना म्हणत । 'मी गेलो जरी मसणात ।।
तरीही मी तुझ्याजवळ असत । खात्री मनी असू दे' ।।६०।।
सोलापूरी पार्शी लोकांस । जनार्दनबूवा गाणे शिकवण्यास
जात, तेथे महाराज येत । अंडी आणण्या सांगितले ।।६१।।
प्रत्येकाच्या हातावरती । महाराज अंडे ठेवती ।।
त्यावर दूध घालण्यास सांगती । जनार्दनबूवास महाराज ।।६२।।
हळदीकुंकू वाहण्या सांगत । हीच पार्थिवपूजा असत ।।
तेव्हापासून पार्शी लोकांत । पार्थिवपूजा चालली ।।६३।।
बालगंधर्व आजारी पडले । एकशे तीन टेंपरेचर आले ।।
नाटक तर जाहीर झाले । महाराज आले पुण्याहून ।।६४।।
नाटक कैसे होणार । काळजीत पडले सारे फार ।।
महाराज म्हणाले म्हणून तर । पुण्याहून आलो मी इथे ।।६५।।
डॉक्टर तपासण्यास येत । महाराज त्याला सवाल करत ।।
कुणी तूला डॉक्टर केले असत ? । काय कळते तूला रे ।।६६।।
अंतरनाड्या तपासणारा । मी बाप आहे डॉक्टरांचा ।।
सोडावॉटर बाटली आण । सिगारेट आणा म्हणाले ।।६७।।
सोडावॉटरच्या बाटलीत । महाराज सिगारेटची राख टाकत ।।
गंधर्वांना पिण्यास देत । ताप उतरला लगेच ।।६८।।
दरदरून अगदी घाम सुटत । गंधर्वास हुषारी वाटत ।।
खडखडीत गंधर्व बरे होत । नाटक झाले थाटात ।।६९।।
नाटकाच्या मध्यंतरात । स्टेजवर महाराजांची पूजा करीत ।।
महाराजकृपे नाटक होत । बालगंधर्व म्हणाले ।।७०।।
सोलापूर जक्कल मळ्यात । स्वामी समर्थांची पुण्यतिथी असत ।।
महाराज होते उपस्थित । कार्यक्रम सुरू सर्वही ।।७१।।
झाडाखाली कढईत । खीर होती अगदी शिजत ।।
झाडावरची चिमणी पडत । धुरामुळे खिरीत ।।७२।।
खीर शिजवणा-याला खिरीत । मेलेली चिमणी दिसून येते ।।
घाबरून चिमणी तो काढीत । सांगे सर्वांस घडले जे ।।७३।।

कसा नैवेद्य दाखववावा स्वामींना । काय वाढावे लोकांना
प्रश्न पडला सर्वांना । महाराज सांगती ।।७४।।
महाराज तेथे येऊनी । चिमणी हातात घेऊनी ।।
म्हणती चिमणीस कुरवाळूनी । कुठे ? कशी पडली ही ।।७५।।
तोच महाराजांच्या हातातून । चिमणी गेली लगेच उडून ।।
अडचण आता काय म्हणून ? । महाराज सर्वां विचारती ।।७६।।
थक्क होऊन सारे पाहत । कार्यक्रम झाला थाटात ।।
एकोणीसशे सेहेचाळीसात । घटना असे घडली ही ।।७७।।
जमवावीत माणसे शंभर । मज ना वाटे, महाराज म्हणत ।।
एक जरी मजजवळ येत । उध्दार त्याचा करीन मी ।।७८।।
मंदिर बांधले सुंदर । मोहक अगदी कलाकुसर ।।
मूर्तीच नसेल आत जर । बजार बुणगे ऐसे हे ।।७९।।
केशवजीभाई आशर असत । व्यापार त्यांचा मुंबईत ।।
महाराज त्यांच्या घरी जात । आशर यांना सांगत ।।८०।।
सासवड शुगर फॅक्टरीस । अर्ज कर मॅनेजर होण्यास ।।
आशर तसा अर्ज करीत । नेमणूक झाली लगेच ।।८१।।
आशरना मोठे आश्चर्य वाटत । ते महाराजांची पूजा करत ।।
पुढे ते जनरल मॅनेजर होत । महाराज प्रभाव असा हा ।।८२।।
दत्ता मिस्त्री शुगर फॅक्टरीत । रात्री त्याची आई मरत ।।
घरात रडारड चालत । महाराजांना निवेदिले ।।८३।।
महाराज सर्वांना सांगत । म्हातारीस सोडवून मी आणीत ।।
सकाळी तेथे महाराज जात । उठून बसली म्हातारी ।।८४।।
महाराज म्हणाले म्हातारीस । काल कुठे गेली होतीस ? ।।
म्हातारी सांगे सर्वांस । उग्र पुरुष मी पाहिला ।।८५।।
आला रेड्यावर बसून । ओढिले मज पाश टाकून ।।
वरती गेला मज घेऊन । एक हनुमान तेथे ये ।।८६।।
त्याने त्या पुरूषास बडवून । मला आणले सोडवून
लोकांस कळले कोण हनुमान । आश्चर्य केवढे घडविले ? ।।८७।।
महाराज सांगत रांगोळीचे । घरात स्वस्तिक काढावे ।।
त्यावर हळदीकुंकू वहावे । त्यावर पाट ठेवावा ।।८८।।
जसा आपल्या घरात । अखंड नंदादीप असतो तेवत ।।
तसे हे स्वास्तिक सुशोभित । आपल्या घरात असावे ।।८९।।
प्रधान नोकरीस दिल्लीत । अचानक त्यांना तार येत ।।
थोरले बंधू अत्यवस्थ असत । तात्काळ यावे मुंबईला ।।९०।।
विनायक थोरला बंधू असत । एक बंधू डॉक्टर प्रख्यात ।।
निष्णात डॉक्टर सारे जमत । आशा सोडली सर्वांनी ।।९१।।
विनायक म्हणाले प्रधानांना । तू आणशील का महाराजांना ।।
कोणीही मज महाराजाविना । वाचवू शकणार नाहीच ।।९२।।
प्रयत्न करतो प्रधान म्हणत । महाराजांचा तर पत्ताच नसत ।।
प्रधान खोलीत ध्यानस्थ बसत । महाराजांन आळविती ।।९३।।
अगदी आर्त स्वरात । प्रधान महाराजांना सांगत ।।
कठीण वेळ, यावे धावत । जेथे असाल तेथून ।।९४।।
भाऊ मृत्यूच्या दाढेत । डॉक्टर सारे हात टेकत ।।
तुम्हीच त्याला वाचवू शकत । प्रार्थना केली भक्तीने ।।९५।।
प्रधानांच्या कानात । महाराजांचा ध्वनी प्रकटत ।।
काळजी करू नको मी असे येत । सर्व ठीक होईल ।।९६।।
महाराज तत्काळ तेथे आले । विनायकाच्या खोलीत गेले ।।
विनायकाचे डोके थोपटले । हात कपाळी ठेवले ।।९७।।
तू बरा झालास आता । कसलीही करू नकोस चिंता ।।
आनंद विनायका झाला पुरता । महाराज सन्निध बैसले ।।९८।।
विनायकास झोप लागत । महाराज खोलीबाहेर निघत ।।
तोच डॉक्टरांचा ताफा येत । विनायकास तपासण्या ।।९९।।
महाराज डॉक्टरांना सांगत । विनायकास झोप लागत
आपोआप जाग येईपर्यंत । उठवू नका कुणी त्याला ।।१००।।
दोन तास निघून गेले । विनायकाने डोळे उघडले ।।
महाराजानीच मला वाचविले । दाढेतून मृत्यूच्या ।।१०१।।
विनायक सांगू लागला । माझा पुनर्जन्म घडवून आणला ।।
शरीरातून जाणा-या प्राणाला । महाराजांनी आणले ।।१०२।।
ते अतिमानव महापुरूष थोर । नव्हेत तर प्रत्यक्ष परमेश्वर ।।
शब्दाने त्यांचे उपकार । व्यक्त करणे शक्य ना ।।१०३।।
डॉक्टरांचा कंपू आला । तो विनायकास तपासू लागला ।।
डॉक्टरकंपू चकित झाला । खडखडीत तब्येत पाहून ।।१०४।।
महाराजांस एका संस्थानिकांनी । भ्रष्ट करण्यास वेश्यांकडुनी ।।
दारू पाजविली, परी त्या सर्वजणी । भक्त बनल्या पहा की ।।१०५।।

महाराज घटकेत लहान होत । मोठेही होत क्षणात ।।
कधी स्त्री, कधी पुरूष बनत । चमत्कार त्यांचा असा हा ।।१०६।।
दुस-या महायुध्दात । जपानवर बाँब पडणार असत ।।
ऐसे महाराज सांगत । तीन वर्षे आधीच ।।१०७।।
महाराजांच्या सुदिव्य चरणी । साष्टांग वंदन भावे करुनी ।।
अकरावा अध्याय या ठिकाणी । पूर्ण झाला असेच ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 12

अगाध ज्यांची असे करणी । अतर्क्य ज्यांची विचारसरणी
ज्यांनी रुढीला घातली गवसणी । वंदन त्यांना त्रिवार ।।१।।
महाराज देशोदेशी जात । दर्शनास गर्दी उसळत ।।
लोक अनेक प्रश्न विचारीत । महाराजांना भक्तीने ।।२।।
प्रत्येक प्रश्नावर महाराज । प्रदीर्घ प्रवचन करीत ।।
विद्वत्ता त्यांची कळून येत । मुद्देसूद प्रवचन ।।३।।
जणू ज्ञानाचा वाहे झरा । विचारांचा सुसाट वारा ।।
कल्पनांचा भव्य भारा । रूढी उखडून टाकली ।।४।।
ऐशी महाराजांची प्रवचने । प्रमुदित होत श्रोतृमने ।।
प्रवचनांचीही विविध स्थाने । सारांशरूपे ऐकू या ।।५।
श्रीशंकरमहाराज उवाच । सुख - शांती समाधान ।।
सर्वांनाच हे हवे असून । त्यास्तव धडपड चालली ।।६।।
सुख, शांती, समाधान । म्हणजे नक्की काय असून ।।
हे आधी घ्या समजून । सुख कशाला म्हणतात ।।७।।
ज्यामुळे असुख निर्माण होऊन । मन:शांती जाते बिघडून ।।
असे अडथळे दूर सारून । सुख: शांती मिळतसे ।।८।।
इच्छा, ईर्ष्या, असूया, वासना । महत्वाकांक्षा हावरेपणा
अतृप्ती, विविध कामना । जीवन गढूळ याने हो ।।९।।
त्यामुळे सुख - शांती - समाधान । या गोष्टी नष्ट होऊन ।।
ग्रंथ पुराणे वाचून । पांडित्य तुम्हा लाभेल ।।१०।।
अहंकार होईल निर्माण । त्यामुळे न मिळणार समाधान ।।
सुखदु:खाचे मूळ जाण । मनाच्या अस्थिरतेमध्ये ।।११।।
जितक्या तटस्थपणाने । मनाच्या सूक्ष्म हालचालीचे ।।
निरीक्षण करून, समजून घेण्याचे । प्रयत्न जेवढे कराल ।।१२।।
तेवढ्या प्रमाणात समस्यांची । उकल होईल पहा त्यांची ।।
आत्मसंशोधन हा त्यावरती । उपाय आहे एकच ।।१३।।
दुस-याचे मार्गदर्शन । गुरू, मंत्र, ग्रंथ, पुराण ।।
उपयोग यांचा मुळीच नसून । शुध्द वंचना असे ही ।।१४।।
जग झपाट्याने असे बदलत । जीवनमूल्ये बदलत सतत ।।
गुरू शब्दास जुन्या जमान्यात । महत्त्व होते आगळे ।।१५।।
सामाजिक, धार्मिक, नैतिक । अधिष्ठान होते गुरू शब्दात ।।
आता त्याचा मागमूसही नसत । महत्व गेले लयाला ।।१६।।
पूर्वीच्या जीवनात । भौतिकतेला स्थान नसत ।।
आजच्या जीवनात असत । भौतिकतेलाच महत्व ।।१७।।
आजची जीवनमूल्ये सारी । भौतिक सुखे मिळतील कशी ।।
या एकाच कसावरती । पारखली जातात ।।१८।।
पूर्वीच्या जीवनात । ज्या विचारसरणीने सुखी शांत ।।
जीवन समाधानी बनत । समृध्द होत असेच ।।१९।।
त्या विचारसरणीचा बळी देऊन । नवी भौतिक जीवनपध्दत ।।
स्वीकारली आहे आपण । शाश्वत मूल्ये विसरलो ।।२०।।
गुरू, ग्रंथ, मंत्र, उपदेश । यांचा पूर्वी घनिष्ट संबंध ।।
आजच्या भौतिक विचारसरणीत । महत्व त्यांचे नच उरले ।।२१।।
सध्या भक्ती कशाशी खातात ? । श्रध्दा म्हणजे काय असत ?
प्रेम कशाला म्हणतात ? । पैसा धर्मच आजचा ।।२२।।
सत्य नीती सदाचार । हे पदार्थ असू शकतात काय ? ।।
यांचा जेथे पत्ताच नसत । तिथे गुरू उपदेश कैसा कळे ? ।।२३।।
सध्या अडचणी निवारण्यास । गुरू हवाय सर्व लोकांस ।।
अडचणी दूर न झाल्यास । चालले दुस-या गुरूकडे ।।२४।।
सध्या गुरू या शब्दाला । बाजारीपणा आहे आला ।।
गुरूची आवश्यकता न लोकाला । अडचणी - निवारक गुरू हवा ।।२५।।
ऐहीक अडचणींच्या वेळी । उपयुक्त उपयोगी पडणारी ।।
गुरू ही संस्था मुळीच नाही । किंवा नव्हे उतारा ।।२६।।

सत्यश्रध्दा, समर्पणबुध्दी । भक्ती प्रेम आनंदमयस्थिती ।।
यांचा तुम्हाला अनुभव नाही । आजचे गुरूही असेच ।।२७।।
आंधळ्याला आंधळ्याने । मार्गदर्शन करावयाचे ।।
काय होईल दोघांचे ? । दोघे आंधळे जाणोत ।।२८।।
स्वत:चे गुरू व्हावे स्वत:च । सर्वांत उत्तम मार्ग आहे हाच ।।
तुमच्या सुखाच्या आड तुम्हीच । निर्माण करता अडथळे ।।२९।।
कुणाच्याही कच्छपी लागू नका । गुरू या खुळात अडकू नका ।।
हेतू न मम 'गुरूवर टीका' । उद्देश समजून घ्या मम ।।३०।।
आपल्या समस्या विचारपूर्वक । आपण जर सोडवू शकाल ।।
कोणताच प्रश्न कठिण नसत । अनुभव याचा येईल ।।३१।।
गुरू शोधावा नाही लागत । गुरूच शिष्य पारखून निवडत ।।
अज्ञान नष्ट करून ज्ञान देत । भाग्यवान हे शिष्य हो ।।३२।।
असे शिष्य आपल्या जीवनात । गुरूला सर्वोच्च स्थान देतात ।।
गुरूस्तव वाटेल तो त्याग करतात । गुरूस ईश्वर मानती ।।३३।।
गुरूवर विश्वास उतुंग अढळ । गुरूच्या ज्ञानाबाबत ।।
कर्तुमकर्तुम शक्तीबद्दल । संदेश नसतो मुळीच ।।३४।।
गुरूलाही शिष्याचे कल्याण कशात । हे पूरेपूर असते माहीत
निरपेक्षपणे साधून शिष्याहित । उध्दार त्याचा करीतसे ।।३५।।
अपेक्षित साध्य असे अंत:स्थिती । अनुभव शब्दाने व्यक्त न होती ।।
अनुभव शाब्दिक मूळीच नसती । ग्रंथोपयोग काय मग ? ।।३६।।
श्रध्दा म्हणजे ठाम विश्वास । जीत कसलीच अपेक्षा नसत ।।
तीत कधीच बदल न होत । अविचल स्थिती अशी मनाची ।।३७।।
अशी अविचलित भक्ती तुमची । आहे का कोणा देवावरती ? ।।
म्हणता देव सर्वशक्तिमान सर्वव्यापी । मूर्तिपूजा मग का करता ।।३८।।
कारण सत् चिद्घन परमेश्वरावर । पूर्ण श्रध्दा असेल तर ।।
चैतन्यस्वरूप ईश्वराशिवाय तर । मूर्तिपूजा व्यर्थच ।।३९।।
ईश्वर ज्याला । त्याला त्याच्या रागालोभाचा ।।
ईश्वरास संतोष देण्याघेण्याचा । प्रश्नच नाही उद्भवत ।।४०।।
तुम्ही देवास्तव जे जे बोलता । आणि प्रत्यक्षात जे जे आचरता ।।
त्यामागे कुठलीच वैचारिक भूमिका । नाही, केवळ विसंगती ।।४१।।
म्हणून माझे सांगणे तुम्हाला । यात अडकवून घेऊ नका स्वत:ला ।।
मनाचा मागोवा घेण्याचा । योग्य प्रयत्न कराच ।।४२।।
विष घेतले तर मरून जाल । उडी टाकू नका जळत्या चितेत ।।
कोणी सांगितले हे तुम्हास ? । सांगा गुरू कोण हा ? ।।४३।।
कितीतरी गोष्टी जीवनात । गुरूशिवाय आपण असतो करत ।।
विचारपूर्वक आचरणाचे फलित । निश्चितपणे असे हे ।।४४।।
ज्या क्षणी याल आत्मबोधावर । त्या क्षणी घडेल आत्मसाक्षात्कार ।।
आत्मजागृती नि अनुभव यात तर । क्षणालाही स्थान नसे ।।४५।।
साधनमार्गात अपेक्षा नि पूर्ती । अध्याहत अपरिहार्य असती ।।
त्यांचा शेवट निराशा विफलतेत अती । होणेच ठरते सुसंगत ।।४६।।
शिकलेला मनुष्य हा जास्तच । असमाधानी असावयाचाच ।।
नारळाचे पाणी जितके गोडच । तिते खोब-याची चव कमी ।।४७।।
जेवढी विद्वता असे जास्त । तेवढी निष्ठा कमी असत
विद्वान लोकांना पहा सतत । कल्पना जास्त स्फुरतात ।।४८।।
फार चिकित्सा करण्यात । नुकसानच होत असत ।।
म्हणून चिकित्सा मर्यादेत । अल्प अगदी असावी ।।४९।।
कल्पनेचे खरे - खोटेपण । अनुभवानीच कळते म्हणून ।।
अनुभवानंतर तत्क्षण । कल्पना थांबली पाहिजे ।।५०।।
आपल्या अंतरंगात डोकावणे । निरीक्षण व श्रध्देत मानवाचे ।।
जीवन तात्काळ बदलून टाकण्याचे । असीम आहे सामर्थ्य ।।५१।।
तुमच्या प्रत्येक कृतीत । अपेक्षा स्वार्थ दडलेला असत ।।
पत्नीकडूनही अपेक्षा असतात । निरपेक्ष नि:स्वार्थ कुणी नसे ।।५२।।
अपेक्षा स्वार्थ करण्याकरता । तुम्ही मित्रांना मदत करता ।।
समाजकार्ये दानधर्म करता । कीर्ती प्रतिष्ठा मिळावी ।।५३।।
तुमच्या देणगीचे होता कौतुक । दानधर्माचा जेव्हा उदोउदो होती ।।
तेव्हाच तुम्हास बरे वाटत । अन्यथा तुम्ही खवळता ।।५४।।
हा अहंकारच आपल्या जीवनात । जे जे भव्य अन् उदात्त ।।
त्याच्या आड असे येत । हे आत्मसंशोधन करता कळेल ।।५५।।
आशा, इच्छा, हव्यास, वित्त । कधी न शेवट यांना जीवनात ।।
सर्वोच्च बिंदू अस्तित्वात । या गोष्टींचा नसेच ।।५६।।
बोटीतून प्रवास करावयाचाच । तर बोट डोलणार हलणारच ।।
मळमळ ओका-या बोट लागणारच । सहन केलेच पाहिजे ।।५७।।
विवाह झाल्यावर सर्वांना । मूल व्हावे, इच्छितांना ? ।।
डोहाळ्यांचा त्रास प्रसूतिवेदना । कशा टाळता येतील ? ।।५८।।

त्याप्रमाणे ऐहिक जीवनात । कटकटी चुकविता येणार नाहीत ।।
जोपर्यंत हे शरीर असत । तोपर्यंत त्याच्या व्याधीही ।।५९।।
कोणी मला विचारतात । तुम्ही आम्हाला काय दिले असत ? ।।
न मागताच मी असे देत । मागण्याची जरूरी का ? ।।६०।।
जी घटना घडलेली घडत । तीच मी दिलेली असत
तुम्ही मागितले, मी दिले नसत । ऐसे काय सांगा ते ।।६१।।
कशाचीही गरज न ज्याला । इच्छित नाही पदार्थ कसला ।।
कधी न पैशाच्या मागे तो लागला । संग्रहाचा न हव्यास ।।६२।।
ते कुणाची न करती स्तुती । कुणाची मेहेरबानगी न संपादती ।।
अप्रसिध्द अज्ञात असे असती । निर्भय ब्रह्मानंदात ।।६३।।
व्यक्तिश: मला कशाची गरज नसत । मला हवे, असे काहीच नसत ।।
दु:खी असमाधानी मुळीच नसत । मन:शांती कधी ढळत नसे ।।६४।।
मजजवळ काही न गमावण्यासारखे । काहीच नसे मिळविण्यासारखे ।।
ईश्वराने जे जे असे निर्मिले । त्यात माझ्यात फरक ना ।।६५।।
जे समजल्याने जगात । समजण्यासारखे काही न उरत ।।
अशा मनाच्या स्थितीत म्हणतात । सत्य - आत्मदर्शन ।।६६।।
जे नाही, ते मिळवावयाचे । अशा स्वरूपाचे साध्य नाही ते ।।
ज्याचे स्वरूपच अनिश्चित जिथे । नेतिनेति वेद म्हणतात ।।६७।।
रूढीचे ओझे बुध्दीवर नसेल । तेव्हाच बुध्दीस स्वातंत्र्य मिळेल ।।
आत्मसंशोधनाचे सामर्थ्य वाढेल । महान अनुभव येतात ।।६८।।
हे जे अनुभव येतात । हा जो साक्षात्कार असे घडत ।।
हे जे आत्मदर्शन होत । देव यालाच म्हणतात ।।६९।।
ऐकावे जिवाचा करून कान । लक्षपूर्वक करावे निरीक्षण ।।
त्यामुळे प्रगल्भ प्रचोदायी महान । हुकुमी अनुभव येतात ।।७०।।
अष्टेंद्रिये शरीरात हालचाल करीत । अशा या निर्विकल्प स्थितीत ।।
माणसाला आत्मदर्शन घडत । आत्मानुभव याला म्हणतात ।।७१।।
ब्रह्म चैतन्यरूप अविनाशी असत । त्याला जन्ममृत्यू मुळीच नसत ।।
ज्याला जन्ममृत्यू आदि असत । मायारूप सर्व ते ।।७२।।
ज्ञान अनुभवांच्या समन्वयाने । मायेपासून सुटका होते ।।
ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या असे । वचन प्रसिध्द असेच ।।७३।।
ज्यांना प्राप्त झाले खरे ज्ञान । सत्याचे झाले दर्शन ।।
जाणले जीवनाचे सर्व पैलू छान । अवतार त्यांना म्हणतात ।।७४।।
सर्व अवतारी पुरूषांची शिकवण । आणि अनुभव एकच असून ।।
पध्दतीत फरक येतो दिसून । काळ - स्थितीप्रमाणे ।।७५।।
संताची विचारधारा शिकवण । सर्वच अगदी एकच असून ।।
भक्त विसरतात शिकवण । माजवतात अवडंबर ।।७६।।
जाणीव आणि नेणीव । मनाच्या दोन अवस्था असत ।।
जाणिवेत असतो अहंभाव जागृत । नेणिवेत अहंभाव नसतोच ।।७७।।
या दोन अवस्थांच्या पलिकडे । उच्च अवस्थेत मन जेव्हा जाते ।।
पूर्ण चेतन ज्ञानातील ही अवस्था असे । समाधी याला म्हणतात ।।७८।।
समाधी केव्हाही लावता येते । कार्य संपल्यावर समाधी घेता येते ।।
समाधी लावणे, समाधी घेणे । वेगळे दोन प्रकार हे ।।७९।।
मी जे असतो बोलत । त्याचप्रमाणेच सर्व घडून येत ।।
मी सिध्दीच्या मागे नसत । सिध्दीच्या मागे लागू नका ।।८०।।
मिळाले त्याचा आनंद लुटा । अप्राप्याच्या मागे धावू नका ।।
भगवंताने अनेक गोष्टी दिल्या । उपभोगसामर्थ्यही दिलेच ।।८१।।
ते सोडून वेगळ्याकडे धावणे । सिध्दीच्या मागे न लागणे ।।
हीच सिध्दी प्राप्त होणे । अत्यंत महत्वाचे असे हे ।।८२।।
मानवी शरीर ही महासिध्दी । त्यात आपणास दिली बुध्दी ।।
जड फायदे देते सिध्दी । आपणा जडापलीकडे जायचे ।।८३।।
सिध्दीपेक्षा श्रेष्ट भक्ती । सर्व संताची हीच उक्ती ।।
सिध्दीने मिळत नसे मुक्ती । मुक्तीचा मार्ग भक्तीच ।।८४।।
सोपे असे नुसते वाचणे । महत्वाचे भवसागरातून वाचणे ।।
असेल दु:खातून बाहेर पडणे । वाचण्याप्रमाणे कृती हवी ।।८५।।
रत्नजडित मुगुट राजांच्या डोक्यावर । परी समाधान न तिळभर ।।
समाधानाचा मुगुट ज्यांच्या हृदयावर । तेच राजे खरे हो ।।८६।।
निर्गुण परमेश्वराचे रूप सगुण । प्रत्यक्ष आई - वडील घरी असून
त्यांच्याकडे दुर्लक्ष करून । देवामार्गा लागता ।।८७।।
म्हणून समाधान मिळत नाही । घरीच आई वडीलाची ।।
मनोभावे सेवा करा तुम्ही । समाधान येईल चालत ।।८८।।
आत्मसाक्षात्काराकरिता । शास्त्र, गुरूपासून आत्मा अनात्मा ।।
यांचे स्वरूप समजावून घेण्याला । ज्ञान ऐसे म्हणतात ।।८९।।
अष्टांगाच्या अभ्यासाने । चित्ताचा निरोध करणे ।।
प्रयत्नपूर्वक हे आचरणे । योग्य याला म्हणतात ।।९०।।

अज्ञानाने देह - आत्मा या दोघांच्या । अन्योन्याध्यासात ये उदयाला ।।
हात घालून वेगळे करतो दोघांना । विवेक त्याला म्हणतात ।।९१।।
असा विवेक जागा रहावा सदैव । मी शरीर नसून आत्मा असत ।।
असणे असा विचार अंत:करणात । यालांच तप असे म्हणतात।।९२।।
दु:खिताला होणारे दु:ख । कारूण्याने नाहीसे असता करत ।।
सुष्ट दुष्ट हा न करणे भेद । दया याला म्हणतात ।।९३।।
कर्मेंद्रियाचे व्यवहार । बंद पडतात प्राण जिंकल्यावर ।।
बंद होतात ज्ञानेद्रिये व्यवहार मनोनिग्रह केल्याने ।।९४।।
सर्व ओझे सहन करीत असताना । सहन करण्याच्या अभिमानाला ।।
मुळेच स्पर्शन होणे याला । क्षमा ऐसे म्हणतात ।।९५।।
दुस-यास क्षमा केली तर । आतून आनंद - राशी प्रगटतात ।।
क्षमेचा निर्भेळ हा आनंद । चिरकाल असतो टिकणारा ।।९६।।
आध्यात्मिक आधिभौतिक । आधिदैविक संकटे आकस्मिक ।।
येता धारक शक्तीने जो पचवित । धैर्य त्याला म्हणतात ।।९७।।
निष्काम धर्माचा आचार । अंतरी आत्मानात्म विचार ।।
अंगी मुरलेत खरोखर । शौच याला म्हणतात ।।९८।।
साधण्यासाठी स्वत:चे हित । इतरांचे न करणे मुळीच अहित ।।
न करणे प्रयत्न निंद्य कलुषित । याला अद्रोह म्हणतात ।।९९।।
सद्गुणामुळे नयोग्य असुनी । मान दिला असता लोकांनी
लज्जित होणे विनयांनी । अमानित्व याला म्हणतात ।।१००।।
अशा या सदगुणांची सतत । वाढ व्हायला हवी असत ।।
त्यामुळे दडलेले माणसात । देवत्व प्रकट होतसे ।।१०१।।
त्याचे आंतर्बाह्य जीवन । निघेल अगदी उजळून ।।
कृतार्थ होईल जीवन । धन्य होईल मानव ।।१०२।।
मी राहतो कैलासात । शंकर माझे नाव असत ।।
जगाला समजून देण्या मी येत । सार्थक करून घ्या आपले ।।१०३।।
पुष्कळ रंग या जगात । इथला रंग निराळा असत ।।
हे गुह्य कुणाला न समजत । गुह्यात गुह्य असे हे ।।१०४।।
जो स्वत:ला ओळखतो । तोच मला जाणू शकतो ।।
सर्व ऐश्वर्य ओवाळून जरी टाकले । किंमत त्याची मुळी ना ।।१०५।।
समजावून घे, जर समजेल । मागाहून पश्चात्ताप होईल ।।
आमचे काहीच न बिघडेल । नुकसान आहे तुझेच ।।१०६।।
लिहा दगडांच्या भिंतीवर । सुवर्णाक्षराने हे सुंदर ।।
आठवतील वेळ आल्यावर । आमचे बोल सर्व हे ।।१०७।।
प्रकांड पाण्डित्य महाराजांचे । देखून वंदन केले भावे वाचे ।।
लेखन द्वादश अध्यायाचे । पूर्ण येथे जाहले ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 13

श्री भगवान उवाच । श्री शंकरमहाराज उवाच
हे दोघेही मुळात एकच । वंदन दोघांस व्दिवार ।।१।।
दोघे एकच हे विधान । प्रख्यात पुरातन सनातन ।।
शिवस्य ह्रदयं विष्णु । विष्णुस्य ह्रदयं शिव: ।।२।।
एका भक्तास महाराजांनी । कुरूक्षेत्राचे युध्द दाखवूनी ।।
स्वत: श्रीकृष्ण होऊनी । भगवद्गीता सांगितली ।।३।।
धर्माच्या व्यवस्थित घडीवर । श्रीकृष्णाचा होत अवतार ।।
धर्माची घडी विस्कटल्यावर । अवतार महाराजांचा हो ।।४।।
दोघांनी सांगितले एकच । विश्लेषणात तरीही फरकच ।।
सत्य कळणार, रुढी टाळताच । महाराजांचे सांगणे ।।५।।
आपण शिवलीलामृत वाचता । तशाच घटनांची ही शंकर गीता ।।
दोन्ही ग्रंथाचा करविता । असती महाराज शंकर ।।६।।
दिगंबर राजयोगीयांस । महाराज दीक्षा देत परमहंस ।।
महाराज समाधी घेताच त्याच वेळेस । इंदोर येथे प्रगटले ।।७।।
राजयोगी यांस महाराज म्हणती । 'माझी पूजा नैवेद्य कर आरती ।।
नर्मदेस चाललो मज दे छाटी' । राजयोगी पूजा करीत ।।८।।
महाराज राजयोगींना आज्ञा करत । माझे स्थान वाघोड असत
नोकरी सोडून हे सांभाळ स्थान । घटना समाधीनंतरची ।।९।।
शुभराय महाराज मठात । शुभरायाची गादी असत ।।
अनुग्रह देऊन गादीवर बसवीत । पंरपरा ही असेच ।।१०।।
परी अनुग्रहाविना गादीवर बसवीत । जनार्दनबूवास, पिताजी सांगत ।।
याला अनुग्रह देण्यास येणार आहेत । महान अवतारी पुरूष ।।११।।

जनार्दनबूवा पूजा होते करत । एक व्यक्ती देवघरात शिरत ।।
गोंधळ झाला, कोण आत जात ? । दोघे गुप्त जाहले ।।१२।।
श्रीपाद श्रीवल्लभांचे जे स्थान असत । त्या कुरवपूरच्या भुयारात ।।
दोघे प्रगटून आत शिरत । महाराज साक्षात प्रगटले ।।१३।।
मांडीवर बसवून जनार्दनाला । तारकमंत्राचा अनुग्रह दिला ।।
अपूर्व अगदी योग हा भला । धन्य जनार्दन जाहले ।।१४।।
महाराज जनार्दनबूवास । 'बुवा' म्हणुनीच संबोधीत ।।
बूवा नेहमी महाराजांस । 'मालक' म्हणत आदरे ।।१५।।
महाराजांची अत्यंत प्रीती । शिष्य जनार्दनबूवावरती ।।
बूवामुळेच अनेकांना लाभती । शंकरमहाराज पहा हो ।।१६।।
ज्ञानेश्वरास पांडुरंगानी । स्वत: दिली समाधी ।।
जनार्दनबूवास स्वत: समाधी । महाराजांनी दिलीच ।।१७।।
जनार्दनबूवांचा अधिकार । यावरून स्पष्ट होतेतर ।।
धन्य – जनार्दन – शंकर । धन्य शुभराय मठ तसा ।।१८।।
एका रविवारी जनार्दनबूवांनी । धनुर्मास करण्याचे ठरवूनी ।।
महाराजांची संमती घेऊनी । निमंत्रिले सर्वांस ।।१९।।
या वेळी सोलापूरात । शंकराचार्यांचा मुक्काम असत ।।
त्यांनाही केले निमंत्रित । बोलावणे गेलेच ।।२०।।
शंकराचार्य आपल्या स्थानात । पार्थिवपूजा होते करीत ।।
जे उपचार ते पार्थिवावर वहात । अदृश्य होऊ लागले ।।२१।।
माझे उपचार कोठे गेले ? । अंतर्ज्ञानाने मग त्यांना कळले
माझे उपचार जाऊ लागले । महाराजांच्या पदावर ।।२२।।
मठात महाराजांच्या चरणावर । कोठून येतात हे उपचार ? ।।
भक्त पाहती हा चमत्कार । शंकराचार्य आलेच ।।२३।।
ती आपण पार्थिवपूजा जी केली । महाराज चरणावरती आली ।।
शंकराचार्यांनी प्रत्यक्ष पाहिली । निवेदन केले सर्वही ।।२४।।
ब-हाणपूरचे वैदिक शास्त्री । त्यांना नव्हती संतती ।।
सांगता महाराज त्यांना म्हणाली । चल रे शास्त्री मजसंगे ।।२५।।
दोघे गावाबाहेर जात । चालचालून शास्त्री थकत ।।
चहा बिडीची त्याला तल्लफ होत । डांगरावर दोघे थांबले ।।२६।।
महाराज टाळी वाजवीत । एक मुलगा चहा आणीत ।।
बिडीबंडल आगपेटी असत । दोन कपबशा किटलीही ।।२७।।
दोन कपांचीच किटली असत । दोघांना तो चहा देत ।।
शास्त्रीस आणखी हवा असत । चहा अमृततुल्य हो ।।२८।।
महाराज सांगता मुलास । हवा तेवढा दे शास्त्रीस ।।
तीन कप पिता म्हणे बास । बिडी घेतली शास्त्रीने ।।२९।।
डोंगरात चहा कुणी आणला ? । तो अमृततुल्य का वाटला ? ।।
शास्त्री तीनच कप चहा का प्याला । एकच विडी का ओढली ।।३०।।
याचा संदर्भ पुढे कळाला । चहा महाराजांनीच आणला ।।
प्रसाद होता, म्हणून वाटला । अमृततुल्य चहा तो ।।३१।।
शास्त्रीस तीन मुले झाली । नंतर एक मुलगी जन्मली ।।
चहा पुल्लिंगी म्हणून मुले झाली । मुलगी, बिडी स्त्रीलिंगी ।।३२।।
हिवाळ्याचे होते दिवस । महाराज म्हणाले जनार्दनबूवास ।।
मी खोलीत बसतो शौचास । थंडी फार वाजते ।।३३।।
खोलीस कुलूप लावून ठेवा । घाण मुळीच काढू नका ।।
पंधरा दिवस कार्यक्रम असा । महाराजांचा चालला ।।३४।।
पुढे पंधरा दिवस ठेविली खोली बंद । महिनाभर खोली बंद असत
एकदा एक महारोगी येत । जनार्दनबुवास म्हणाला ।।३५।।
मला देवीचा दृष्टांत झाला । जावे शुभराय मठात सोलापूरला ।।
शकरमहाराजांच्या दर्शनाला । म्हणून आलो इथे मी ।।३६।।
महाराज म्हणाले बुवा त्यास । त्या कुलुप लावललेल्या खोलीत नेऊन ।।
कपडे काढून सर्वांगास । उटी तेथील लावावी ।।३७।।
बूवा त्याला तैसे करती । रोग्यास लाभली रोगमुक्ती ।।
शरिरास आली दिव्य कांती । युक्ती कैशी महाराजांची ? ।।३८।।
पंधरा दिवस हिंदू – मुसलमानात । मुंबईत तीव्र दंगा चालत ।।
भक्त मोटार – कारखानदार श्रीमंत । महाराज होते त्याकडे ।।३९।।
मध्यरात्री महाराज म्हणाले । आपणास आता जावयाचे ।।
महमदअली रोडने पुढे । गाडी काढ बाहेर ।।४०।।
दंग्याचा जो रस्ता असत । तोच रस्ता महाराज सांगत ।।
ड्रायव्हरसह सारेच घाबरत । गाडी निघाली वेगात ।।४१।।
मुसलमान जमले गाडी अडवीत । महाराज सार्वांना दरडावत ।।
सरका मज जरुरीचे काम असत । परत येताना भेटेन ।।४२।।
आश्चर्य मुसलमान बाजूस झाले । महाराज काळबादेवीकडे गेले ।।
बंद दरवाजे पटापट उघडले । रौद्ररूप घेत महाराज ।।४३।।

महाराजांनी शिव्यांची लाखोली । काळाबादेवीला वाहिली ।।
पटापट दारे बंद झाली । महाराज बाहेर पडताच ।।४४।।
आल्या रस्त्यानेच मोटार परतली । सर्व मुसलमानांची गर्दी झाली ।।
पुष्पहार प्रत्येकाच्या करकमली । तबक पान - सुपारीचे ।।४५।।
महाराजांची ते वाटच पहात । या अल्ला, या परवर दिगार ।।
या खुदा, ऐसे म्हणत घालत । हार प्रत्येक, महाराजा ।।४६।।
पानसुपारी वाटली । यातच रात्र संपली ।।
द्वेष - काळोख संपून उगवली । प्रभात नव्या दिवसाची ।।४७।।
इंग्लंडचा एक युरोपियन असत । गर्व्हनर होता कलकत्यात
बायको त्यांची इंग्लडात । महाराज कलकत्यामध्ये ।।४८।।
बदली होईना, रजा मिळेना । गव्हर्नरास होती यातना ।।
एका मित्राने सांगितले त्यांना । महाराजांना सांगावे ।।४९।।
गव्हर्नर महाराजांस विनंती करी । मी माझ्या जाईन घरी ।।
सात वर्षे झाली पुरी । एकटाच येथे असे मी ।।५०।।
बायको माझी एकटी । घरी झुरत असेल माझ्यासाठी ।।
बदली व्हावी मम उठाउठी । ऐसे करावे महाराज ।।५१।।
महाराज त्याला समजावीत । अरे तू इथे असे आनंदात ।।
बदलीचा विचार न आणी मनात । गव्हर्नरला पटेना ।।५२।।
प्रत्यक्ष तुज पहावयाचे असेल जर । पहा माझ्या हातावर ।।
हात दाखवून त्याच्या समोर । महाराज त्याला म्हणाले ।।५३।।
महाराजांच्या हातावर । गव्हर्नरास दिसले आपले घर ।।
बायको घेऊन प्रियकर । रममाण होती झालेली ।।५४।।
जणू टी.व्ही. आहोत पहात । ऐसे दृश्य स्पष्ट दिसत ।।
परपुरूषास पाहून भडकत । पित्त गव्हर्नराचे ।।५५।।
गव्हर्नर म्हणे संतापून । आत्ताच इंग्लडला जाऊन ।।
करतो त्या पुरूषाचा खून । गोळ्या झाडून क्षणात ।।५६।।
महाराज गव्हर्नरास म्हणती । इंग्लडला जाण्याचे कारण नाही ।।
आत्ताच गोळ्या घालुनी । खून करावा लगेच ।।५७।।
त्या पुरूषाचा दोष नसून । तुझी बायकोच त्याकडे जाऊन ।।
त्याला आणते बोलावून । तिच्यावर गोळ्या झाड तू ।।५८।।
गव्हर्नर गेला भडकून । बायको महाराजहातावर देखून ।।
तिच्यावर पिस्तूल रोखून । सहा गोळ्या झाडल्या ।।५९।।
गव्हर्नर येता भानावर । आपण महाराजांच्या हातावर ।।
गोळ्या झाडल्या भराभर । पश्चात्ताप त्याला जाहला ।।६०।।
क्षमा मागितली महाराजांस । पाहता महाराजांच्या हातास
त्यास कसलीच खूण न दिसली! । चकित झाला गव्हर्नर ।।६१।।
त्याला दुस-या दिवशी तार येत । आपल्या बायकोचा खून होत ।।
खूनी सहा गोळ्या झाडत । शोधात आहोत खूनीच्या ।।६२।।
महाराजांनी सांगितले । तसेच अगदी घडून आले ।।
पिस्तूल हातावर झाडले । बायको मेली घरात ।।६३।।
गोळ्या घालूनही हात । अगदी तसाच असत ।।
गव्हर्नर झाला चकित । पाय धरी प्रभूचे ।।६४।।
भस्मे घेऊन महाराजांस । बसवीत पहा शौचास ।।
महाराजांच्या विष्टेस । सुगंधी अगदी येतसे ।।६५।।
विष्टेसही सुगंधी येत । त्यामुळे भस्मे चकित होत ।।
महाराज त्यांना सांगत । शुध्द असावा मनुष्य ।।६६।।
जेव्हा अंतर्बाह्य शुध्दता असत । तेव्हाच विष्टेस सुगंध येत ।।
ऐसी शुध्दता ती सतत । टिकवून ठेवली पाहिजे ।।६७।।
महाराजांच्या या वचनावरून । आपआपले अंत:करण ।।
घ्यावे सर्वांनी तपासून । किती शुध्द आपण ? ।।६८।।
एक भक्त करून नमस्कार । 'माझे काम केव्हा होणार ?'।।
विचारी, महाराज म्हणती सत्वर । मी मेल्यावर होईल ।।६९।।
भक्त मग चौकशी करीत । महाराजांचे वय किती असत ।।
काम होण्यास महाराज कधी जात । हाच ध्यास भक्ताला ।।७०।।
मग महाराजांस वय विचारत । महाराज रागाने ओरडत ।।
वेड्या तुझ्यातील 'मी' जेव्हा मरत । तेव्हा काम होईल ।।७१।।
या भक्तासारखेच भक्त । आपण सारे आहोत ।।
काम होण्यावर आपली नजर असत । प्रज्वलित 'मी' ठेवून ।।७२।।
काहीही होवो महाराजांचे । काम व्हावे आमचे ।।
वादळ अशा विचारांचे । सतत चाललेले असतेच ।।७३।।
आपल्यातील 'मी' चिरंजीव । करीत असतो यत्ने सतत
सांगण्याचा 'काम नाही होत' । 'हक्क काय आपणा ?' ।।७४।।
नुसते 'मी' ही आपण न सोडीत । श्रध्दा भक्तीचा पत्ताच नसत ।।
वासनांचा धुमाकूळ चालत । कैसे महाराज कळतील ? ।।७५।।

महाराज काशीक्षेत्रात । बुटासह महादेवावर बसत ।।
पुजारी त्यांना हाकलून देत । महाराज गेले नदीवर ।।७६।।
पुजारी जाता मंदिरात । मंदिर गरगर असे फिरत ।।
मंदिरात पुजा-यास जाता न येत । घाबरुन गेले अत्यंत ।।७७।।
जो महादेवावर होता बसून । त्याला आपण दिले हाकलून ।।
त्याचाच परिणाम हा असून । खात्री पुजा-यांची जाहली ।।७८।।
हुडकू लागले सगळे त्याला । गंगेवर नावेत तो दिसला ।।
शरण गेले, वदती त्याला । महाराज क्षमा करावी ।।७९।।
महाराज वदती रागावून । का आलात विश्वेश्वर सोडून ।।
महादेव मंदिरात नसून । मंदिर फिरते गरगर ।।८०।।
पुजा-यास महाराज सांगत । जा दिसेल विश्वेश्वर मंदिरात ।।
मंदिराचे फिरणेही होईल शांत । पुजारी गेले मंदिरी ।।८१।।
मंदिराचे फिरणे बंद होत । विश्वेश्वर मंदिरात दिसत ।।
पुजारी महाराजांची पूजा करीत । मोठ्या भक्तिभावाने ।।८२।।
आधी पूजा महाराजांची । नंतर काशी विश्वेश्वराची ।।
महिनाभर याप्रमाणेची । महाराज होते नावेत ।।८३।।
पहिला निजाम महाराजांना भजत । दुसरा निजाम मुळी न मानत ।।
त्याने दिवाण सालारजंगाकडून । हाकलून दिले महाराजा ।।८४।।
महाराज म्हणाले दिवाणाला । तुझा राजा सिंहासनावर मला ।।
पुन्हा बसवितो की नाही तेच पहा । वादळ सुटले लगेच ।।८५।।
मुसळधार पाऊस सुरू झाला । गाव पाण्यात बुडाला ।।
दुसरा निजाम घाबरला । अचानक कसे घडले हे ? ।।८६।।
सालारजंग म्हणे निजामाला । तुम्ही हाकलून दिले महाराजाला
संकट भोवले तुम्हाला । शरण जाता टळेल ।।८७।।
निजाम महाराजांस शरण जाऊन । सिंहासनावर त्यांना बसवून ।।
महाराज म्हणाले खण नारळ देऊन । ओटी भरावी नदीची ।।८८।।
ओटी भरता, तासात । पाणी संपूर्ण ओसरत ।।
महाराज निजामास म्हणत । 'परीक्षा पाहतोस काय मम ?' ।।८९।।
तुझी एकच पिढी राज्य करील । तू रजकधोबी गुरुचरित्रातील ।।
तुला मीच राजा केले असत । राज्य बुडाले नंतर ।।९०।।
गणेश महादेव अभ्यंकर । यांना युध्दात पॅन्टवर ।।
गोळ्या लागल्या भरपूर । चाळणी झाली पॅन्टची ।।९१।।
परी पायास नुसती जखमही । मुळीच अगदी झाली नाही ।।
ऐसे कैसे घडले पाही ? । अभ्यंकर चकित जाहले ।।९२।।
पुढे महाराज त्यांना म्हणत । अरे गोळ्यांचे वार मी सोसत ।।
कसे वाचलो युध्दात । अभ्यंकराना समजले ।।९३।।
महाराजांची स्वाक्षरी । असावी आपल्या संग्रही घरी ।।
अभ्यंकरांना वाटे अंतरी । महाराजांना म्हणाले ।।९४।।
महाराज या कागदावरी । करावी आपली स्वाक्षरी ।।
महाराज म्हणाले 'मी तरी । सही नाही करणार' ।।९५।।
निश्चयाने म्हणाले अभ्यंकर । 'मी तुमची सही घेणार' ।।
महाराज वदत मी सही न देणार । शर्यत लागली दोघांची ।।९६।।
पुढे महाराज काशीस जात । पुजा-याच्या घरी रहात ।।
तेथून ते पत्र धाडत । अभ्यंकरांना नगरास ।।९७।।
मला पैशाची जरूरी असत । इथे न कोणी मज पैसे देत ।।
आपण पैसे पाठवावेत । पुजा-याच्या नावाने ।।९८।।
महाराजांचे पत्र वाचून । अभ्यंकर गेले आनंदून ।।
महाराजांस पकडतो युक्ती करून । जिंकणार मी शर्यत ।।९९।।
ऐसा त्यांनी विचार करूनी । पैसे पाठविले मनिऑर्डरनी
शंकर महाराजांच्या नावानी । पुजा-याच्या पत्त्यावर ।।१००।।
पोष्टमन गेला पुजा-याच्या घरी । 'शंकरमहाराज कोण ?' विचारी ।।
'हेच आहेत' म्हणे पुजारी । पोष्टमन म्हणे सही करा ।।१०१।।
महाराज फॉर्मवर सही करत । पोष्टमन त्यांना पैसे देत ।।
पावती अभ्यंकरांना मिळत । सही पाहू लागले ।।१०२।।
'शंकर दत्तात्रेय उपासनी' । ऐसी महाराजांची सही असुनी ।।
सही सीलबंद अगदी करुनी । तिजोरीत त्यांनी ठेवली ।।१०३।।
जेव्हा महाराज घरी येत । अभ्यंकर त्यांना सांगत ।।
महाराज मी जिंकली शर्यत । तुमची सही मजपाशी ।।१०४।।
अशक्य, असेल तर दाखव । अभ्यंकरांनी तिजोरीतून ।।
लगेच पावती काढून । पाहताच चपापले ।।१०५।।
पावती सर्व तशीच असून । फक्त स्वाक्षरी झाली अंतर्धान ।।
महाराजांचे धरून चरण । साष्टांग केले वंदन ।।१०६।।
महाराज दशावतारी नृत्य । केव्हा केव्हा असत करत ।।
नृसिंह नृत्य करत असत । नृत्ये सर्व शास्त्रोक्त ।।१०७।।

देखून महाराजांची करणी । वंदन केले त्यांच्या चरणी ।।
तेरावा अध्याय या ठिकाणी । विराम आहे पावला ।।१०८।।
।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 14

महाराज पाहती मज रोखून । वंदन केले मी वाकून
महाराज रोखून पाहून । तसेच बसले पहात ।।१।।
तीक्ष्ण डोळे मजला म्हणती । काय अडचणी तुझ्या पुढती ? ।।
त्यांची तुजला कसली भीती ? । समर्थ मी आहेच ।।२।।
माझ्या लीला विलासांची महती । तुला हवी ना होती ? ।।
कोणत्या अपूर्व घटना घडती । तुला हव्या होत्या ना ? ।।३।।
मम लीला विलासांचा डोंगर । ठेविला मी तुझ्या समोर ।।
त्यातले कळस चमकदार । तेवढेच फक्त लिहावे ।।४।।
भारतीय महायुध्दात । अठरा अक्षौहणी सैन्य असत ।।
सर्वांच्या नुसत्या नावास न पुरत । अठरा अध्याय केवळ ।।५।।
भगवंतानी भगवद्गीता । तरीही सांगितली या जगता ।।
म्हणून सांगितली तुज 'शंकर गीता' । अठरा अध्याय म्हणून ।।६।।
हे हनुमंताचे शेपूट । याचा सापडणार नाही शेवट ।।
म्हणून अठरा अध्यायाचा तट । बांधून आहे ठेवला ।।७।।
महाराजांच्या डोळ्यांचे । बोल ऐकून मोलाचे ।।
चकित होऊन वदलो वाचे । जयजय प्रभो शंकर ।।८।।
अभ्यंरांच्या स्पनात । रोज त्यांच्या मातोश्री येत
ऐसे का रोज घडत ? । काळजी त्यांना लागली ।।९।।
पैठणला महाराजांनी । अभ्यंकरांना घेतले बोलावुनी ।।
महाराज नदीत उभे राहुनी । अभ्यंकरांना म्हणाले ।।१०।।
भाताचे पिंड करुन सत्वर । वहा माझ्या पायावर ।।
पिंड वाहताच चरणांवर । महाराज सांगू लागले ।।११।।
तुझी आई झाली रे मुक्त । तेंव्हापासून अभ्यंकरांच्या स्वप्नात ।।
आईचे येणे बंद होत । महाराजांनी उध्दरले ।।१२।।
दत्तात्रेय गणेश अभ्यंकर । यांच्या वडिलांपासून ।।
घरी महाराज येत असून । हेही भजती महाराजा ।।१३।।
हे नऊ वर्षांचे असल्यापासून । महाराजांच्या सहवासात असून ।।
महाराज यांना घेऊन । फिरले अनेक ठिकाणी ।।१४।।
रात्री - अपरात्री महाराज येत । चहा - खिचडी करण्यात ।।
भलतीच कामे करण्या लावत । करवूनही घेत ते ।।१५।।
एकदा महाराज त्यांच्या घरात । चादर पांघरुन झोपत ।।
जन्मल्या बाळासम लहान होत । अभ्यंकर झाले चकित ।।१६।।
त्यांनी वडिलांना बोलावून म्हटले । अहो महाराज बाळ झाले ।।
वडिलांनी पांघरुण काढले । पूर्ववत दिसले महाराज ।।१७।।
महाराज म्हणाले 'माझे ऐका । मोठ्याचे लहान होता येईल का ?।।
प्रत्यक्ष पाहिले ते खोटे का ? । भांबावून गेले दोघेही ।।१८।।
अभ्यंकर म्हणाले महाराजांना । आपले मूळ रुप मज दाखवा ना ।।
अभ्यंकर म्हणाले महाराजांना । जरुर बेटा दाखवीन ।।१९।।
समाधीनंतर काही वर्षांनी । शुध्द अष्टमीच्या दिनी ।।
रात्रीचे अडीच वाजले असूनी । मोठा चमत्कार जाहला ।।२०।।
एक भव्य तेजस्वी व्यक्ती । प्रगटली अचानक समाधीवरती ।।
पंचवीस फूट उंची होती । पुरुषरुप मनोहर ।।२१।।
महिन्याने पुन्हा अष्टमीशी । तीच उंची त्याच वेळेशी
समाधीवरती चटदिशी । स्त्रीरुप प्रगटले सुंदर ।।२२।।
चूल पेटविली त्या स्त्रीने । कढईत भाजले शेंगदाणे ।।
तसेच तोंडात ओतले हाताने । अगदी गरम असतांना ।।२३।।
ती स्त्री म्हणे, मी आदिशक्ती । दर्शन, प्रसाद खाऊनी ।।
मी जाणार आहे येथूनी । आवाज स्पष्ट कणखर ।।२४।।
समाधीवर पादुकांच्या उजव्या बाजूस । गुप्त झाले पुरुषरुप ।।
पादुकांच्या डाव्या बाजस । शक्ती अंतर्धान हो ।।२५।।
अशीच एक अष्टमी असत । समाधी - मठाच्या मंडपात ।।
एक भव्य रुप प्रगटत । तेज:पुंज विशाल ।।२६।।
मारुतीसमोर मंडपात । मांडी घालून ते बसत ।।
तेथनच ते पाय लांबवीत । समाधीवर ठेवले ।।२७।।
बाबुराव रुद्र आणि अभ्यंकर । पहात होते हा प्रकार ।।

तेवढ्यात ‘बाब्या’ ऐसा पुकार । त्या पुरुषाने केलाच ।।२८।।
बाबुराव आवाज ओळखत । महाराज आपणास बाब्याच म्हणत ।।
त्या पुरुषाने एका हातात । धरले बाबुरावांना ।।२९।।
लांबवून दुस-या हातास । धरले अभ्यंकरास ।।
अभ्यंकरास तो पुरुष । म्हणू लागला जोरात ।।३०।।
माझे मळ रुप तूजला । पहावयाचे आहे ना ? ।।
शब्द मी तुज दिला होता ना । पाहून घेई आता ते ।।३१।।
तो पुरुष तेथून निघाला । पादुकांच्या उजव्या बाजूस गेला ।।
अल्लख ऐसा पुकार केला । अंतर्धान पावला ।।३२।।
पुढे ती शक्ती प्रगटत । पादुकांच्या डाव्या बाजूस जात ।।
‘अल्लख’ ऐसे पुकारत । गुप्त झाली तेथेच ।।३३।।
अभ्यंकरांच्या मनात । अगदी लख्ख प्रकाश पडत ।।
ओळखिले हेच महाराज असत । मूळ रुप दाखविले ।।३४।।
तीन वर्षांनी समाधीनंतर । अष्टमीस मठात समाधीवर
प्रत्यक्ष महाराज निजले वर । पाय त्यांनी लांबविला ।।३५।।
पाय एवढा लांबवीत । वर हंडी टांगलेली असत ।।
तिला पायाने हलवीत । प्रत्यक्ष अभ्यंकर पहात ।।३६।।
अभ्यंकरांची मुलगी आजारी । प्रत्यक्ष महाराज प्रगटले घरी ।।
टोपी, चपला ठेवूनी दुरी । संडासात गेले लघवीस ।।३७।।
टोपी ,चपला अभ्यंकरांनी । ठेविल्या पेटीत लपवुनी ।।
बराच वेळ झाला म्हणुनी । संडास त्यांनी उघडला ।।३८।।
महाराज तर गुप्त झाले । मग पेटीत सामान पाहिले ।।
ते सामानही गुप्त झाले । घटना समाधीनंतरची ।।३९।।
एकदा अभ्यंकरांच्या घरात । मी त्यांच्याशी होतो बोलत ।।
त्यांच्या डोक्यावर मजला दिसत । दोन पाऊले तेजस्वी ।।४०।।
अभ्यंकरांना मी म्हटले । महाराजांची चरणकमले ।।
तुमच्या डोक्यावर भाग्य भले । अभ्यंकर वदले यावर ।।४१।।
मी महाराजांसंगे खेळत । माझ्या डोक्यावर ते पाय ठेवत ।।
नेहमीच ऐसे असे घडत । त्याच्याच परिणाम हा असत ।।४२।।
महाराज एकदा सांगती । शिष्याच्या मस्तकावरती ।।
गुरुंची ती पाऊले असती । गुरुप्रसाद असे हा ।।४३।।
भस्मे आणि अभ्यंकर । या दोघांच्या मस्तकावर ।।
महाराजांची पाऊले सुंदर । मी आहेत पाहिली ।।४४।।
अक्कलोट स्वामी समर्थांचा । घरी फोटो लाव असा ।।
महाराजांनी आदेश दिला । अभ्यंकरांना एकदा ।।४५।।
अभ्यंकर म्हणाले महाराजांस । तुम्ही जेव्हा फोटो द्याल ।।
तेव्हाच मी तो लावणार । अन्यथा लावणार नाहीच ।।४६।।
बेळगावच्या गंधे महाराजांना । हगवण लागली, गुण येईना ।।
गंधे म्हणाले सर्वांना । आता उपाय एकच ।।४७।।
महाराजांच्या समाधीमठात । नेऊन सोडा मज सांप्रत
काय व्हावयाचे ते होवो तेथ । आले समाधीमठात ।।४८।।
जणू अक्कलोटस्वामी महाराज । असे दिसत गंधे महाराज ।।
त्यांची हगवण सुश्रुषा कामकाज । अभ्यंकर होते करीत ।।४९।।
नगरहून एक शेतकरी आला । तो अगदी दिसावयाला ।।
शंकरमहाराजांसारखा भला । शेतकरी सांगू लागला ।।५०।।
माझ्या भावाला मुलगा झाला । त्याने नवस होता केला ।।
मुलगा झाल्यावर समाधीला । दर्शनास येण्याचा ।।५१।।
त्याप्रमाणे बैलगाडीतून । भाऊ मुलाला घेऊन ।।
येत आहे मागाहून । पुढे दर्शना मी आलो ।।५२।।
तो शेतकरी आल्यावर । गंध्यांची हगवण पळाली पार ।।
बरे वाटू लागले फार । प्रकृती त्यांची सुधारली ।।५३।।
शेतकरी अभ्यंकरांस । त्यांचा पूर्ववृत्तांत सांगत ।।
अभ्यंकर अगदी थक्क होत । ठावूक त्याला हे कसे ? ।।५४।।
शेतकरी म्हणाला गंधे यांना । सांगू नका कोणास ।।
मी कोण ? आणखी खास । शेतक-याने सांगितले ।।५५।।
भाऊ येत नाही म्हणून । शेतकरी गेला निघून ।।
गंधे अभ्यंकरांना बोलावून । विचारती, कोण हा शेतकरी ? ।।५६।।
हेच शंकर महाराज असत । ऐकता अभ्यंकर झाले चकित ।।
गंधे अभ्यंकरांच्या घरी येत । डबा नैवेद्याचा घेतला ।।५७।।
दोघे समाधी मठात येत । गंधे नैवेद्य दाखवीत ।।
अभ्यंकरांना एक फोटो देत । अक्कलकोट स्वामींचा ।।५८।।
गंधे म्हणाले अभ्यंकरांना । महाराजांनी सांगितले मजला ।।
अक्कलोट स्वामींचा फोटा तुजला । द्यावा, म्हणून दिला हा ।।५९।।
अभ्यंकर फोटो असता पहात । महाराज असताना जे घडत ।।

संपूर्ण सारे आठवत । धन्यता त्यांना वाटली ।।६०।।
आज अभ्यंकरांच्या स्ववास्तूत । अक्कलकोटस्वामींचा फोटो असत
शंकरमहाराजांचाही शोभत । दिव्य फोटो मोहक ।।६१।।
एकदा महाराज होते बसलेले । दर्शनास लोक जमलेले ।।
एक हरिजन गृहस्थ तेथे आले । प्रसादाच्या आशेने ।।६२।।
दर्शनास तर गर्दी असत । महाराज सर्वांस प्रसाद देत ।।
हरिजन दूर उभा असत । चिंता, प्रसाद मिळेल का ? ।।६३।।
तेथूनच महाराजांनी । आपला हात लांब करुनी ।।
हा घे प्रसाद' असे म्हणुनी । दिला प्रसाद हरिजना ।।६४।।
पुढे काही वर्षांनी । अगदी त्याच ठिकाणी ।।
महाराजांची समाधी होउनी । कैक प्रसंग असेही ।।६५।।
सयाजीराव गायकवाड । यांना बडोद्याच्या गादीवर ।।
महाराजांनी बसवले स्वकर । वैभवशाली थाटात ।।६६।।
बडोद्याच्या राजवाड्यात । महाराजांचा पुतळा असत ।।
अत्यंत प्रेक्षणीय शोभत । भव्य फोटो तसाच ।।६७।।
महाराज नेहमी हिमालयात । मुद्दाम पहा जात असत ।।
अनेकजण तेथे दिसत । समाधी घेऊन बसलेले ।।६८।।
चार - चार हजार वर्षापासून । जिवंत समाधी घेऊन ।।
बसले आहेत कित्येकजण । दाढी जमिनीपर्यंत ।।६९।।
कित्येकांच्या भुवयांचे केस । जमिनीपर्यंत लांबत ।।
अशांची दाढी महाराज हलवीत । पहात समाधी खरी खोटी ।।७०।।
पुण्याच्या लकडी पुलावरती । एक गृहस्थ रोज येऊन बसती ।।
महाराजही तेथे येती । गप्पा मारीत दोघेही ।।७१।।
नियमाने दोघांच्या गप्पा होत । गृहस्थ महाराजांस विचारत ।।
आपले नाव काय असत ? । राहता कोठे आपण ? ।।७२।।
शंकरमहाराज माझे नाव । मी राहतो धनकवडी मठात ।।
महाराज त्याला सांगत । ऐकून त्याने घेतले ।।७३।।
पुढे दोन दिवसात । महाराज आले नाहीत
चौकशी करण्यास गृहस्थ येत । धनकवडी मठात ।।७४।।
शंकर महाराज कोठे असत ? । बाबुराव रुद्र दाखवित ।।
ही महाराजांची समाधी असत । गृहस्थ थक्क जाहला ।।७५।।
लकडी पुलावरती रोज । नियमाने येतात हे महाराज ।।
आले नाहीत काल आज । चौकशीस आलो म्हणून ।।७६।।
रुद्र त्याला सांगत । समाधी घेऊन आठ वर्ष होत ।।
गृहस्थ झाले चकित । रुद्रही थक्क जाहले ।।७७।।
समाधी घेतल्यावर काही वर्षांनी । एका भक्ताच्या लग्नास जाउनी ।।
कोठी सांभाळली महाराजांनी । फोटो काढला त्यात महाराज ।।७८।।
महाराजांचा मुहुर्त । अमावस्या हा असे ख्यात ।।
हाच मुहूर्त ते सांगत । कोणत्याही कामास ।।७९।।
महाराज हजामतीस बसत । हजामत होईपर्यंत ।।
केस येत पूर्ववत । किमया कैशी पहा ही ! ।।८०।।
नगरचे नवले महाराजांना म्हणाले मज विष्णुपद दाखवा ना ।।
महाराज नदीत उभारुन नवलेना । 'विष्णुपद पहा' म्हणाले ।।८१।।
पाण्यात सुवर्णपद दिसले । हात ठेवीत त्यावर नवले ।।
हात सरकवीत बघू लागले । विष्णुपद किती लांब ते ? ।।८२।।
सुवर्ण - विष्णुपद संपेना । आश्चर्य वाटे नवले यांना ।।
मुगुट दिसला वर पाहताना । आकाशाला भिडलेला ।।८३।।
अपूर्व अशा या घटनेनी । दाखवून दिले महाराजांनी ।।
स्पष्टपणे मी कोण असुनी । बोध मानवा असा हा ।।८४।।
पुण्यास समाधी घेतल्या । ब-याच वर्षानंतर ।।
वाशीमचा जानू महार । मुलगा त्याचा हरवला ।।८५।।
चोहीकडे शोध केला । नुसता पत्ताही न लागला ।।
तीन महिन्यांनी मुलगा आला । हाती खाऊ घेऊन ।।८६।।
विचारता 'कोठे होतास ?' । मुलगा सांगे बापास
शंकरमहाराज इथे येऊन । घेऊन गेले मला ते ।।८७।।
महाराजांच्या समवेत । इतके दिवस होतो हिंडत ।।
आज खाऊ देऊन हातात । महाराजांनीच सोडले ।।८८।।
शांताबाई पुणेकर । त्यांचे पती निवर्तल्यावर ।।
विसाव्या दिवशी महाराज तर । त्यांच्या घरी गेलेच ।।८९।।
तुला विसावा देण्यासाठी । आज आलो तुझ्या सदनी ।।
सर्व व्यवस्थित होईल म्हणुनी । महाराज गेले सांगून ।।९०।।
सहा मुले, शांताबाई । सांभाळ केला भावानी ।।
आज मुलांचे सर्व व्यवस्थित असूनी । समाधान शांताबाईस ।।९१।।
नाशिकला काबुलीबाबाकडे । महाराजांचा मुक्काम त्यांच्याकडे ।।

नागपूरचे ताजुद्दीन बाबाही आले । महाराजांच्या दर्शना ।।९२।।
महाराज जेंव्हा झोपत । तेव्हा ताजुद्दीन पहारा करीत ।।
मुसलमानांना हे न खपत । अडथळा करण्यास येत ते ।।९३।।
जेंव्हा मुसलमान तेथे येत । तेव्हा ताजुद्दीनबाबाचा पहारा असत ।।
मुसलमानांना ताजुद्दीन दिसत । साक्षात भगवान हनुमंत ।।९४।।
मुसलमान घाबरुन पळून जात । ज्यांच्यास्तव हनुमंत पहारा करीत ।।
ते कोण असावेत । बोलकी घटना ही असे ।।९५।।
प्राध्यापक रंगनाथ दत्तात्रेय वाडेकर । दर्शनास गेले समाधीवर ।।
महाराजांच्या दर्शनाची हुरहुर । त्यांना होती लागली ।।९६।।
दर्शन घेता समाधीतून । जे अकराशे अकरा' प्रगटला ध्वनी ।।
इंग्रजी भाषेतील ध्वनी ऐकूनी । अर्थबोध होईना ।।९७।।
अर्थबोध झाला समाधीवर । 'जे' म्हणजे ज्ञानेश्वर ।।
'जे' ज्ञानेश्वराचे आद्याक्षर । पुढे एक चारदा असत ।।९८।।
अकराशे अकरा यात । एक अंक चारदा असत ।।
ज्ञानेश्वराचा पहिला अध्याय । ओवी पहिली त्यातील ।।९९।।
त्या ओवीचे पहिले चरण । त्याचेही पहिले अक्षर
म्हणजे ॐ हे असत । चार एकचा अर्थ हा ।।१००।।
ज्ञानेश्वरांच्या समाधीवर । वाडेकरांना ॐचीच साधना मिळत ।।
तीच साधना इतेही प्रगटत । आनंद त्यांना जाहला ।।१०१।।
अक्कलकोट स्वामी समर्थ । माणिकप्रभू शंकरमहाराज ।।
साईबाबा एकत्र फिरत । काही वर्षे, चौघेही ।।१०२।।
एकोणीसशे अठ्ठावीस साली । पाकिस्तान होणार म्हणूनी ।।
सांगितले होते महाराजांनी । त्याप्रमाणे घडलेच ।।१०३।।
महाराज म्हणाले एकदा । कोणता पुढारी मरणार कसा ।।
कुणावर झाडल्या जाणार गोळ्या । विषप्रयोग कुणावर ? ।।१०४।।
खून कोणाचा होणार ? । विमान पडून कोण मरणार ? ।।
नावे, दिनांक सांगत सविस्तर । त्याप्रमाणे घडलेच ।।१०५।।
त्या अनामिक पुढा-याची । नावे या पवित्र ग्रंथात कशासी ? ।।
म्हणून तो उल्लेख टाळला असूनी । महाराज बोल अचूक ।।१०६।।
इसवीसन दोन हजार साली । माझा पठ्ठ्या शिवाजी ।।
दिल्लीच्या तक्तावर येणार असुनी । महाराजांचे बोल हे ।।१०७।।
पाहून महाराजांची चरणकमले । भक्तीने मी वंदन केले ।।
चौदाव्या अध्यायाचे संपले । लिखाण या ठिकाणी ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 15

देखून महाराजांचे चरण । भारावून गेलो मी त्यांना शरण
पाठीवर माझ्या थाप मारुन । महाराज पाहू लागले ।।१।।
थाप बसता पाठीवरती । महाराज कृपेची ही पावती ।।
चट्दिशी कळली मजप्रती । आनंद मला वाटला ।।२।।
भाग चरित्राचा जो लिहिला । महाराजचरणी रुजू झाला ।।
महाराजांना फार आवडला । साक्ष याची मिळाली ।।३।।
ज्यांच्या पहा पाठीवर । महाराज थाप मारणार ।।
त्यांचे कल्याण होणार । नित्य अनुभवाची गोष्ट ही ।।४।।
पेंटर कडलासकरांची प्रमिला । बारामतीस मावशीकडे गेली ।।
तेथे भुताने झपाटली । भूत नाचू लागले ।।५।।
कधी ती आरडेओरडे । डोळे फिरवी इकडेतिकडे ।।
नंतर ती बेशुध्द पडे । घाबरुन गेली मावशी ।।६।।
देवर्षी अनेक उपाय केले । सारे अगदी व्यर्थ गेले ।।
सोलापुरी तीज आणून सोडले । सांगितले जे घडले ते ।।७।।
पेंटर, भस्मेंना म्हणाले । 'माझ्या मुलीस भूत लागले' ।।
'दाखव देवर्षीस' भस्मे वदले । पेंटर मनी हादरले ।।८।।
आपणच महाराज असताना । इतरत्र हिंडण्याच्या का यातना ?
कशास कोणापुढे याचना । महाराज समर्थ असताना ।।९।।
ऐसा त्यांनी विचार केला । दुस-या दिवशी एका लग्नाला ।।
जावयाचे होते परगावला । पत्नी - कन्येस आधी पाठविले ।।१०।।
लग्नास जाऊ लग्नादिवशी । ऐसा विचार करुन मनाशी ।।
महाराजांच्या फोटोपाशी । बसले दीप लावून ।।११।।
गहिवरुन आले पेंटरना । कळवळून म्हणाले महाराजांना ।।
आपण समर्थ असताना । भूत काढणे अशक्य का ? ।।१२।।
तुम्हीच माझ्या मुलीला तारा । अथवा तुम्हीच तिला मारा ।।

तुमच्या मनास येईल तसे करा । नाव राखा वा बुडवा ।।१३।।
ढसढसून पेंटर रडले । महाराजांचे स्तोत्र म्हटले ।।
'गुरुलीलामृत' पारायण केले । नंतर गेले लग्नास ।।१४।।
इकडे व-हाडाच्या गोंधळात । प्रमिला मोठमोठ्याने ओरडत ।।
शंक-या मी जाते, मला सोड । मारु नकोस मजला रे ।।१५।।
पळत वेशीबाहेर गेली । शंक-या आता चालले रे मी ।।
ओरडत बेशुध्द पडली । बाधामुक्त जाहली ।।१६।।
गोंधळात झाला गोंधळ । हादरुन गेले व-हाड सकळ ।।
तेवढ्यात पेंटर झाले दाखल । आनंद काय वर्णावा ? ।।१७।।
हाक ऐकिली महाराजांनी । वृत्त ऐकले सर्वांनी ।।
कडलासकर गेले भारावूनी । म्हणाले 'जय शंकर' ।।१८।।
एका बाईचे पाय आखडले । चालणे तिचे बंद झाले ।।
तिने साईबाबांस सांगितले । साईबाबा म्हणाले ।।१९।।
जा शंकरमहाराजांच्या दर्शनाला । दर्शनास येताच त्या बाईला ।।
व्याधिमुक्त झाल्याचा अनुभव आला । बाई अत्यंत हर्षली ।।२०।।
उपासनी महाराज साकोरीत । योगिराज, विदेही, सुविख्यात ।।
बुवाबाजी खटला कोर्टात । त्यांच्यावरती चालला ।।२१।।
काही समाजकंटकांनी । उपासनीमहाराजांस ठरविले भोंदू मुनी
गुंतविले त्यांना बूवा प्रकरणी । आनंदले कंटक ।।२२।।
नगरचे श्रोत्रीय वकील विख्यात । त्यांना महाराज सांगत ।।
तुम्ही ही केस घेऊन हातात । उपासनींना सोडवा ।।२३।।
श्रोत्रीय म्हणाले महाराजासं । मी दिवाणी असे वकील ।।
क्रिमिनल केस ही असत । कशी चालविता येईल ? ।।२४।।
महाराज म्हणाले श्रोत्रीयांस । तूच चालवली पाहिजे ही केस ।।
वंदून श्रोत्रियानी महाराजांस । केस तुफान रंगवली ।।२५।।
इतकी केस रंगवली । जज्जांची मती गुंग झाली ।।
प्रेक्षक मंडळी थक्क झाली । निर्दोष सुटले उपासनी ।।२६।।
पाहून श्रोत्री यांची बुध्दिमत्ता । अन् अर्ग्युमेंटची कुशलता ।।
दिपून गेले सर्व अवलोकिता । ब्रिटिश सरकार अपार ।।२७।।
समारंभपूर्वक ब्रिटिश सरकारनी । श्रोत्रीयां चा सत्कार करूनी ।।
पदवी बार. ॲट. लॉ देऊनी । गौरविले श्रोत्रीया ।।२८।।
श्रोत्रीयांनी जाणले । अशक्य ते शक्य केले ।।
कोर्टात माझे जे भाषण झाले । जाणीव मज मुळी ना ।।२९।।
कोर्टात महाराजच बोलत । अशक्य ते शक्य करीत ।।
श्रोत्रीय महाराजांचे – चरणे धरत । प्रसन्न झाले महाराज ।।३०।।
श्रोत्रीयांस महाराज विचारत । 'काय तुज माग हवे असत ?' ।।
'दत्त पादुका मज मिळाव्यात' । श्रोत्रीय वदले लगेच ।।३१।।
गाणकापुरच्या भस्मात । महाराज हात घालत ।।
त्यातून पाषाणपादुका काढत । श्रोत्रीयांना दिल्याच ।।३२।।
अजूनही श्रोत्रीयांच्या घरात । दत्तपादुका उत्सव होत ।।
महाराज प्रभाव असा असत । अतर्क्य अपूर्व अगाध ।।३३।।
शेख अब्दुलरझाक बियाबानी । पोलिस खात्यात पोलीस असूनी ।।
धर्माचे ते असती ज्ञानी । पुणे शहरी वास्तव्य ।।३४।।
साध्या वेषात बियाबानी । दर्शनास गेले एके दिनी
तू पोलीस आहे म्हणूनी । महाराजांनी ओळखले ।।३५।।
थक्क झाले बियाबानी । त्यांचा गुरू कोण ? हेही सांगूनी ।।
गुरूनी दिलेला मंत्र महाराजांनी । त्यांना म्हणून दाखवला ।।३६।।
चकीत बियाबानी झाले । त्यांनी महाराजांना ओळखले ।।
महाराज प्रत्यक्ष अल्ला भले । उद्गार त्यांचे असतीच ।।३७।।
महाराजांच्या भव्यत्वाची । माहिती अत्यंत महत्वाची ।।
बियाबानी उत्स्फूर्तपणेची । आनंदाने सांगत ।।३८।।
मालपाठकांना दर्शन होत । राम कोराड यांच्या रूपात ।।
क्षणात राम कोराड दिसत । क्षणात प्रत्यक्ष महाराज ।।३९।।
नाना सोनटक्के यांच्या घरात । महाराज एकदा बसले असत ।।
एक दाढीवाला संन्यासी येत । महाराजांसमोर उभा तो ।।४०।।
सोनटक्क्यांना तो विचारत । महाराज कुठे आहेत ? ।।
सोनटक्के तर चकीत होत । पाहून कसा विचारतो ? ।।४१।।
संन्यासी तो निघून जात । महाराज सोनटक्क्यांना म्हणत ।।
आत्ताच दर्शन द्यावयाचे नसत । संन्याश्याला पहा या ।।४२।।
सोनटक्क्यांना महाराज दिसत । न दिसत संन्याशा, जरी ते असत ।।
एकाच वेळी या घटना घडत । एकमेकांविरूध्द ।।४३।।
महाराज गेले काशीत । ब्राह्मण महाराजांस अवलोकित ।।
ब्राह्मणांच्या मनात खळबळ उडत । असले कसले महाराज ?।।४४।।
वैदिक पट्टीचे ब्राह्मण महाराजांकडे गेले मिळून ।।

महाराजांस सांगती ठासून । काहीच करत तुम्ही ना ।।४५।।
नाही वैदिक आचार । नाही वैदिक विचार ।।
वेदाचे महत्व अपार । तुम्हा ठाऊक मुळी ना ।।४६।।
महाराज शांत ऐकून घेत । तिथेच एक मुलगी खेळत ।।
सागरगोटे होती झेलत । तिला महाराज पुकारित ।।४७।।
त्या मुलीस म्हणाले महाराज । हे भटुकडे जमले इथे आज ।।
वेदांचे ज्ञान त्यांना पाज । सांग वेद समजावून ।।४८।।
मुलगी अशी बोलत होती । जणू प्रगटला बृहस्पती ।।
जिभेवर नाचे सरस्वती । व्यासच जणू बोलत ।।४९।।
व्याख्यान तिचे ऐकून । वैदिक सगळे गेले थिजून ।।
महाराजांचे चरण धरून । शरण गेले तात्काळ ।।५०।।
अकलूज शुगर फॅक्टरीत । दरवर्षी बॉयलर बिघडत ।।
जर्मन कंपनीचा मनुष्य येत । नीट करून जातसे ।।५१।।
पाच – सहा दिवसात । काम तो पूर्ण करत ।।
रोजचा त्याचा पगार असत । एक हजार रूपयेच ।।५२।।
इतर खर्च सर्व वेगळे । दरवर्षी असेच चाललेले ।।
महाराजांनी हे पाहिले । निष्कारण हा खर्च का ? ।।५३।।
महाराज म्हणाले या वर्षी तर । नीट करून देतो हा बॉयलर ।।
घण आणून द्या मज सत्वर । महाराज नीट करत ।।५४।।
तीन दिवस रात्री बारा नंतर । घणाचे घाव घालून बॉयलर ।।
दुरूस्त केला तेव्हापासून तर । बॉयलर नाही बिघडला ।।५५।।
वाघोडला जेव्हा महाराज जात । तेव्हा तेथे सुगंध सुटत ।।
वाघोडास जेव्हा सुगंध येत । महाराज तेव्हा जात तिथे ।।५६।।
महाराज येणे, सुगंध सुटणे । यांचा अन्योन्य संबंध असणे ।।
लोक ओळखीत पुरतेपणे । महाराज येणे जाणत ।।५७।।
धनराज गिरजीस पैशाचे कोडे । म्हणून आले महाराजांकडे ।।
महाराज पैशाशिवाय घोडे नडे । पैसा द्याहो मजलागी ।।५८।।
महाराज धनराजास सांगती । पैशानेच समस्या वाढती ।।
नाना प्रश्न पैशानेच उद्भवती । पैसा कारण दु:खाचे ।।५९।।
पैशाने सुख शांती समाधान । यांच होत असे हवन ।।
पैशचा नाद दे सोडून । धनराज काही ऐकेना ।।६०।।
महाराजांनी धनराजास । अगदी पुष्कळ दिला त्रास
त्रास सोसूनही पैशाची आस । त्याची कमी न जाहली ।।६१।।
महाराज गेले त्याच्या घरी । बेफाम पडले आजारी ।।
बेडके पडती जमिनीवरती । साठवून ठेवण्या सांगितले ।।६२।।
धनराजांनी मोठे घमेले । महाराजांच्या बेडक्यास ठेवले ।।
घमेले बेडक्यांनी भरले । महाराज बेडके ओकत ।।६३।।
महाराज म्हणाले धनराजास । थुंकी बेडके पिऊन टाक ।।
धनराजांनी न करता विचार । पिऊन सर्व टाकले ।।६४।।
धनराजास म्हणाले महाराज । आता होशील तू ‘धनराज’ ।।
आणि खरोखरच ते बनले धनराज । अपार धन ते मिळाले ।।६५।।
काशीक्षेत्रातील एक सावकार । महाराजांचा भक्त फार ।।
महाराजांच्या कृपेने सुंदर । कन्यारत्न त्याला जाहले ।।६६।
कन्यारत्न सात वर्षाचे झाले । महाराज सावकाराला म्हणाले ।।
मुलगी मज देऊन टाक म्हणजे झाले । विवाह लाव माझ्याशी ।।६७।।
सावकारही कबूल झाला । महाराज म्हणाले सावकाराला ।।
सांग तशी दौंडी देण्याला । दौंडी पिटविली काशीत ।।६८।।
काशीविश्वेश्वराच्या मंदिरात । हा विवाह असे होत ।।
प्रचंड जनसमुदाय जमत । जो तो कुजबुजू लागला ।।६९।।
मुलगी सात वर्षाची छान । नवरा तर म्हातारा असून ।।
कसे आले हे जमून । हसती सारे म्हणून ।।७०।।
लग्नघटिका भरली । महाराजांनी तिज वंदन केले ।।
आणि तिला आई म्हटले । सावकारास सांगू लागले ।।७१।।
या मुलीचे वैधव्य टळत । ही पडेल राजघराण्यात ।।
धार संस्थानची तिज मागणी येत । राणी झाली संस्थानची ।।७२।।
मुलीचे वैधव्य जाणून । स्वत: लग्नास उभे राहून ।।
तिच्याशी लग्नही न करून । वैधव्य मुलीचे टाळले ।।७३।।
वैधव्य तिचे टाळून । राजाची राणी तिज बनवून ।।
सर्वस्वी केले तिचे कल्याण । लक्षात कुणाच्या येणार ? ।।७४।।
माळीनगरच्या शुगर फॅक्ट्रीत । एकदा महाराज मुद्दाम जात ।।
फॅक्टरीचा बॉयलर पाडत । लोक पहात राहिले ।।७५।।
गहिनीनाथांच्या महाराजांनी । स्वयंभू पादुका तेथून काढुनी ।।
विधियुक्त त्यांची स्थापना करूनी । फॅक्टरी सुरळीत चालली ।।७६।।
नगरला जनार्दनबूवांचे कीर्तन । महाराज, श्रोत्यांची दाटी होऊन ।।

गोरा कुंभार चालले आख्यान । भलतेच अगदी रंगले ।।७७।।
नामदेवाच्या कीर्तनात । पांडुरंग स्वत: नाचत ।।
जनार्दनबुवांच्या कीर्तनात । महाराज नाचू लागले ।।७८।।
वीणा बुवांच्या हातातून । महाराजांनी हाती घेऊन ।।
गोरा कुंभार आख्यान । महाराज सांगू लागले ।।७९।।
महाराजांचे कीर्तन इतके रंगले । श्रोते गोरा कुंभार बनले ।।
दुस-या दिवशी महाराजांस पूजिले । बसली प्रसाद पंगत ।।८०।।
महाराजासं लागून ब्राह्मण । पलीकडे इतर बसले असून ।।
माझा बाब्या कोठे म्हणून ? । मधेच महाराज ओरडले ।।८१।।
बाबुराव रुद्रांना बसवीत । पलीकडच्या पंक्तीत ।।
महाराज रुद्रांना बोलावित । आपल्या पानावर बसविले ।।८२।।
दुस-या पानावर महाराज बसत । सुरू जाहली पंगत ।।
महाराज सारे ओळखत । पंक्तिप्रपंच ताठा हा ।।८३।।
महाराज विचार करती, याचा । उरतवू पंक्तिप्रपंच नक्षा ।।
म्हणाले माझ्या घासात हा । केस आला कोठून ? ।।८४।।
सर्वांच्याच पहा हातात । केस दिसला घासात ।।
पुढे महाराजा रागावून म्हणत । खडा घासात मज लागे ।।८५।।
सर्वाच्या तेव्हा घासात । खडा सर्वांना लागत ।।
लोक झाले सारे चकित । अघटित हे पाहून ।।८६।।
महाराज म्हणाले सर्वांना । सारेच भक्त प्रिय मला
गरीब, श्रीमंत, जात, बुरा, भला । भेद मजपाशी नसेच ।।८७।।
माझ्या भक्ताचा अपमान । तो माझाच महान अपमान ।।
कधी न करणार तो मी सहन । कळले ज्याचे त्यांनाच ।।८८।।
पंक्तिप्रपंच करणारे सगळे । महाराजासं शरण आले ।।
म्हणाले महाराज आमचे चुकले । क्षमा करावी प्रभुवरा ।।८९।।
शुभराय महाराज मठात । एक बेकार हॉल असत ।।
भस्मे, बुवा, रूद्र बसत । दादा फुलारी वगैरे ।।९०।।
या सर्वांनी ठरविले असत । अध्यक्षपद महाराजांस देत ।।
बेकार हॉलचे अध्यक्ष असत । त्रिनेत्रीधारी महाराज ।।९१।।
लोडास महाराज बसत । भोवती सारे बसत असत ।।
तेवढ्यात महाराज म्हणत । पान - सुपारी काढ बुवा ।।९२।।
बुवांचे खिसे रिकामेच असत । बुवा लगेच उभे रहात ।।
कोटाच्या खिशात हात घालत । खिसे सर्वही भरलेले ।।९३।।
बुवा अगदी चकित होत । खिसे तर सारे रिकामेच असत ।।
लगेच पानसुपारीने कसे भरत ? । नवल सर्वां वाटतसे ।।९४।।
पान - सुपारी - चुना - कात । तंबाखू सारे भरपूर निघत ।।
बुवा सर्व हे मधे ठेवत । बार भरती सर्वही ।।९५।।
सर्व पदार्थ हे कुटून । भस्मे महाराजासं देऊन ।।
भस्मे काहीच घेत न । देत सर्व महाराजा ।।९६।।
फिरावयाला जावयाचे असत । महाराज भस्मेंना बोलावीत ।।
त्यांच्या खांद्यावर महाराज बसत । जात फिरण्या नेहमी ।।९७।।
भगवान रामचंद्रास हनुमान । आपल्या खांद्यावर बसवून ।।
आकाशात करी उड्डाण । तोच प्रसंग इथेही ।।९८।।
असेच प्रसंग काही जुने । लेखणीस लिहावे वाटणे ।।
परी लेखणीवर काही बंधने । म्हणून एवढे पुरेच ।।९९।।
भस्मे यांच्या खांद्यावर बसत । महाराज वजन हलके करत
जशी पुष्पमाळ गळ्यात । भक्तास कष्ट देत ना ।।१००।।
रुद्र समाधीमठात रहात । एकदा थंडीचे दिवस असत
समाधीवर ठेवून हात । कुडकुडत होते थंडीने ।।१०१।।
मध्यरात्रीस समाधीतून । महाराज प्रत्यक्ष प्रगटून
रुद्रांना कडकडून भेटून । महाराज त्यांना म्हणाले ।।१०२।।
बाब्या चल फिरावायला । सर्व देश दाखवतो तुजला
बाबुराव म्हणाले महाराजांना । 'रात्र फार जाहली ' ।।१०३।।
मी असता तुज कसली भीती ? । चरण धर माझे घट्ट अती
बाबुराव घट्ट चरणे धरती । हवेतून निघाले महाराज ।।१०४।।
जो जो महाराज उंच जाऊ लागले । तो तो बाबुराव म्हणत राहिले
माझ्या पोटात ढवळू लागले । सोडा मजला भूवर ।।१०५।।
संपूर्ण पृथ्वीची प्रदक्षिणा । फिरवून आणले रुद्रांना
समाधीवर सोडून त्याच क्षणा । महाराज अंतर्धान पावले ।।१०६।।
प्रत्यक्ष महाराज प्रगटले । पृथ्वीप्रदक्षिणे घडवले
पुन्हा समाधीवर सोडले । धन्यता रुद्रांची केवढी ? ।।१०७
देखून महाराजांचे तीक्ष्ण नयन । भारावून करून नमन ।।
पंधराव्या अध्यायाचे लेखन । या ठिकाणी संपले ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज

श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 16

देखून महाराज प्रत्यक्ष । ज्वलंत महतीची पटे साक्ष
मोक्षार्थियास मिळावा मोक्ष । वंदिता झाला आनंद ।।१।।
अनंताचार्य उंब्रजकर । वैदिक, भिक्षुक सोलापूर ।।
मनात करती विचार । श्रीमंतांचे महाराज ।।२।।
महाराज श्रीमंतांनाच विचारती । माझ्यासम गरिबाकडे न बघती ।।
सोवळ्यात अभिषेकाहून ते परतती । रस्त्यात भेटले महाराज ।।३।।
महाराज म्हणाले ‘चल रे आता’ । महाराज मी सोवळ्यात आता ।।
असुदे, त्यांच्या धरून हाता । स्टेशनवरती आणले ।।४।।
महाराजांनी मुंबईस । नेले अनंताचार्यास ।।
केशवजी आशर घरास । महाराज म्हणाले आशरना ।।५।।
यांना कपडे करावेत । दोन तिकिटे रिझर्व्ह केलीत ।।
आशर महाराजांना सांगत । कालच तिकिटे काढली ।।६।।
अनंताचार्य चकीत होत । सोवळ्यात महाराज मज आणत ।।
आशर मजला कपडे करीत । दोन तिकिटेही काढत ।।७।।
महाराज अनंताचार्यास घेऊन । निघाले विमान - बोटीतून ।।
मस्कत, बगदाद, फ्रान्स, इराण । रोम, इटली, इंग्लड ।।८।।
वगैरे सर्व देशातून । आणले तीन महिने हिंडवून ।।
पुन्हा सोलापूरात सोडून । महाराज त्यांना म्हणाले ।।९।।
मी श्रीमंतांनाच विचारतो । गरिबाकडे न बघतो ।।
अनंताचार्यास पश्चात्ताप होतो । महाराजांचे चरण धरी ।।१०।।
एकदा नगरला महाराज असत । संध्याकाळची जेवणे होत ।।
भक्तासमवेत गप्पा रंगत । महाराज सतत सांगत ।।११।।
गप्पात रात्र संपली । पहाटेची वेळ झाली ।।
नानासाहेब मिरीकर त्यावेळी । महाराजांना म्हणाले ।।१२।।
तुम्ही कुणास हसविले । तुम्ही कुणास रडविले ।।
तुम्ही जर आहात असले । कसे असतील गुरू तुमचे ? ।।१३।।
ताडकन महाराज उभे गुडघ्यावर । मागे नेला डावा कर ।।
उजवा हात केला ताठ वर । दृष्टी आकाशाकडे ।।१४।।
‘माझे गुरू आहेत असले’ । जोरात महाराज उद्गारले ।।
त्याच स्थितीत तसेच राहिले । दीड तास निश्चल ।।१५।।
महाराजांच्या डोळ्यातून । अश्रूंची धार सतत लागून ।।
कपडे त्यांचे गेले भिजून । भक्त सारे घाबरले ।।१६।।
उगाच प्रश्न विचारला । महाराजांस आपण त्रास दिला ।।
म्हणती ‘क्षमा करावी आम्हाला’ । तेव्हा महाराज म्हणाले ।।१७।।
तुमचे काहीही न चुकले । तुमच्यामुळेच मज गुरू आठवले ।।
तुमच्यामुळे गुरूंचे दर्शन झाले । धन्य तुम्ही आहात ।।१८।।
गुरूंचे घेता नुसते नाव । कसा प्रगटावा मनी भाव ।।
केवढी असावी मनाची धाव । प्रत्यक्ष गुरूच दाखवित ।।१९।।
एकोणीसशे एकोणसाठ शनिवारी । जुलै दिनांक चार शिवरात्री ।।
मिरजेचे पंडित यांच्या घरी । रात्री अकरा वाजता ।।२०।।
महाराज प्रत्यक्ष प्रगटून । गादीवरती निजले असून ।।
दोन्ही लोडावर दोन हात ठेवून । पाय तिरपे लांबविले ।।२१।।
तसाच महाराजांचा फोटो काढला । आजही तो मिळतो पहावयाला
समाधीनंतर बारा वर्षांनी भला । प्रसंग आहे घडला हा ।।२२।।
एकोणीसशे बासष्ट साली । महिनाभर अभ्यंकराच्या स्वप्नामधी ।।
महाराज येऊन सांगती । फोटो सर्व जमव मम ।।२३।।
स्टुडिओ सर्वही धुंडाळले । फोटो काहीही न मिळाले ।।
तोच स्वामीसमर्थ स्टुडिओ दिसले । सर्व वृत्तांत निवेदिला ।।२४।।
फोटोग्राफर म्हणाले । फोटो मजपाशी आहेत सगळे ।।
परी महाराजांनी मज सांगितले । फोटो न द्यावे कुणाला ।।२५।।
तुम्ही याल उद्या जर । काय घडले ते पाहू तर ।।
गेले दुस-या दिवशी अभ्यंकर । फोटो मिळाले सर्वही ।।२६।।
अभ्यंकर किंमत विचारत । फोटोग्राफर त्यांना सांगत ।।
महाराज, महाराजांचे फोटो नेत । किंमत कसली यात हो ।।२७।।
पुढे पानशेतच्या धरणात । स्टुडिओ हा वाहून जात ।।
सर्व फोटो ठेविले सुरक्षित । महाराजांनी यापरी ।।२८।।
समाधीनंतर सोळा वर्षांनी । ही घटना आली घडूनी ।।
महाराजांची ऐशी करणी । कल्पनातील असे ही ।।२९।।
लहान मुलांच्या घोळक्यात । महाराज नेहमी रममाण होत ।।

त्यांना प्रेमाने कुरवाळीत, बोलत । आनंदाने खेळत ।।३०।।
लोक महाराजांना विचारीत । तुम्ही कसे खेळता मुलांत ?।।
महाराज त्यांना सांगत । पवित्र, निष्पाप मुले ही ।।३१।।
शुध्द अंत:करण यांचे फार । निरिच्छ यांचे विचार ।।
मागत नाहीत काहीच तर । माझ्यापाशी मुले ही ।।३२।।
तुम्ही सारे स्वार्थापोटी । नेहमी काही मागण्यासाठी ।।
सतत लागता माझ्या पाठी । अप्पलपोटी तुम्ही सारे ।।३३।।
महाराजांच्या या उद्गारात छान । झणझणीत भरले अंजन ।।
कसे असावे अंत:करण । ज्याचे त्याने जाणावे ।।३४।।
महाराज कुठेही बसत । कपड्यावर तंबाखू लाळ गळत ।।
स्वच्छतेचा गंध नसत । कपडे घाणेरडेच ।।३५।।
त्यांचे धोतर असता धूत । गुलाबपुष्पांचा सुगंध येत ।।
जिकडे तिकडे सुगंध सुटत । सौगंधही अपूर्व ।।३६।।
महाराजासं खिचडी आवडत । महाराज स्वत: खिचडी करीत ।।
संपूर्ण कांदे लसून टाकत । ओंजळीत बसतील तेवढे ।।३७।।
खडे मीठ, मिरच्या ओंजळीत घेत । तशाच खिचडीत टाकीत ।।
दिसेल ते तसेच खिचडीत । टाकून होत मोकळे ।।३८।।
सोलणे – निवडणे मुळीच नाही । शिजू लागे पहा खिचडी ।।
खिचडीत हात घालुनी । खिचडी हलवीत जोराने ।।३९।।
झारा – डाव – चमचा – उलथणे । यांची जरुरी कधीच नसणे ।।
पदार्था मोजमापे प्रमाणे । कधीच वापरली नाहीत ।।४०।।
अशी खिचडी मस्त बने । जणू कैलासचीच पक्वान्ने ।।
महाराजांच्या हातचे मिळणे । भाग्य महाराज जाणोत ।।४१।।
दोन्ही चरणे महाराजांची । एकसारखी मुळीच नव्हती ।।
उजवा पाय लहान असूनी । डावा मोठा लांबच ।।४२।।
उजवा पाय महाराजांचा । डावा अक्कलकोट स्वामी समर्थांचा ।।
चमत्कार हा चरणांचा । स्वाध्याय हवा यावर ।।४३।।
महाराज जेव्हा कुठे बसत । उजवा पाय पुढे असत ।।
डावा पाय मागे असत । सहज बैठक त्यांची ही ।।४४।।
गुरूचरणांचा स्पर्श शिष्यांना । व्हावा, कळतसे ही योजना ।।
दीनोध्दारक कैलासराणा । किती कृपाळू मायाळू ।।४५।।
पुरूषोत्तमबुवा सांगत । महाराज शुभराय मठात येत ।।
माझे कपडे वापरत । मजवर प्रेम अपार ।।४६।।
महाराजांचे सर्वांवर । प्रेम अमाप अपार ।।
महाराजांच्या वास्तव्यात तर । आनंदाचा कल्लोळ ।।४७।।
महाराज मारूतीसमोर बसती । म्हणती मी आहे मारूती
याची सर्वा आली प्रचीती । समाधीच्या वेळेस ।।४८।।
गोविंद जानू गिरमे असत । महाराजांचे एकनिष्ठ भक्त ।।
ते सर्वांस आवर्जून सांगत । महाराज अग्नी केवळ ।।४९।।
रावबहादूर नवले असत । मराठा समाजाचे पुढारी विख्यात ।।
कोल्हापूरी त्यांचा सत्कार होत । भाषणात ते म्हणाले ।।५०।।
केवळ महाराजांच्यामुळे । माझे संपूर्ण परिवर्तन झाले ।।
पुण्यतिथीस भक्त जे जेवले । उच्छिष्ट यांचे सेवित ।।५१।।
तात्या सहस्त्रबुध्दे अन गणेशन । एकमेकांचे पार्टनर असून ।।
रहात दोन खोल्यांतून । दृष्टान्त झाला गणेशनना ।।५२।।
अक्कलकोट स्वामींचा अवतार । सध्या मुंबईत असून तर ।।
दर्शनही त्यांचे मनोहर । गणेशनना जाहले ।।५३।।
दृष्टांत तात्यांना सांगून । निघाला तात्यांना घेऊन ।।
स्वामींचा अवतार पहावा म्हणून । स्वामींचे मठ शोधिले ।।५४।।
एक चित्र, गिरगाव मठात । चित्रकार होता पूर्ण करत ।।
दृष्टांतातील हेच अवतार असत । गणेशन पाहता म्हणाले ।।५५।।
मोटारीतून महाराज येत । चित्र घेऊन महाराज जात ।।
त्याचा पाठलाग करत । माडीत गेले महाराज ।।५६।।
महाराजांनी आपली खोली । कडी लावून बंद केली ।।
हाक मारूनही खोली न उघडली । गणेशन निघून गेलाच ।।५७।।
दार उघडून महाराज म्हणत । तात्या, तुझीच वाट मी पहात ।।
महाराजकृपे तात्यांच्या हातात । पार्थिव पूजा प्रगटली ।।५८।।
तात्यांवर महाराजांनी । अमाप कृपा ती करूनी ।।
सर्वस्व त्यांना अर्पूनी । आपल्यासारखे बनविले ।।५९।।
अगदी महाराजांसारखे । दिसत तात्या सहस्त्रबुध्दे ।।
एकमेकांची सगळी कामे । एकमेक करीत ।।६०।।
तात्यांच्या नोकरीवर महाराज जात । महाराजांची कामे तात्या करत ।।
बरेच दिवस असेच जात । कळले कुणा काही ना ।।६१।।
एकदा तात्यांची बायको खवळत । तेव्हा महाराज तात्यांस म्हणत ।।

आता तुझे काम तू जा करीत । माझे काम मी करतो ।।६२।।
महाराज शुभराय मठात । अष्टमीस देवीच्या नवरात्रात ।।
भारी जरीचे पातळ नेसत । सर्व अलंकार घातले ।।६३।।
मळवट कुंकवाचा भरून । मधुबूवास पालथे निजवून
त्यांच्या पाठीवर उभे राहून । महाराज नाचू लागले ।।६४।।
दशावतारी संगीत नृत्य । महाराजांचे सुरू होत ।।
मधुबूवा भावावस्थेत जात । वादक गेले थकून ।।६५।।
महिषासुरमर्दिनीचे नृत्य । इतके रंगून गेले असत ।।
वादकांची बोटे रक्ताळत । अपूर्व भयानक नृत्य हे ।।६६।।
महिषासुरमर्दिनी नृत्याचे । फोटो फिल्म घेतले असते ।।
आज उपयुक्त ठरले असते । घडले असते दर्शन ।।६७।।
सुवासिनींची – कुमारिकांची । महाराज पूजा करीत असती ।।
अशी पूजा करावी म्हणूनी । महाराज भक्तां सांगत ।।६८।।
बेहरे पुण्याचे ज्योतिषी असत । समाधी – मठावरून असता जात ।।
मठासमोर मोटार बंद पडत । म्हणून गेले मठात ।।६९।।
सिगारेट कोणी ओढत नसत । तरीही सिगारेटचा त्यांना वास येत ।।
बेहरे यांना आश्चर्य वाटत । समाधी समोर गेले ते ।।७०।।
समोर महाराजांचा पुतळा असत । एक भक्त सिगारेट घेऊन येत ।।
महाराजांच्या मुखास लावत । महाराज सिगारेट ओढत ।।७१।।
सिगारेट पेटे, धूर निघे । बेहरे टकमका पाहू लागे ।।
दुस-या दिनी त्यांच्या घरामध्ये । प्रत्यक्ष महाराज प्रगटले ।।७२।।
रामजोशींच्या तमाशात । चिमाबाई नृत्यांगना असत ।।
ती महाराजांच्या दर्शना येत । गुलबी कुत्रीस घेऊन ।।७३।।
महाराज चिमाबाईस सांगत । गुलबी महान व्यक्ती असत
चिमाबाईस हे न पटत । महाराज म्हणाले पहाच ।।७४।।
महाराज गुलबीस बोलवित । गुलबी महाराजांसमोर येत ।।
त्यांना तीन प्रदक्षिणा घालत । मुक्त महाराजपदी हो ।।७५।।
चिमा म्हणाली महाराजांना । तुम्ही गुलबीचा उध्दार केला ।।
माझाही उध्दार करावा । अनुग्रह दिलाच ।।७६।।
चिमाबाईस महाराजस म्हणाले । शुभराय मठ मारुती मंदिरामागे ।।
एक तट बांधून देणे । मान्य केले चिमाने ।।७७।।
तटाचे खोदकाम सुरू होत । त्यातून तीन मूर्ती निघत ।।
नागनाथ – नरसिह – हनुमंत । चकीत झाले सर्वही ।।७८।।
स्थापना हनुमानजयंती दिवशी । केली तिन्हींची महाराजांनी ।।
हाच तटाचा मारुती असूनी । तीन मुर्ती मठात ।।७९।।
महाराज एकदा दारू पीत । रामचंद्र धनेश्वर नावे ठेवत ।।
नागेश धनेश्वर समोर असत । दारू चढली नागेशा ।।८०।।
नागेश भडाभड ओकले । महाराज रामचंद्रांना म्हणाले ।।
तुझ्या मुलाने मद्य प्याले । दोष मज का देतोस ? ।।८१।।
महाराजांनी काडी लावली । ओकारी सर्व जळून गेली ।।
अघटित करणी पाहून सगळी । दोघेही थक्क जाहले ।।८२।।
वकील होते रामचंद्र नागेश होते डॉक्टर ।।
हेच डॉक्टर धनेश्वर । महाराजांचे लाडके ।।८३।।
डॉक्टरांची अकरा मुले । मूरणार, महाराजांनी जाणले ।।
महाराजांनी काय हवे विचारले । ते काहीही न बोलले ।।८४।।
डॉक्टर धनेश्वरास । अष्टमहासिध्दी देत ।।
डॉक्टर त्यांचा उपयोग न करत । केवढी तयारी पहा ही ।।८५।।
काय इच्छा महाराज विचारीत । डॉक्टर महाराजांस सांगत ।।
जिथे व्हाल तुम्ही समाधिस्त । तिथेच व्हावा अंत मम ।।८६।।
महाराजांचे एकनिष्ठ । भक्तांत धनेश्वर वरिष्ठ
त्यांची अंतिम इच्छा बलिष्ठ । महाराजांनी पुरविली ।।८७।।
महाराज धनेश्वरास घेऊन । संगती हार एक आणून ।।
पुणे स्टेशनवर जाऊन । महाराज बसले निवांत ।।८८।।
तेवढ्यात तेथे गाडी आली । हार घेऊन गर्दी उसळली ।।
डब्यातील व्यक्तीस हार घाली । महाराज म्हणाले धनेश्वरा ।।८९।।
जे कृष्णमुर्ती होते डब्यात । सर्वजण त्यांना हार घालत ।।
धनेश्वरही हार घालीत । जे कृष्णमुर्ती म्हणाले ।।९०।।
कुणाचा आहे हा हार । धनेश्वर हात करत बाहेर ।।
महाराजांस पाहता सत्वर । कृष्णमुर्ती उठलेच ।।९१।।
त्यांनी महाराजासं हार घालुनी । परतून डब्यात बसता क्षणी ।।
गाडी गेली निघूनी । तेव्हा महाराज म्हणाले ।।९२।।
निर्गुण संप्रदायाचे जे कृष्णमुर्ती । जे माझा हार स्वीकारती ।।
मलाही ते हार घालती । घडले कसे पहा हे ।।९३।।
धनेश्वरांच्या मनात । यामुळे शंका उद्भवत ।।

पुढे जेव्हा त्यांची भेट होत । शंका त्यांना विचारली ।।९४।।
जे कृष्णमर्ती त्यांना सांगत । निर्गुणसंप्रदाय आमचा असत ।।
आमच्या संप्रदायाचे गुरू साक्षात् । असती शंकरमहाराज ।।९५।।
रात्री समाधीमठावर । एक सर्पराज करी संचार ।।
लाल प्रकाश पडे प्रखर । मुख त्याच्या लाल असे ।।९६।।
लाल रत्न विशेष असे । त्याच्या प्रकाशात तो फिरतसे ।।
अनेकांनी हे पाहिले असे । शिपाई पाळत ठेवत ।।९७।।
एकदा मध्यरात्र होत । सर्पराज होते हिंडत ।।
बंदुकधारी शिपायांना ते दिसत । प्रकाशामागे धावत ।।९८।।
लाल प्रकाश जिकडे दिसत । शिपाई तिकडे लगेच जात ।।
सर्पराज समाधीवर चढत । अंतर्धान जाहले ।।९९।।
शिपाई मठात शिरत । इथे नाग आला का ? विचारत
कोणास काहीच ठाऊक नसत । शिपाई गेले निघुन ।।१००।।
ज्यांच्या डोक्यावर पृथ्वीचा भार । ते कोणाला सापडणार ?
त्यांना कोण मारणार ? अगणीत लीला जयांची ।।१०१।।
एकदा मध्यरात्री समाधीवरती । एक नागराज प्रगटती
लगेच प्रत्यक्ष महाराज दिसती । बाबुराव रुद्रांनी पाहिले ।।१०२।।
समाधीनंतर दोन वर्षांनी पहा । भाऊसाहेब राऊत यांना
महाराजांनी मंत्र दिला । श्रीस्वामी समर्थ ।।१०३।।
पूर्वी जक्कलच्या मळ्यात । मंडप लहान, बांधलेला नसत
सभोवती उघडे रान असत । संरक्षण नव्हते कसलेच ।।१०४।।
महाराज मारुतीच्या रूपात । तेथे पहारा आहेत करत
क्षणात मारुती, महाराज क्षणात । राम कोराड पहात ।।१०५।।
एकोणीसशे एकोणपन्नासात । बाबुराव रुद्राला महाराज भेटत
हिंदीत त्यांच्याशी बोलत । काव्यपंक्तीच होत्या त्या ।।१०६।।
अगदी खणखणीत आवाजात । वीस चरणी हिंदी दोह्यात
मै कैलासका रहनेवाला हूं । स्पष्ट महाराज म्हणाले ।।१०७।।
शिर महाराज – चरणी टेकवून । साष्टांग नमस्कार घालून ।।
सोळावा अध्याय पावन । पूर्ण येथे जाहला ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 17

देखून कैलासाचा राणा । आनंद झाला पंचप्राणा
वंदून त्यांच्या दिव्यचरणा । उत्साहित जाहलो ।।१।।
वय महाराजांचे किती होते ? । प्रत्येकास कळावे वाटते ।।
हे निश्चित सांगता न येते । कोणी दीडशे म्हणतात ।।२।।
साधू सांगतात वर्षे तीनशे । तपस्वी सांगतात सातशे ।।
अंतर्ज्ञानी दोन हजार वर्षे । प्रत्येकास आधार ।।३।।
समाधी घेतल्यावर महाराजांनी । बारा वर्षांनी जपानमधूनी ।।
एक मनुष्य दिला पाठवूनी । समाधीच्या मठात ।।४।।
त्याला सांगितले महाराजांनी । मी मेलो आहे म्हणूनी ।।
माझी समाधी बांधूनी । उत्सव करतात पाहून ये ।।५।।
तो जपानी मनुष्य आला मठात । समाधी फोटो पहात ।।
अश्रू नयनी ओघळत । सांगू लागला सर्वांस ।।६।।
अहो हे महाराज याच रूपात । सध्या आहेत जपानात ।।
त्यांचे कार्य चालले जोरात । उत्सव कसे तुम्ही करता ? ।।७।।
त्यांनीच मजला पाठविले । गंमत पाहून येण्यास सांगितले ।।
महाराज असता पुण्यतिथी सगळे । साजरी कशी करता हो ?।।८।।
महाराज वदत, दुस-या महायुध्दात । जपानवर बाँब पडणार असत
जपानची हानी होणार निश्चित । मी उध्दार करणार ।।९।।
महाराजांनी ऐसे म्हटल्यावर । तीन वर्षांनी जपानवर ।।
बाँब पडून देशभर । प्रचंड हानी जाहली ।।१०।।
म्हणून महाराज जपानात । सध्या कार्य आहेत करीत ।।
कसे होणार समाधीस्त ? । कसे कळणार वय त्यांचे ? ।।११।।
महाराजांच्या समवेत । आठ भक्त नेहमी असत ।।
अष्टप्रधान त्यांना म्हणत । नववे असती महाराज ।।१२।।
या नऊ जणांचा फोटो । नवरत्न दरबार त्यांना म्हणत ।।
महाराज पारखी, थोरात । नवले, कुकडे, श्रोत्रीय, ।।१३।।
कारखानीस, धनेश्वर । नववे असती मिरीकर ।।
अष्टप्रधान नवरत्न दरबार । सर्वत्र मिळतो पहावया ।।१४।।
महाराज दहा वचने नेहमी म्हणत । १) लेखणी माझ्या हातात ।।

२) अशक्य ते मजलाच शक्य । ३) इच्छा माझीच केवळ ।।१५।।
४) टाइम इज दि फॅक्टर । ५) आमच्या पुढे कुठले सरकार
६) पंखे मी वायूच्या सहज । गतीने जात असे ।।१६।।
७) कैरी कैरी पत्ते की अंदर । छुपेंगी कितना दिन ।।
बझार मे एक दिन । जरूर आयेंगी ।।१७।।
८) दीप जले पहिले । फिर जले परवाना ।।
पहिले जलाना सीख ले । फिर दुसरेकू जलाना ।।१८।।
९) रंग जाने रंगारी । भडवा क्या जाने पिंजारी ।।
१०) जिसका बंदर वोही । नचाये, ऐशी दहा वचने ही ।।१९।।
प्रसंग, घटना ज्या ज्या घडत । त्यातून ही वचने सिध्द होत ।।
या वचनांच्या अनुषंगात । प्रत्येक घटना घडतसे ।।२०।।
अलीकडे प्रत्येक सतरा वर्षांनी । आता समाधी घ्यावी म्हणूनी ।।
महाराजांच्या मनी । विचार येत, जातही ।।२१।।
एकोणीसशे तीस साली । समाधी ठरविली महाराजांनी
तेव्हा डॉक्टर धनेश्वरांनी । विचार त्यांच्या बदलविला ।।२२।।
डॉक्टर धनेश्वरांमुळे । अधिक सतरा वर्षे लाभत ।।
महाराजांचा सहवास मिळत । भक्तांना त्या सर्वही ।।२३।।
पद्मावतीसमीप अरण्यात । महाराज नेहमी जात असत ।।
तेथे एका ठिकाणी ते थांबत । ठिकाण भरले मनात ।।२४।।
ही जागा मालपाणींची असत । महाराज मालपाणींना बोलवीत ।।
आणि त्यांना सांगत । येणार आहे इथे मी ।।२५।।
ती जागा देण्याचे वचन । मालपाणीकडून घेऊन ।।
सोय समाधीची अशी करून । एक वर्ष आधीच ।।२६।।
त्याच ठिकाणावर जाऊन । शांत बसत ध्यान लावून ।।
हेच समाधीचे ठिकाण असून । महाराज भक्तास सांगत ।।२७।।
महाराज भक्तास म्हणत । हे कपडे जीर्ण झालेत ।।
टाकून दिले पाहिजेत । सूचक ऐसे बोलत ।।२८।।
तीन महिने आधीच । महाराज सांगत सर्वांस ।।
वैशाख शुध्द अष्टमीस । समाधी आम्ही घेणार ।।२९।।
तिथी वार दिनांक सगळे । महाराजांनी सांगितले ।।
नंतर हिंडणे बंद केले । एकाच स्थळी रहात ।।३०।।
सप्तमीच्या दिवशी महाराजांनी । स्वत: खिचडी तयार करूनी ।।
प्रसाद म्हणून द्रोण भरूनी । स्वत: सर्वां दिलीच ।।३१।।
याच दिवशी महाराजांनी । आनंद कुटे यांना बोलावूनी ।।
एक रेशमी शर्ट दे मज आणूनी । महाराज त्यांना सांगत ।।३२।।
कुटे रेशमी शर्ट आणून देत । महाराजांच्या अंगात घालत ।।
विलक्षण तेज महाराजांचे दिसत । लीलाच होती वेगळी ।।३३।।
महाराजांचा निवास असत । शेवटी ढेकणे मामांच्या घरात ।।
महाराज मामींना सांगत । खोलीत गादी ठेवावी ।।३४।।
सकाळी दहा वाजण्याला । महाराजांनी चहा घेतला
गादीवर टेकून तक्क्याला । महाराज बसले खोलीत ।।३५।।
मला कुणाशी न बोलावावयाचे । मला कुणी न भेटावयाचे ।।
दार बंद करून घ्या खोलीचे । खोली उघडू नका मुळी ।।३६।।
शेवटचे दहा दिन । महाराजांनी धरले मौन ।।
हिंडणेही दिले सोडून । स्वस्थ शांत मौनात ।।३७।।
महाराजांची तेव्हा खोली । ढेकणे मामांनी बंद केली ।।
मामी - मामा रात्रभर मुळी । खोलीपासून हलले ना ।।३८।।
खोलीत महाराज असून । घातले होते पद्मासन ।।
आदेश आला खोलीतून । पहाटे चार वाजता ।।३९।।
पुढील सोय करा, ही आत्मज्योत । बाहेर आहे आता पडत ।।
मामा - मामी हे ऐकत । दिङ्मूढ झाले ऐकून ।।४०।।
शके अठराशे एकोणसत्तर । वैशाख शुद्ध अष्टमी सोमवार ।।
सन एकोणीसशे सत्तेचाळीस । दिनांक एकोणतीस मे ।।४१।।
महाराजांची आत्मज्योत । विलीन झाली विश्वरूपात ।।
प्रत्येकाची आत्मज्योत । थरारली कळताच ।।४२।।
वा-यासारखे हे वृत्त । सर्वांस कळविण्यात येत ।।
कुणासही हे खरे न वाटत । गर्दी जमली प्रचंड ।।४३।।
ज्योत सोमवारीच प्रगटली । सोमवारीच अंतर्धान पावली।।
अशी सोमवारची ख्याती भली । प्राकट्य अंतर्धानाची ।।४४।।
का निवडला सोमवार ? । दोन्ही घटनांस हाच का वार ? ।।
यातून कळून येते सार । कोण होते महाराज ? ।।४५।।
शुध्द अष्टमीला प्रगट झाले । शुध्द अष्टमीलाच अंतर्धान पावले ।।
हे दोन्हीही घडून आले । शुध्द अष्टमीलाच ।।४६।।
महाराज सर्व देशात असत । महाराजासं सर्व भाषा येत ।।

महाराजांचे प्रेम असत । सर्व धर्मीयांवर ।।४७।।
निर्वाण वृत्त जेव्हा कळत । सर्वधर्मीय येऊन म्हणत
हे महाराज आमचेच असत । वाद निर्माण जाहला ।।४८।।
आत्मविश्वासाने जो तो म्हणत । महाराज आमचेच असत ।।
परी कुणाच्याही न ये लक्षात । सर्वांचेच महाराज ।।४९।।
अमर्याद अमाप नि:सीम । असामान्य अगणित निष्काम ।।
अलोट महाराजांचे प्रेम । मानवावरती अपार ।।५०।।
वृत्त कळता बसावा शॉक । प्रत्येकजण झाला अवाक ।।
महाराजांना मारीत हाक । पुण्याकडेच निधाला ।।५१।।
सर्वांस पुणे शहर वाटत । महाराजांचे जे असत भक्त ।।
त्यांना श्रीक्षेत्र पुणे असत । पुण्य, पावन पुणे हे ।।५२।।
या सगुणरुपाचे दर्शन । सर्व भक्तांस व्हावे म्हणून ।।
पार्थिव देह तीन दिवस जपून । ठेविला ढेकणे निवासी ।।५३।।
वृत्त कळता भस्मे येत । रेशमी कद घेतला पुण्यात ।।
सुंदर वुलनची शाल घेत । सदगुरूस अर्पिण्या ।।५४।।
महानिर्वाण यात्रा जेव्हा निघत । भस्मे गुरूस कद नेसवीत ।।
महाराजासं शाल पांघरून घालत । पुष्पहार घातला ।।५५।।
ढेकणेंच्या घरापासून । महानिर्वाणयात्रा निघून ।।
मिरवणूक गेली गजबजून । गर्जनेत भक्तांच्या ।।५६।।
टाळ-मृदंगाचा ध्वनी । जयजयकार भक्तांच्या मुखातुनी ।।
गर्जत राही अभंगवाणी । ढीग पुष्पहारांचे ।।५७।।
तात्या काडगावकर गर्जत । अभंग खड्या आवाजात ।।
लोक हार - फुले वहात । बेल तुळशी - बुक्काही ।।५८।।
तीन दिवस देह होत । अगदी तेजस्वी दिसे पाहता ।।
रेशमासारखा लागे स्पर्शिता । धनंजय नाडी चालत ।।५९।।
मिरवणूकीत भक्त जमले फार । त्यांच्या दु:खाचे नाना प्रकार ।।
कुणा दु:ख झाले अपार । वदता रडता न ये कुणा ।।६०।।
या मिरवणुकीत महाराजांनी । भक्तांना विविध दर्शने देऊनी
सांत्वन त्यांचे केले असूनी । धीर दिला सर्वांना ।।६१।।
ढेकणे मामांचे निवासस्थान । बाबू गेनू चौकातून ।।
काका हलवाई दत्त मंदिरावरून । ग्लोब टॉकीजवरून ।।६२।।
अक्कलकोट स्वामींचा मठ । मंडई, शनिपार, मारुती भिकारदास ।।
पर्वती अरण्येश्वर, पद्मावतीवरून । मिरवणूक निघाली ।।६३।।
या सबंध मिरवणुकीत । भस्मे, महाराजांवर छत्री धरत ।।
समाधी - स्थानावर मिरवणूक येत । जयजयकारात संपली ।।६४।।
भक्तांनी गुलाल उधळला । पार्थिव देह वटवृक्षाखाली ठेवला ।।
जो तो महाराजांस पाहू लागला । तोच चमत्कार जाहला ।।६५।।
महाराज दिसले मारूतीराय । जो तो धरी त्यांचे पाय ।।
आज आमची गेली माय । कळवळा फुटला सर्वांना ।।६६।।
तेवढ्यात माळीमहाराज आले । त्यांनी अंत्यदर्शन घेतले ।।
महाराज बजरंगबलीच दिसले । माळी महाराज म्हणाले ।।६७।।
आपण बजरंगबलीचे रूप घेतले । भक्तीचे मार्ग वेगवेगळे ।।
जगाला सांगण्यासाठी सगळे । म्हणून असे बनला का ? ।।६८।।
महाराज भक्तांस नेहमी म्हणती । मी प्रत्यक्ष आहे मारुती ।।
मारूतीच्या रूपात दर्शन देती । आपल्या अनेक भक्तांस ।।६९।।
महाराजांचे हे वचन । मारूती रूपात झालेले दर्शन ।।
यावेळी सर्वांस आठवून । ह्रदय आले भरून ।।७०।।
प्रात:स्मरणीय चिरंजीव सप्त । त्यात मारूतीराय प्रख्यात ।।
म्हणून मी चिरंजीव असत । हेच महाराज सुचवित ।।७१।।
महाराजांनी जी जागा सुचविली । तिथे जमीन नुसती उकरली ।।
सात बाय साडेतीन फूट निघाली । भव्य शिळा त्या स्थळी ।।७२।।
शिळा बाजूला काढली । आत त्याच मापाची बांधलेली ।।
समाधी तयारच होती सगळी । योजना कशी पहा ही ।।७३।।
आळंदी ज्ञानेश्वरमहाराज । सोपानदेव, जंगलीमहाराज
पद्मावती, माळीमहाराज । ओंकारेश्वर येथील ।।७४।।
या सहा ठिकाणच्या भाविकांनी । पवित्र वस्तू आणुनी ।।
मोठ्या भक्तिभावनेनी । समाधीत ठेवल्या ।।७५।।
या समाधीच्या भागात । दादा फुलारी, राम कोराड ।।
पुरूषोत्तमबुवा, धनेश्वर । चौघेच असती आत हे ।।७६।।
पार्थिव देह महाराजांचा । माळीमहाराजांच्या हस्ते पहा ।।
समाधीत व्यवस्थित ठेवला । गुलालपुष्पे उधळली ।।७७।।
तेथील सर्व भक्तांनी । पार्थिवदेहाची पूजा करूनी ।।
हार - बेल - तुळस वाहूनी । अंत्यदर्शन घेतले ।।७८।।
नंतर मीठ - आघाडा - तुळस ठेऊनी । अगदी शास्त्रोक्त पध्दतीनी ।।

विधियुक्त समाधी बंद करूनी । जयजयकार निनादला ।।७९।।
महासमाधीची पूजा केली । आरती कर्पुरारती झाली ।।
पाच वाजता संध्याकाळी । सोहळा पूर्ण जाहला ।।८०।।
पंधरा दिवस पहा सतत । परगावचे लोक येत असत ।।
तेराव्या दिवशी उत्सव होत । नंतर प्रसादोत्सव ।।८१।।
नेहमी देश - विदेशातून । सतत संचार करणारे असून ।।
महाराज झाले अंतर्धान । निसर्गही गेला थिजून ।।८२।।
पहिल्या पुण्यतिथीस् । भस्मे जाऊन पुण्यास ।।
अखंड वीणा नामसप्ताहास । करून प्रथा आरंभिली ।।८३।।
बारा वर्षांनी भस्मे यांनी । सुंदर पालखी बनवूनी ।।
रामभाऊ अकोलकरांना आणूनी । पुण्यतिथीच्या दिवशीच ।।८४।।
रुद्राभिषेक केला महाराजांना । पालखी अर्पिली महाराजांना ।।
देहही अर्पिला महाराजांना । म्हणाले जय शंकर ।।८५।।
महाराजांनी भक्तांना । सांगितल्या भविष्यकाळातील घटना ।।
वचने दिली अनेकांना । आश्वासनेही दिलीच ।।८६।।
जरी महाराज झाले समाधिस्त । घटना सिध्द करून दाखवीत
दिलेली वचने पूर्ण करीत । आश्वासने पाळीत ।।८७।।
महाराज प्रत्यक्ष प्रगटतात । भक्तास वचनाची जाणीव देत ।।
वचन मी पूर्ण केले असत । जाणीव देऊन जातात ।।८८।।
आजही हे असे घडत । असे उद्याही घडणार असत ।।
काल तर घडले प्रत्यक्षात । त्रिकाळ त्यांच्याच हातात ।।८९।।
अजून महाराज प्रत्यक्ष प्रगटतात । भक्तास प्रत्यक्ष सांगतात ।।
स्वप्नात तर अनेकांना भेटतात । मार्गदर्शन करतात ।।९०।।
मामा ढेकणेंच्या घरात । तात्या सहस्त्रबुध्दे येत ।।
महाराजांसारखेच तात्या दिसत । समाधी देउुन परतता ।।९१।।
काही भक्तांच्या शरीरात । महाराज प्रवेश करीत असत ।।
तेव्हा ते भक्त प्रत्यक्ष दिसत । हुबेहुब महाराज ।।९२।।
काही संदेश सांगणे । कार्य काही करून घेणे ।।
एकाच वेळी प्रगटणे । अनेकांच्या शरीरात ।।९३।।
असे महाराज करत । अष्टमहासिध्दीच्या पलीकडची ।।
ही यौगिक क्रिया असूनी । अजूनही महाराज करतात ।।९४।।
खंडयोग महाराज करत असत । देहाचे तुकडे तुकडे करत ।।
पूर्ववत तुकडे सारे जोडत । पुन्हा महाराज उभेच ।।९५।।
महाराज विविध कथा सांगत । दूरान्वयाने ज्ञान देत ।।
विविध उपदेशही करीत । एकदा महाराज म्हणाले ।।९६।।
मातीचा बनविला शंकर । परि माती नसे शंकर ।।
शंकराने पूजिला शंकर । माती मातीच राहते ।।९७।।
कशाची घडविली भवानी । कासे मात्र नसे भवानी ।।
भवानीने पूजिली भवानी । कासे राही कासेच ।।९८।।
तैसे आम्हा पूजिती सज्जन । पूजा स्वीकारती भगवान ।।
महाराजांचे हे वचन । असे अत्यंत मोलाचे ।।९९।।
महाराजांचे जे जे भक्त । त्यांना महाराज खडसावून सांगत
पृथ्वीचा होईल जेव्हा अंत । तेव्हा निष्ठावंत भक्तांना ।।१००।।
मी माझ्या मांडीवर । घेऊन त्यांना तारणार ।।
हानी होऊ न देणार । जबाबदारी मजकडे ।।१०१।।
जबाबदार भगवंत । भक्त असणे निष्ठावंत ।।
विचार करतील का विचारवंत । महाराजांची मेख ही ।।१०२।।
महाराजांच्या गळ्यात । सुवर्णाचे एक लॉकेट असत ।।
खाली एक बदाम शोभत । नाव होते त्यावर ।।१०३।।
शंकर नारायण अंतापूरकर । नावाखाली समर्थ सुंदर ।।
होते हा अलंकार । विलोभनीय अत्यंत ।।१०४।।
महाराज जक्कलच्या मळ्यात । येऊन शिळेवर उभे रहात ।।
या शिळेवरती उमटत । महाराजांची पाऊले ।।१०५।।
राम कोराडच्या घरात । महाराज फरशीवर उभे रहात ।।
त्या फरशीवर पादुका उमटत । महाराज निघुन जाताच ।।१०६।।
समाधीच्या मठात । जे दत्तमंदिर असत ।।
अजूनही रात्रभर त्यामंदिरात । महाराज असतात ।।१०७।।
देहरूप बनले विश्वरूप । नमनाचा करूनिया धूप ।।
सतराव्या अध्यायास चढे हुरूप । समाप्त येथे जाहला ।।१०८।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।

Chapter 18

महाराजांच्या पूजेचा थाट केला । गुलाबपुष्पांचा हार घातला
उदबत्यांचा घमघमाट सुटला । आरती केली डौलात ।।१।।
साष्टांग केला नमस्कार । मस्तक ठेवले चरणावर ।।
महाराजांनी हात डोक्यावर । फिरवून कवटाळले मज ।।२।।
घट्ट धरले महाराजांनी । मम मस्तक त्यांच्या ह्रदया भिडुनी ।।
शरीर मम गेले मोहरूनी । आनंद लाटा उसळल्या ।।३।।
महाराज इतके प्रसन्न दिसत । सतरा अध्याय जे लिहिले असत ।।
ते महाराजांना अगदी पसंत । पावती याची त्यामध्ये ।।४।।
आता फलश्रुतीचा अध्याय । लिहावा, फलश्रृती असे काय ? ।।
सांगितली तुज तीच लिहिली जाय । लेखणी माझ्या हातात ।।५।।
महाराजांचे धरून पाय । फलश्रृतीचा हा अध्याय ।।
येथे पहा सुरू होय । दिव्य सुंगध दरवळला ।।६।।
जेथे सुगंध दरवळत । तेथे महाराजांचे वास्तव्य असत ।।
हे ठेवावे लक्षात । नमस्कार करावा ।।७।।
गुरू करावा असतो लागत । म्हणून लोक गुरू करत ।।
काय महिमा गुरूचा असत । ठाऊक नसतो लोकांना ।।८।।
गुरूचा अगाध असे महिमा । गुरूच्या महत्वास नसे सीमा
गुरूच्या थोरवीस कसलीच उपमा । देता येत नसेच ।।९।।
शास्त्र आहे सांगत । गुरू प्रत्यक्ष ब्रह्मदेव असत ।।
गुरू विष्णूच साक्षात । गुरूच भगवान शंकर ।।१०।।
हे तीनच देव मुख्य असत । हे तिन्ही देव गुरू होत ।।
गुरू हे तीनही देव असत । एवढे महत्व गुरूला ।।११।।
पूजा केली जर गुरूंची । पूजा होत या तिन्ही देवांची ।।
जरूरी न वेगळी पूजा करण्याची । स्पष्ट अगदी होतसे ।।१२।।
ब्रह्मा, विष्णू महेशाहून । अधिकार गुरूंचा थोर असून ।।
यालाही असे शास्त्रवचन । शास्त्र सांगते पहा की ।।१३।।
ब्रह्मा, विष्णू, महेशांनी । शाप जर दिला रागावूनी ।।
सोडविण्यास त्या शापातूनी । समर्थ केवळ गुरूच ।।१४।।
गुरूनीच जर शाप दिला । त्या शापातून सोडविण्याला ।।
ब्रह्मा, विष्णू, महेशाला । सामथ्र्य नाही मुळीच ।।१५।।
प्रारब्धामध्ये जे जे असत । तेच देव देऊ शकतात ।।
देवांच्या मुळी न हातात । प्रारब्ध बदलून टाकणे ।।१६।।
प्रारब्धात जे लिहिले असत । ते आपण होऊन होतसे प्राप्त ।।
न मागताही ते असे मिळत । जरूरीच काय देवाची ।।१७।।
गुरूंचे मात्र असे नसत । गुरू प्रारब्ध बदलतात ।।
मनास येईल ते देतात । प्रारब्धात असो नसो ।।१८।।
गुरूचा असा दिव्य महिमा । या महिम्याला नाही सीमा ।।
गुरूला देणे कसली उपमा । कालत्रयी शक्य ना ।।१९।।
गुरू म्हणजे गुरूच तर । त्रैलोक्याचा आधार ।।
ज्यांची माया अपरंपार । गुरूमाऊली कृपाळू ।।२०।।
किती गावेत गुरूंचे गुण । त्रैलोक्यावर ज्यांचे सदा ऋण ।।
कशी सांगावी गुरूंची खूण । अनादि, अनंत, अगाध ।।२१।।
गुरूंचा महिमा अपार । शिष्यही असावा लागतो तयार
गाडी आली गेली पार । शिष्य झोपून राहिला ।।२२।।
अशा शिष्यास गुरूंच्या गाडीत । बसण्याचा योग कधी तरी का येत ? ।।
ही तर कैलास एक्सप्रेस असत । हयगय तेथे मुळी ना ।।२३।।
गुरू माझा आहे प्राण । गुरू सर्वस्वाची असे खाण ।।
गुरूच माझे कल्याण । अशी निष्ठा लागते ।।२४।।
गुरूच माझे सर्व काही । गुरूशिवाय काही माहीत नाही ।।
गुरूशिवाय मजला नको काही । धारणा अशी लागते ।।२५।।
एकमेव आपले ठिकाण गुरू । गुरू आहेत कल्पतरू ।।
जे जे आपण मनात धरू । इच्छा पूर्ण होणार ।।२६।।
प्रत्येकास असे आई । प्रत्येकास प्यारी आपली आई ।।
आईस प्यारी तिची आई । नैसर्गिक असेच ।।२७।।
परी आपणास आईची आई । आई म्हणून चालणार नाही ।।
हवी आपणास आपलीच आई । आगळेच महत्व आईचे ।।२८।।
गुरूचे गुरू, गुरूस थोर । आपणास आपले गुरू थोर ।।
आपले गुरूच आपणा तारणार । गुरूमहिमा प्रख्यात ।।२९।।
आपले गुरूंचे जे चरित्र । त्यालाच म्हणतात गुरूचरित्र ।।
इतर गुरूंचे चरित्र । गुरूचरित्र कसे होईल ? ।।३०।।
आज 'श्रीगुरूचरित्र' म्हणून । जो ग्रंथ येतसे दिसून ।।
नरसिंह सरस्वतीचे चरित्र असून । अलिकडचाच लिहिलेला ।।३१।।
हा ग्रंथ लिहिण्यापूर्वी । गुरूंची चरित्रे का नव्हती ? ।।

परी श्रीगुरूचरित्राची विशेष ख्याती । सर्वत्र वाचले जातसे ।।३२।।
ज्या ज्या गुरूंची चरित्रे असत । जी चरित्रे वाचली जात ।।
ज्या गुरूचे चरित्र नसत । श्री गुरूचरित्र वाचत ।।३३।।
गुरूंचे चरित्र नसल्यावर । ग्रंथ कोणता वाचणार ? ।।
वाचला जाई सर्वत्र । श्रीगुरूचरित्र ग्रंथच ।।३४।।
महाराजही भक्तास । श्रीगुरूचरित्र वाचण्यास
सांगत होते त्यावेळेस । चरित्र त्यांचे नव्हतेच ।।३५।।
आज महाराजांचे चरित्र । उपलब्ध आहे सर्वत्र ।।
हेच वाचणे घरीच । शास्त्रोक्त योग्य होतसे ।।३६।।
हा जो नवीन विचार मांडला । तो विरोधी वाटेल सर्वांना ।।
तात्विक, खोल विचार केला । उपयुक्त, योग्य हा पटेल ।।३७।।
म्हणून महाराजांच्या सर्व भक्तांनी । महाराजांच्या सर्व शिष्यांनी ।।
नित्य श्रीशंकर गीता वाचूनी । सार्थक करून घ्यावेच ।।३८।।
हा ग्रंथ असे प्रासादिक । ग्रंथ हा अत्यंत मौलिक ।।
महाराजांचे अघटिक कैक । लीला विलास ग्रंथात ।।३९।।
प्रेरणा महाराजांनी देऊनी । आशीर्वाद दिले महाराजांनी ।।
आदेश महाराजांचा होऊनी । कौशल्य त्यांचेच यात ते ।।४०।।
वेळोवेळी कौल दिला । अडता, मुद्दा, सुचविला ।।
शुभशकुन प्रत्येक वेळेला । झाले आहेत, अनुभवले ।।४१।।
महाराज विचार सुचवीत । तेव्हाच ओवी तयार होत ।।
यात माझे काहीच नसत । कर्ते – करविते महाराज ।।४२।।
'माझ्या हातात लेखणी' । महाराजांचे उद्गार असूनी ।।
त्यांच्या हातात जर लेखणी । ग्रंथ कोण लिहिणार ? ।।४३।।
अशा या अपूर्व ग्रंथात । महाराजलीलाविलासामृत ।।
भरले आहे ओतप्रोत । हवे तेवढे लुटा हो ।।४४।।
या लीलाविलासामृताने । जीवन उजळून टाकावे प्रत्येकाने ।।
या मानवी देहाचे याप्रमाणे । सार्थक घ्यावे करून ।।४५।।
आज धकाधकीचा मामला । जो तो उद्योगात गुंतला ।।
निवांत वेळच नसे कोणाला । घाईगडबड नेहमी ।।४६।।
प्रत्येक पहा, अध्यायात । एकशे आठ ओव्या असत ।।
अध्याय अठराच असावेत । महाराजांचा आदेश ।।४७।।
एकशे एकवीस ओव्या अठराव्या । सर्व ओव्यांची संख्या असत
एकोणीसशे सत्तावन्न । ग्रंथराज हा एवढा ।।४८।।
कितीही मोठा लिहिला ग्रंथ । संपणार नाही चरित्र ।।
महाराज तर मारूतीराय । शेपूट संपेल का कधी ? ।।४९।।
ग्रंथ विस्तीर्ण लिहिल्यावर । वेळ कोणास मिळणार ? ।।
पारायण कोण करणार? । म्हणून स्वल्प ग्रंथ हा ।।५०।।
मानवांच्या प्रमुख मागण्या अठरा । प्रत्येकीचे प्रकार अठरा ।।
मागण्यांचा हा प्रचंड वारा । सुसाट वाहे अखंड ।।५१।।
आपल्या असतील ज्या मागण्या । आपल्या असतील ज्या इच्छा ।।
आपल्या असतील ज्या उणीवा । मनोकामना असतील ।।५२।।
अचानक संकट उद्भवले । काही प्रश्न निर्माण झाले ।।
परिस्थितीत प्रतिकूल बदल झाले । काय करावे सुचेना ।।५३।।
हा ग्रंथ असता वाचत । पारायणे करता सतत ।।
वरील सर्वांची पूर्तता होत । प्रश्न सारे सुटतील ।।५४।।
पूर्ण होतील सा-या मागण्या । पुरतील सर्वही आपल्या कामना ।।
नष्ट होतील सगळ्या उणीवा । मनोकामना पुरतील ।।५५।।
संकटात मार्ग दिसेल । प्रश्न मार्गी लागतील ।।
अनुकूल बदल होतील । काय करावे सुचेल ।।५६।।
महाराजांवर असावी प्रीती । असावी अव्यभिचारी भक्ती ।।
असावी महाराजांचीच आसक्ती । अढळ श्रध्दा असावी ।।५७।।
पारायण सुरू करतेवेळी । अग्निकुंडात अग्नी फुलवुनी ।।
गोघृताची आहुती देऊनी । प्रज्वलित अग्नी करावा ।।५८।।
मच्छिंद्रनाथांची शांत धुनी । महाराजांनी प्रज्वलित करूनी ।।
धुनी म्हणजे अग्निहोत्र असूनी । असे महत्व अग्नीस ।।५९।।
ज्याला अग्निहोत्राची माहिती असे । त्याने अग्निहोत्र करावे ।।
अन्यथा धुनीस पेटवावे । नाथपंथी खूण ही ।।६०।।
महाराज नाथसंप्रदायी असत । शांतिधुनी प्रज्वलित करत
यात महाराजांचा हेतू असत । अखंड धुनी चालावी ।।६१।।
पारायण जेथे सुरू होत । महाराज तेथे जातात ।।
महाराजांसाठी लागत । एक पाट स्वतंत्र ।।६२।।
या पाटाची पूजा करून । करावे महाराजांना आवाहन ।।
महाराजांना नमस्कार करून । पारायण सुरू करावे ।।६३।।
पध्दत सप्ताह पारायण । प्रथम दिनी ग्रंथ – महाराज पुजून ।।

पहिले दोन अध्याय वाचून । नैवेद्य आरती करावी ।।६४।।
पुढील पाच दिवसात । रोज तीन अध्याय वाचावेत ।।
सातव्या दिवशी एकच अध्याय । अठरावा वाचावा ।।६५।।
पारायण पूर्ण करूनी । महानैवेद्य आरती करूनी ।।
पारायणाची सांगता उरकूनी । सप्ताह पध्दत अशी ही ।।६६।।
रोज एक अध्याय वाचन । अठरा दिवसात पारायण ।।
रोज वाचिता अध्याय दोन । पारायण नऊ दिवसात ।।६७।।
वाचणे अध्याय रोज तीन । सहा दिवसांचे पारायण ।।
रोज सहा अध्यायांचे वाचन । पारायण तीन दिवसांत ।।६८।।
रोज वाचन नऊ अध्यायांचे । पारायण दोन दिवसांचे ।।
बसल्या बैठकीत ग्रंथ पूर्ण करणे । पारायण एक दिवसात ।।६९।।
पारायणाच्या या पध्दती । सात प्रकारच्या त्या असती ।।
आपणास सोयीची वाटेल ती । अनुसरावी पध्दत ।।७०।।
बसल्या बैठकीत पारायण । करणे सहज शक्य असून ।।
बाकीच्या पध्दती याहून । असती सुलभ अत्यंत ।।७१।।
नोंद ठेवावी पारायणांची । असे ती तुमच्याच कल्याणाची ।।
किती पारायणात काय घडले याची । कल्पना तुम्हा येईल ।।७२।।
या ग्रंथाचे पारायण पहिले । अगदी निष्काम पाहिजे केले ।।
यातून आपणास सूचना मिळे । त्याप्रमाणे करावे ।।७३।।
नंतर करून कामना । करावे पुढील पारायणा
या पारायणातून आपणा । सूचना काही मिळतील ।।७४।।
आपली कामना पूर्ण होणे । यास्तव किती करावीत पारायणे ।।
सांगतील महाराज स्पष्टपणे । आज्ञेप्रमाणे करावे ।।७५।।
पारायणे करील जो श्रध्दावंत । प्रगटेल पुढे भगवंत ।।
दिसतील महाराज मूर्तिमंत । याहून काय हवे हो ? ।।७६।।
हा शाश्वत लाभ महान । अपूर्व अत्यंत मौल्यवान ।।
अशाश्वत लाभ यापुढे लहान । क:पदार्थ केवळ ।।७७।।
मौल्यवान लाभ मिळे ज्यामुळे । त्यापासून क्षुल्लक लाभ का न मिळे ? ।।
सागरी अथांग जल भरलेले । चूळभर जल का न मिळे ? ।।७८।।
प्रत्येक अध्याय या ग्रंथातील । विशिष्ट कामना करील सफल ।।
महाराज दृष्टान्तात सांगतील । कोणता अध्याय वाचावा ।।७९।।
संपूर्ण ग्रंथाच्या । संपूर्ण कामनांची हमी असत ।।
पारायणात ग्रंथाचे वैशिष्ट्य असत । सकल कामनापूर्ती हे ।।८०।।
महाराज अनेकाना मंत्र देत । शिष्य, मंत्र ऐकतात ।।
आणि तसेच स्वस्थ बसतात । माहीत त्यांना नसतेच ।।८१।।
गुरू जेव्हा मंत्र देतात । तो, साधना करण्यासाठी असत ।।
नित्य साधना असता करत । सार्थक होई जन्माचे ।।८२।।
जन्माचे सुवर्ण होण्यास । गुरू देतात मंत्रपरीस ।।
झोपला परीस घेऊन उशास । उपयोग काय मंत्राचा ? ।।८३।।
गुरूनी आपणास मंत्र दिला । त्याचा नित्य जप पाहिजे केला ।।
किती अक्षरे मंत्राला ? । मोजावीत आपण ।।८४।।
किती अक्षरे, तितके, हजार । जप केला पाहिजे दिनभर ।।
नित्य एवढा जप करणे जर । शक्य नसेल आपणा ।।८५।।
मंत्राच्या अक्षराएवढ्या । माळा पाहिजेतच ओढल्या ।।
यात मात्र सवलत मुळी ना । एवढे तरी करावे ।।८६।।
यातही काही कमी झाले । आपणास दोष लागतसे
तो दोषही जातो गुरूकडे । विचार याचा करा हो ।।८७।।
नित्य जास्तीत जास्त जप करुनी । नित्य नोंद ठेवावी लिहूनी ।।
ऐसे सांगते निक्षूनी । मंत्रशास्त्र स्पष्टच ।।८८।।
या ग्रंथाचा मुख्य आधार । आहेत भस्मे ओंकार ।।
पारमार्थिक त्यांचा अधिकार । महाराजांप्रमाणे ।।८९।।
एकोणीसशे ऐंशीत । हे चरित्र लिहिण्याचे मी विचारीत ।।
त्यावेळी भस्मे काही न बोलत । आठ वर्षांनी म्हणाले ।।९०।।
आमच्या महाराजांचे चरित्र । तुम्ही का नाही लिहित ? ।।
'मी विचारले तुम्हा असत । आठ वर्षापूर्वी हे ।।९१।।
तेव्हा महाराजांचा आदेश नसत । आज महाराजांचा आदेश असत' ।।
ग्रंथ लिहिण्याचे निश्चित होत । पुण्यास गेलो दोघेही ।।९२।।
दर्शन घेतले समाधीचे । निवेदन केले ग्रंथाचे ।।
आशीर्वाद घेऊन महाराजांचे । अनेकांना भेटलो ।।९३।।
ज्या गावात महाराजांचे भक्त । जाऊन त्या त्या गावात ।।
माहिती, अनुभव मिळवीत । अगदी सर्वांस भेटलो ।।९४।।
भस्मे लहानपणापासून । महाराजांच्या संगतीत असून ।।
केली अपार सेवा मनापासून । भक्त एकनिष्ठ ते ।।९५।।
वीस वर्षापासून । भस्मेंचा – माझा परिचय असून ।।

महाराजांसंबंधी मधूनमधून । माहिती सांगत होते ते ।।९६।।
नुसते महाराजांचे नाव काढता । भस्मे गहिवरून येतात, ऐकता ।।
एवढी महाराजांशी एकरूपता । त्यांची आहे झालेली ।।९७।।
विविध पुस्तके मजशी देणे । विविध माहिती सांगणे ।।
अनेकांना भेटवून आणणे । तळमळ त्यांना अत्यंत ।।९८।।
प्रत्येक अध्याय होता लिहून । त्यांना दाखवितो मी वाचून ।।
भस्मे जातात आनंदून । संतुष्ट अत्यंत होतात ।।९९।।
प्रत्यक्ष महाराज संतुष्ट होत । त्यातून पावती मज मिळत
या ग्रंथाचे सर्व श्रेय असत । भस्मे यांनाच यामुळे ।।१००।।
शशिकांत महादेव देव । महाराज चरणी त्यांचा भाव ।।
महाराजांच्या कार्यास सदैव । तत्पर अत्यंत असती ते ।।१०१।।
त्यांनी आपल्या मोटारीतून । पुण्यात अनेक ठिकाणी नेऊन ।।
भेटीगाठी करवून । मुलाखती घडविल्या ।।१०२।।
पुण्याहून अनेक गावातूनी । आम्हास ठिकठिकाणी नेऊनी ।।
माहिती मिळावी म्हणूनी । देव सहकार्य असे हे ।।१०३।।
जसे सुईवर बांधावे नगर । किंवा हाती घेऊन घागर ।।
घागरी भरावा सागर । ऐसे महाराज - चरित्र ।।१०४।।
घरात चालताही येईना । करी मोठ्याने वल्गना ।।
'करीन पृथ्वी प्रदक्षिणा' । ऐसे महाराज - चरित्र ।।१०५।।
नित्य दोन प्रहरची भ्रांत । म्हणे जगास करीन तृप्त ।।
देईन पक्वान्ने समस्त । ऐसे महाराज - चरित्र ।।१०६।।
शक्य का रविकिरणे मोजणे ? । नभीची नक्षत्रे तारांगणे ? ।।
सागर खोली सांगणे ? ऐसे महाराज चरित्र ।।१०७।।
उंची किती आकाशाची ? लांबी किती पृथ्वीची ? ।।
गती किती वायुची ? । ऐसे महाराज - चरित्र ।।१०८।।
असंख्यांचे अनुभव असंख्य । अनुभवांच्याही छटा असंख्य ।।
महाराजांच्या कृती असंख्य । सर्व गुंफणे अशक्य ।।१०९।।
पंगुं लंघयते गिरीं । मूकं वाचालं करोती ।।
ऐशी असे फलश्रुती । महाराजांच्या कृपेची ।।११०।।
सोमवार सप्टेंबर अठ्ठावीस । एकोणीसशे सत्याऐंशी सन ।।
शके एकोणीसशे नऊ असत ।अश्विन शुध्द पंचमी ।।१११।।
या शुभदिनी सुवेळी । ग्रंथ लेखनास सुरूवात झाली ।।
आणि पौष शुध्द अष्टमी भली । एकोणीसशे दहा शतक ।।११२।।
सन एकोणीसशे एकोणनव्वदास । जानेवारी दिनांक तीस
सोमवारी सुसमयास । ग्रंथ पूर्ण जाहला ।।११३।।
ग्रंथास प्रारंभ सोमवार । ग्रंथ संपला सोमवार ।।
प्रारंभ शेवट सोमवार । योग कसा पहा हा ? ।।११४।।
महाराज प्रगटले सोमवार । महानिर्वाणही सोमवार ।।
दोन्ही दोघांचे सोमवार । एकरूपता केवढी? ।।११५।।
भगवंत वासुदेव अघोर । जामदग्न्यवत्स पंचप्रवर ।।
देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणतर । माहिती माझी असे ही ।।११६।।
भगवान 'श्री' ची कृपा म्हणून । संपूर्ण झाले ग्रंथलेखन ।।
योग आला सर्व जुळून । उपकार त्यांचे अनंत ।।११७।।
महाराजांचा आदेश झाला । आशीर्वाद त्यांचा मिळाला ।।
अठरा अध्यायांची ही माला । चरणी त्यांच्या अर्पितो ।।११८।।
महाराजांच्या तीन पादुका असत । समाधी मठात एक स्थापित ।।
दुस-या शुभराय महाराज मठात । तिस-या जक्कल मळ्यात ।।११९।।
घरात ग्रंथ असावा पाटावर । गंध - फूल वाहावे ग्रंथावर ।।
ग्रंथास नित्य करावा नमस्कार । समाधान - शांती मिळेल ।।१२०।।
'अल्लख' महाराज पुकार करत । लगेच साष्टांग नमस्कार मी घालत ।।
अठरावा अध्याय, ग्रंथ समाप्त होत । स्वये ग्रंथ हाती घेतला।।१२१।।
।। संतवर्य योगिराज सद्गुरू राजाधिराज
श्री शंकर महाराज की जय ।।